

# हाकारा





# आदिवासी साहित्य
# व
# सामाजिक प्रश्न





वर्ष : चौथे । अंक : चौथा । ऑक्टोबर-डिसेंबर १९८३

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मार्गदर्शक प्रा. गं. बा. सरदार

## कार्यकारी मंडळ


| | |
|---|---|
| अध्यक्ष | जनार्दन वळवी |
| उपाध्यक्ष | शरद कुलकर्णी |
| चिटणीस | रा. के. मुटाटकर |
| सहचिटणीस | जगदीश गोडबोले |
| खजीनदार | बाबुल पठाण |
| सभासद | विजय भानू |
| | गोविंद गारे |
| | श. गो. देवगावकर |
| | नान्सी गायकवाड |
| | दर्शन शंकर |

## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनंतराव बोधनकर |
| सुधा काळदाते | अनुताई वाघ |
| विजय तेंडुलकर | विलास संगवे |
| वि. म. दांडेकर | वाहरु सोनवणे |
| मधुकर देवल | गीता साने |
| चित्रा नाईक | छाया सुरतवंती |
| आ. ना. नारळकर | दत्ता सावळे |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा



( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## अनुक्रमणिका


संपादकीय २

विविधतेत संवाद साधायला हवा ! ३

आदिवासी साहित्य आणि समाजकार्य
परस्परसंबंध व वाटचाल
**सुधीर जोग—सुषमा सोनक** ६

चर्चासत्रास उपस्थित असलेल्यांची यादी १६

आदिवासींनी अभ्यासिलेली पशूंची वैशिष्टये
**गं. जा. आवारी—गुरुजी** १७

समाजशिक्षकाची भूमिका जगणारे प्रा. सरदार १८

उद्यांचा इतिहास आम्ही निर्माण करणार आहोत ! २२

रेला नृत्य : माडिया आदिवासींचा स्थायी भाव
**माधव बावने** २६

विज्ञान : असली आणि नकली
**माधव गाडगीळ** ३१

परधानांचा शिमगा, ' फाग ' आणि लोकगीते
**सौ. शैलजा देवगांवकर** ३८

आश्रमशाळातील मुलांच्या प्रगतीतील अडसर
**देविदास गिरी** ४१

इंद्रावती मोहिमेचे मोहक वर्णन
**सुधीर जोग** ४२

स्वागत व अभिनंदन ४३

महाराष्ट्रांतील आदिवासींवर दृष्टिक्षेप
**सुधीर जोग** ४५

धरतीची लेकरे (कविता)
**विनायक तुमराम** ४६

हुंडा (कविता)
**बाबा खैरकर** ४६

संवाद ४७


---


वर्ष चौथे : अंक चौथा
ऑक्टोबर—डिसेंबर १९८३
परिषद / हाकारा संयुक्त
वार्षिक वर्गणी : २० रुपये
एका अंकाची किंमत : ४ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
ई/५, प्राध्यापक निवास
पुणे विद्यापीठ
पुणे ४११ ००४.

**संपादक मंडळ**

जगदीश गोडबोले
शरद कुलकर्णी
रामचंद्र मुटाटकर

**संपादन साहाय्य**
सुधीर जोग

**छायाचित्रे**
सुधाकर कुलकर्णी

प्रकाशक :
प्रा. रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांचेसाठी
साप्ताहिक मुद्रण,
१०२५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०,
येथे छापून प्रसिद्ध केले.

संपादकीय

# आदिवासी साहित्य उपेक्षितच !

'हाकारा' चा मागील अंक महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार यांच्या ७६ व्या वाढदिवशी प्रकाशित करण्यात आला. त्यानिमित्त महाराष्ट्रातील आदिवासी साहित्यिक व निवडक सामाजिक कार्यकर्ते यांचे एक चर्चासत्र आयोजले होते. या चर्चासत्राचा समारोप म्हणून दलित-आदिवासींकडे झुकते माप टाकणारे प्रा. अण्णासाहेब सरदार यांचे प्रकट अभीष्टचिंतन करण्यात आले. या चर्चासत्राचा व अभिष्टचिंतनसमारंभाचा अहवाल हा 'हाकारा' च्या या अंकाचा प्रमुख विषय आहे. नुकत्याच झालेल्या जळगाव येथील मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी श्री. शंकरराव खरात यांची निवड झाली. दलित साहित्याला प्रस्थापितांची मान्यता लाभली परंतु आदिवासी अजून उपेक्षितच आहेत. त्यांची संस्कृती, अनुभूती निराळी, त्यामुळे त्यांचे साहित्यही निराळे. परंतु अजून त्याची दखल घेतली जात नाही, ती लवकरात लवकर घेतली जायला हवी.

पुण्यातील चर्चासत्रामुळे आदिवासी साहित्यिक एका ठिकाणी येऊ शकले. प्रस्थापित साहित्यिकांनी त्यांच्याकडे लक्ष दिले नाही अशी त्यांची वेदना आहे. पण मानसन्मान व मान्यतेच्या मागे न जाता आपल्या समाजाच्या वेदना, संघर्ष, चळवळी व उमेदी यांना साहित्यात प्रतिबिंबित करणे हेच आपले कर्तव्य आहे असे आम्हास वाटते. त्यामुळे सुशिक्षित आदिवासींनी मध्यमवर्गीय संस्कृतीचे अंधानुकरण न करता सतत आपल्या समाजातील सामान्य जनतेशी जवळीक ठेवावी म्हणजे साहित्याला वास्तवतेची धार चढेल असे वाटते. चर्चासत्र हे आदिवासींचे साहित्यसंमेलन ठरावे इतके यशस्वी झाले. आदिवासी साहित्याची बूज राखली जात नसेल तर स्वतंत्र साहित्यसंमेलने करावी लागतील. आदिवासी-दलित या उपेक्षितांची अनुभूती समजल्यास मराठी साहित्य अधिक प्रगल्भ बनेल व समाज अधिक एकसंध होईल. आदिवासी साहित्यिकांना चर्चासत्र आवडले असे त्यांच्या पत्रव्यवहारातून जाणवते व ते समाधान देणारे आहे.

प्रा. गं. बा. सरदारांच्या विनंतीस मान देऊन व त्यांच्या आरोग्याचे भान राखून आम्ही त्यांना अध्यक्षपदावरून निवृत्त होऊ दिले. मात्र त्यांनी परिषदेचे प्रमुख सल्लागार–मार्गदर्शक राहावयाचे मान्य केले ही समाधानाची बाब आहे. त्यांच्या जागी धुळे जिल्ह्यातील अक्राणी तालुक्यातील खंदे समाजचिंतक व शिक्षणप्रेमी श्री. जनार्दन पोहऱ्या वळवी यांची अध्यक्षपदावर एकमताने निवड झाली. जनार्दनमहाराजांनी पक्षीय राजकारणातून बऱ्याच वर्षांपूर्वी संन्यास घेतला व आता शिक्षणकार्याला पूर्णपणे वाहून घेतले आहे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष व इतर पदाधिकारी आदिवासी समाजातील असावेत हे योग्यच आहे. या दिशेने सुरुवात होत आहे हे औचित्यपूर्ण आहे. अध्यक्ष म्हणून श्री. जनार्दन महाराजांचे आम्ही हार्दिक स्वागत करतो व त्यांच्या प्रयत्नामुळे आम्ही आदिवासींच्या जास्त जवळ जाऊ शकू असा विश्वास बाळगतो तसेच परिषदेच्या कार्यात व 'हाकारा' मध्ये आदिवासींचा सहभाग वाढेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

पुण्यातील चर्चासत्रानंतर थोड्याच अवधीत 'आदिवासी भारत' या त्रैमासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला ही घटना आदिवासींच्या साहित्य चळवळीला नवा हुरूप व दिलासा देणारी आहे. 'आदिवासी भारत' चे आम्ही मन:पूर्वक स्वागत करतो व परस्पर सहकार्याची अपेक्षा बाळगतो.

## शोक समाचार

**ज्येष्ठ सर्वोदयी कार्यकर्ते व स्वातंत्र्यसैनिक श्री. दामोदरदास मुंदडा यांचे निधन झाले. धुळे जिल्ह्यातील आदिवासींमध्ये त्यांनी केलेल्या मोलाच्या कार्याने त्यांची स्मृती चिरंतन राहील. हाकारा व परिषदेतर्फे हार्दिक श्रद्धांजली.**

# ' विविधतेत संवाद साधायला हवा ! '

—प्रा. गं. बा. सरदार

(१ व २ ऑक्टोबर १९८३ रोजी महाराष्ट्र मानवविज्ञान परिषदेने आयोजित केलेल्या 'महाराष्ट्रातील आदिवासींचे सामाजिक प्रश्न व त्यांचे साहित्यातील प्रतिबिंब' या विषयावरील चर्चासत्राचे उद्‌घाटन करताना प्रा. गं. बा. सरदार यांनी केलेल्या भाषणाचा गोषवारा.)

**या चर्चासत्राचं निमित्त मला ७५ वर्षे पुरी होत आहेत हे असलं तरी मानवविज्ञानपरिषदेच कार्यक्षेत्र अधिक परिणामकारक व्हावं, तसंच निरनिराळ्या ठिकाणांहून जे आदिवासी साहित्यिक व कार्यकर्ते आलेले आहेत त्यांचं सहकार्य मिळवणं हा त्याचा मुख्य हेतू आहे. त्यामुळेच या चर्चासत्राला मी संमती दिली. माझं लहानपण ठाणे जिल्ह्यातल्या आदिवासी भागात गेल्यामुळे आदिवासींविषयी जी आस्था माझ्यामध्ये निर्माण झाली ती आजतागायत कायम आहे. यामुळेच मानवविज्ञानपरिषदेचं अध्यक्षपद मी स्वीकारलं आणि आदिवासी समाजातलेच एक कार्यकर्ते श्री. जनार्दनमहाराज वळवी यांच्याकडे अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवून मी निवृत्त व्हायचं ठरविलेलं आहे.**

□

आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांविषयी परिषदेच्या व्यासपीठावरून यापूर्वीही चर्चा झालेली आहे. मात्र आदिवासी साहित्यावर अजून झालेली नाही, ती या चर्चासत्रामध्ये घडवून आणण्याचा उद्देश आहे. भद्रावतीच्या पहिल्या आदिवासी साहित्यसंमेलनामध्ये मराठी साहित्यामध्ये नवे प्रवाह आता निर्माण होत आहेत, दलित साहित्याचा प्रवाह, ग्रामीण साहित्याचा प्रवाह आणि आता भद्रावती संमेलनामुळे आदिवासी साहित्याचा प्रवाहही हळूहळू मराठी साहित्यात प्रभावी होत जाईल असं मी म्हटलं होतं. मराठी साहित्यसंमेलनाचा पूर्वाध्यक्ष या नात्याने या नवीन प्रवाहाचं स्वागत करावं अशी माझी भावना होती.

माझा सगळा जन्म साहित्याचं अध्ययन आणि अध्यापन करण्यात गेला. त्यामुळे साहित्याबद्दल मला आस्था असणार हे उघडच आहे; पण त्याचबरोबर वेळोवेळी मी सांगत आलेलो आहे की, नवसमाजनिर्मितीसाठी मी कार्यकर्त्यांना अग्रक्रम देतो. साहित्य हे त्याला प्रेरणा देतं, मार्गदर्शनही करू शकतं, नव्या जाणिवांचा परिपोष करू शकतं हे सर्व मला मान्य आहे. साहित्याची प्रतिष्ठा यत्किंचितही कमी होता कामा नये असं मी मानतो. तरीसुद्धा शेवटी प्रत्यक्ष वास्तवाला भिडणारा जो कार्यकर्ता आहे त्याचं कार्य अधिक मूलगामी आणि मौलिक स्वरूपाचं आहे असं मला वाटतं. म्हणूनच माझ्या कुवतीप्रमाणे माझी जी धडपड आहे ती साहित्याचं क्षेत्र आणि प्रत्यक्ष कृतीचं क्षेत्र—मग ती सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक कोणतीही असेल—याचा कुठे तरी सतत सांधा जुळत गेला पाहिजे—यासाठी. यालाच मी सामाजिक बांधिलकी असं म्हणतो. त्यासाठी माझ्यावर अलीकडे तर बरीच टीका जास्तच होत आलेली आहे. त्यामुळे तुम्हाला जास्तच जागृत राहिलं पाहिजे.

## संवादाला महत्त्व

मराठी साहित्यामागची परंपरा जी आहे तिच्यामागची प्रेरणाही संवादाची आहे. ज्ञानेश्वरीमध्ये जागोजाग जर कोणत्या गोष्टीला महत्त्व दिले असेल तर संवादाला म्हणजे कार्यकर्त्यांनी विचारवंतांशी, साहित्यिकांशी संवाद साधला पाहिजे आणि साहित्यिकांनीसुद्धा कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळेल अशा प्रकारची निर्मिती केली पाहिजे. या दृष्टीनं आपण सगळे जरी

वेगवेगळ्या प्रवृत्तींचे असलो, आपल्या विचारांमध्ये एकरूपता नसली आणि एकरूपता असण्याचं काही कारण नाही–ज्या ठिकाणी जिवंतपणा आहे त्या ठिकाणी विविधता असणार–त्या विविधतेमध्ये संवाद कसा साधता येईल, याचा प्रयत्न झाला पाहिजे. लोकशाहीचं हे पहिलं लक्षण आहे की, मला ज्यांच्याशी विरोध करायचाय त्यांचंही म्हणणं मी शांतपणे ऐकून घेतलं पाहिजे आणि मग आपलं म्हणणंही तितक्याच परखडपणे मांडलं पाहिजे. तेव्हा आम्ही विवादाचं स्वागत करणार आहोत. मात्र संवादासाठी तोही एकदम येणार नाही. तेव्हा विवाद राहणारच, दिशा मात्र संवादाची असली पाहिजे. विवादाला अगर विरोधाला घाबरण्याचं काहीही कारण नाही. विरोध हा स्थायीभावच आहे सध्याच्या परिस्थितीचा विरोध करीत करीतच जुन्या अपप्रवृत्ती आपल्याला नाहीशा करायच्या आहेत.

## साहित्य ही एक शक्ती

मी असं म्हटलं की, कार्यकर्त्यांना मी अग्रक्रम देतो; परंतु साहित्यनिर्मिती हेसुद्धा एक कार्यच आहे असं मी मानतो. जर त्या साहित्यामागे व्यापक अशी प्रेरणा असेल, खऱ्या अर्थाने द्रष्टेपण असेल, वास्तवाला भिडण्याचं सामर्थ्य जर असेल तर ते साहित्यसुद्धा नुसतं कार्यच नाही तर ती एक मोठी शक्ती आहे असं मी मानतो. जगात जिथे जिथे क्रांत्या झाल्या तेथे तेथे निर्माणक्षम असं साहित्य निर्माण झालेलं आहे. तेव्हा साहित्य हे समाजजीवनापासून अलग काढताच येत नाही आणि तसा जरी प्रयत्न झाला तरी तो कधीही यशस्वी होणार नाही. शोषित समाजातून नवा वर्ग आज जो जागृत होऊन पुढे येतो आहे आपलं अस्तित्व सिद्ध करण्यासाठी, आपले न्याय्य हक्क बजावण्यासाठी आणि आपल्याला सामाजिक जीवनात योग्य स्थान प्राप्त करून घेण्यासाठी जे नवे थर आज पुढे येताहेत त्या सगळ्यांचा झगडा एकच आहे असं मी मानतो. त्यामध्ये दलित आहेत, आदिवासी आहेत, भटक्या विमुक्त जातीचे लोक आहेत आणि स्त्रियासुद्धा आहेत. आजवर मूक जनता जी होती ती आता बोलू लागलेली आहे आणि त्यांनी आपल्या व्यथा–वेदना, आपल्या आशा–आकांक्षा व्यक्त करणं याला वेगळा अर्थ आहे. तेव्हा साहित्याला सामाजिक आशय हा राहाणारच, कोणाला तो इष्ट वाटो अगर न वाटो, त्याला काही पर्याय नाही. आदिवासी साहित्याचा सामाजिक प्रश्नांशी संबंध आहे तो यामुळेच आहे. अभिजात साहित्याची गुणवत्ता आम्ही नाकारणार नाही; पण त्याच्या प्रेरणेमध्ये स्वयंकेंद्रितता, असामाजिकता जर असेल तर तिला आम्ही जरूर विरोध करू. त्यांची गुणवत्ता आपण घेतली पाहिजे. समाजवादी क्रांत्या जिथे झाल्या त्यांनाही भांडवलशाहीत निर्माण झालेलं विज्ञान घ्यावं लागलं, विज्ञानातले तज्ज्ञ बोलावून आपली प्रगती करून घ्यावी लागली. तेव्हा साहित्याची गुणसंपदा आपण वाढवली पाहिजे, त्यातला सगळा आशय आपण घेतला पाहिजे आणि तो आपल्या प्रेरणेसाठी वापरला पाहिजे.

साहित्य हा कलेचा एक भाग आहे आणि कला ही खरोखरीच आदिवासींच्या रक्तात भिनलेली आहे. पांढरपेशांना कलेकडे जावं लागतं, आदिवासींकडे कला अगोदरच आहे. कलेची जी मुख्य तीन अंगं– चित्र, गीत आणि नृत्य–ही तुम्हाला प्रत्येक आदिवासीत दिसतील. कुठलाही आदिवासी घेतलात तरी तो नृत्यात रंगून जातो. त्यांना दुसरा विरंगुळाच नाही. त्यांच्या जीवनामध्ये दुसरी आनंददायक अशी गोष्टच नाही. समाजाने त्यांना इतक्या खालच्या पातळीवर ठेवलेलं आहे की, ते नृत्य, गीत यात रमणार नाहीत तर त्यांना जिवंत राहणंसुद्धा शक्य होणार नाही. जीवनकलहामध्ये त्यांनी आपल्या कला टिकवून ठेवलेल्या आहेत. कलेमध्ये आदिवासी इतके रंगतात की, स्वतःला ते विसरून जातात आणि असं जीवनामध्ये काही तरी लागतंच की जिथे तुम्ही स्वतःला पूर्णपणे विसरून जाऊ शकता. मग दिवसभर जीवनकलह आहेच. आता कला ही स्वतःला विसरणारी न राहता स्वतःला मुक्त करणारी आणि जीवन उन्नत करणारी बनावी ही आपली आकांक्षा आहे. निसर्गानं काय केलंय की, ती विसरण्यासाठी आणलेली आहे. आपल्याला तिच्यात नवीन निर्माण क्षमता आणायची आहे. साहित्यामध्ये अनेक कलांचा संगम झालेला असतो. यासंबंधी आपण येथे चर्चा करणार आहोत.

## मानव मुक्तीचा क्रम

आपला समाज ही विविध जातीजमातींची एक उतरंड आहे. ज्यांनी बंडखोरी केली त्यांच्या बंडखोरीलाही

सतत मर्यादा पडत आलेल्या आहेत. सगळचात उशीरा जागृती झाली ती आदिवासींमध्ये झाली. मानवमुक्तीचासुद्धा एक क्रम आहे आणि त्याला इलाज नाही आणि आपल्या जातिबद्ध समाजात तर तो विशेषत्वाने आहे. ॲरिस्टॉटल, प्लेटोलाही गुलामगिरी स्वाभाविक वाटली, याचा अर्थ त्यांची प्रतिभा कमी होती असं नाही क्रांतिकारकांनासुद्धा ग्रीक तत्त्वज्ञानाचा आधार घ्यावा लागलेला आहे. मार्क्सनंसुद्धा तत्त्वज्ञानाचा प्रबंध लिहिताना ग्रीक तत्त्वज्ञानावर लिहिलेलं आहे. युरोपात विद्येचं पुनरुज्जीवन झालं त्यातून मग क्रांत्या झाल्या. आधी राजकीय क्रांती झाली पुढे आर्थिक क्रांती झाली. या क्रमाला काही इलाज नाही. माणूस हा विषमतेकडून समतेकडे चाललेला आहे. बंडखोर साहित्य थोडं असलं तरी त्याचा वारसा आपण पुढे नेला पाहिजे. ॲरिस्टॉटलने शास्त्रीय विचाराला सुरुवात केली. गुलामगिरी आम्ही फेकून दिली. मात्र ॲरिस्टॉटल, प्लेटो फेकून दिला नाही. १३ व्या शतकात ज्ञानेश्वरांनी बंडखोरी केली. ज्ञानेश्वर देव झाला; पण ब्राह्मण झाला नाही. प्रथम सवर्णातून बंडखोर झाले. जाणिवा क्रमाने विकसित होतात. पारतंत्र्याच्या काळात आम्हाला प्रथम राजकीय स्वातंत्र्याची गरज होती. दलितांना मी अनेकदा सांगत आलो आहे आज लाखांनी पदवीधर जे निर्माण होताहेत ते ब्रिटिशांच्या काळात का नाही झाले ? तेव्हा राजकीय स्वातंत्र्यासाठी लढा दिला त्यांचे ऋण मानलेच पाहिजे. ५२ साली टिळकमंदिरात मी म्हटलं होतं की, टिळक प्रतिगामी होते; पण साम्राज्यविरोधी लढाया ते एकाकी लढले त्याची आम्हाला गरज होती की नाही ? आज ब्रिटिश राज्य येथे असते तर हे प्रश्नच पृष्ठभागावर आले नसते— हा क्रम लक्षात घेऊनच पुढे जायला पाहिजे मी अध्यक्ष असलेल्या दलितसंमेलनाच्या परिसराला 'केशवसुतनगर' असं नाव दिलेलं होतं. महाराष्ट्रात पहिल्यांदा बंडखोरीची तुतारी फुंकली ती केशवसुतांनी. आजच्या अर्थाने ती बंडखोरी नसेल; पण ती शंभर वर्षांपूर्वीच्या काळात होती हे महत्त्वाचं आहे. त्याच्या पुढे आम्ही गेलो नाही तर त्यांचे वारस म्हणून मिरवण्याचा आम्हाला काय अधिकार आहे ? तो मागे राहिला असे न म्हणता तो झाल्यामुळे आम्ही झालो हा क्रम आपण लक्षात घेतला पाहिजे.



**श्री. जनार्दनमहाराज बळवी**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे
नवीन अध्यक्ष

*

दलित साहित्याने विद्रोहाचे जे निशाण उभारलं ते आदिवासी साहित्यिकांनाही मार्गदर्शक ठरणार आहे. केशवसुतांनंतर मराठी साहित्यात फडके–खांडेकरांचं युग आलं. 'रंगाखातर रंगू नच रिझवाया नच खिजवाया' असा प्रकार चालू होता. त्याला दलितसाहित्याने जबरदस्त धक्का दिला. त्याच्या पुढचा धक्का आदिवासी साहित्याने दिला पाहिजे. विधायक कामाचं महत्त्व मी मानतो; पण संघर्षाशिवाय गत्यंतर नाही. दलितांनी तो केला. आदिवासींनी तो सुरू केलेला आहे. तो त्यांना तडीस न्यावयाचा आहे. शोषितांच्या सर्व शक्ती एकवटल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत. कल्याणकारी राज्यात सत्ताधाऱ्यांकडे साधनांची अनुकूलता असते, सध्याच्या काळात सत्ताधारी आणि प्रस्थापित हे वेगळे नाहीत. बंडखोरपणाची ऊर्मी घालविण्यासाठी ते प्रलोभनं दाखवितात. त्याला बरेच लोक वश होतात. 'मंत्रेचि वैरी जरी मरी तरी बाया का बांधावी कटयारे ?' हे दुर्दैव आहे. हे काम सोपं नाही.

# आदिवासी साहित्य आणि समाजकार्य
## परस्परसंबंध व वाटचाल

**प्रख्यात साहित्यिक–विचारवंत व महाराष्ट्र मानव विज्ञानपरिषदेचे अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार यांच्या वयाला रविवार २ ऑक्टोबर १९८३ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने महाराष्ट्रातील आदिवासी साहित्यिक व नवसमाजनिर्मितीसाठी प्रयत्नशील असणारे कार्यकर्ते यांच्यात सुसंवाद साधला जावा या दृष्टीने शनिवार दि. १ ऑक्टोबर व रविवार दि. २ ऑक्टोबर १९८३ रोजी पुणे येथे एका चर्चासत्राचे आयोजन महाराष्ट्र मानवविज्ञानपरिषदेच्या वतीने करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये महाराष्ट्राच्या विविध भागांतील सुमारे ५० आदिवासी साहित्यिक व कार्यकर्ते सहभागी झाले.**

परिषदेचे सचिव प्रा. मुटाटकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये परिषदेच्या स्थापनेमागचा उद्देश स्पष्ट करून परिषदेने आजवर केलेल्या विविध उपक्रमांसंबंधी; तसेच परिषदेच्या वतीने प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या 'हाकारा' त्रैमासिकासंबंधी माहिती दिली. या चर्चासत्रामध्ये साहित्यिक व कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन आदिवासी साहित्य व आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक प्रश्न यांविषयी मनमोकळी चर्चा करावी असा उद्देश असल्याचे सांगितले. २ ऑक्टोबर १९८३ पासून प्रा. सरदार परिषदेच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होत असून धुळे जिल्ह्यातील ज्येष्ठ आदिवासी कार्यकर्ते जनार्दनमहाराज दळवी परिषदेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेत असल्याचेही प्रा. मुटाटकर यांनी यावेळी जाहीर केले.

परिषदेचे उपाध्यक्ष श्री. शरद कुलकर्णी यांनी या चर्चासत्राद्वारे आदिवासी साहित्यिक व समाजकार्यकर्ते यांच्या परस्पर सहकार्याने एका ठोस कामाची सुरुवात व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

उपस्थितांच्या परस्पर परिचयानंतर प्रा. सरदार यांनी या चर्चासत्राचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. प्रा. सरदार यांच्या उद्घाटनपर भाषणानंतर चर्चा खुली झाली. चार सत्रांमध्ये प्रामुख्याने पुढील विषयांवर चर्चा झाली.

१) आदिवासी साहित्य : स्वरूप व वाटचाल

२) आदिवासी समाजकार्य व चळवळी

३) आदिवासी साहित्य व समाजकार्य यांमधील परस्पर संबंध

४) आदिवासी साहित्य व समाजकार्य यांची पुढील दिशा व स्वरूप.

□

### साहित्य : स्वरूप व वाटचाल

पहिल्या सत्राच्या 'आदिवासी साहित्य : स्वरूप व वाटचाल' या विषयावर बोलताना श्री. राजाभाऊ राजगडकर म्हणाले, बिगर आदिवासींनी आदिवासींवर केलेलं संशोधनपर लिखाण हाही आदिवासी साहित्याचा एक वैचारिक भाग आहे. आदिवासींच्या उत्थानासाठी त्यांच्या उत्थानाचं व पतनाचं विवेचन करणारं जे जे साहित्य लिहिलं जाईल ते ते आदिवासी–साहित्य होय. या वैचारिक साहित्याव्यतिरिक्त कथा, कादंबऱ्या इ. प्रकार अजून आदिवासी साहित्यात आले नाहीत.

आदिवासी साहित्याचा प्रवाह निर्माण होणं का आवश्यक आहे? पुरोगामी साहित्यचळवळ, ग्रामीण साहित्यचळवळ, दलित साहित्यचळवळ इ. असताना वेगळी आदिवासी साहित्यचळवळ का?

भारतीय समाजामधली दुःखं जातिगत आहेत. ग्रामीण साहित्य हे ग्रामीण भागातील कुणबी, मराठा, माळी, तेली, साळी या श्रमजीवी वर्गाचं साहित्य आहे. दलित साहित्य हे गावकुसाबाहेर ठेवलेल्या उपे-

क्षितांचे साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे रानावनांत राहणाऱ्यांचं जीवन व्यक्त करणारं साहित्य आहे. आदिवासींच्या व दलितांच्या दुःखांची कारणं आणि स्वरूप वेगळं आहे. ग्रामीण मजुराचं दुःख आर्थिक स्वरूपाचं आहे, अस्पृश्यतेचं नाही. दलितांचं दुःख अस्पृश्यतेचं तसंच आर्थिक स्वरूपाचंही आहे. आदिवासींचं दुःख हे आदिम मानवाचं दुःख आहे, त्याला अजून माणुसकीच्या प्रवाहामध्ये आणलं गेलेलं नाही. माणुसकीच्या प्रवाहापासून वंचित ठेवण्याचं कटकारस्थान जाणीवपूर्वक या देशातील संस्कृतीनं केलं असा आमचा आरोप आहे. म्हणून त्याच्या दुःखाचे संदर्भ वेगळे आहेत. या आदिवासींना पुन्हा मुख्य प्रवाहामध्ये आणावयाचे असेल तर त्यांचे सर्व प्रश्न वेगळे राहणार, त्यांची उत्तरं वेगळ्या पद्धतीनं शोधावी लागतील. आदिवासींच्या जीवनामध्ये आत्मप्रत्ययाची जाणीव जागृत करावयाची असेल तर त्यासाठी वेगळा आशय घेऊन येणारे शब्द शोधावे लागतील. म्हणूनच आदिवासी साहित्याचा प्रवाह हा वेगळा ठरतो. दलितचळवळ आदिवासींच्या जीवनाला स्पर्श करू शकली नाही. त्यामुळे साहित्य, समाजकारण इ. क्षेत्रात आदिवासींनी वेगळी पाऊलवाट स्वीकारणं, वेगळा हुंकार व्यक्त करून आपल्या उद्धाराचा मार्ग स्वीकारणं हे अपरिहार्य ठरतं. त्यामुळं त्याच्या व्यथा-वेदनांची अभिव्यक्ती ही वेगळ्या पद्धतीनं होईल हे कोणीही नाकारू शकणार नाही. आदिवासी साहित्याच्या या प्राथमिक स्वरूपाला प्रोत्साहन मिळणं आवश्यक आहे. आदिवसी साहित्यिकांचे पहिलेवहिले हुंकार असतील तसे प्रसिद्ध करा. त्याला कलात्मकतेचे निकष एवढ्यातच लावू नका. त्याचे शब्द जसेच्या तसे प्रसिद्ध करून त्याच्या चुकांची जाणीव त्याला करून द्या. या प्रकारेच त्यांचं साहित्य विकसित होऊ द्या. या पद्धतीनंच आदिवासींचं दुःख तो समर्थ शब्दात व्यक्त करू शकेल.

आदिवासींमध्ये कार्य करणारे अनेक लोक आहेत. अनुताईसारख्यांनी संपूर्ण आयुष्य कोसबाडमध्ये आदिवासींच्या कल्याणासाठी घालविलं आहे, गोदुताई परुळेकरांनी आदिवासींमधला माणूस जागृत करण्याचे कसोशीने प्रयत्न केले. तरीही हा आदिवासी अजूनही खडबडून जागा का होत नाही ? आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलित चळवळ फोफावली, तिने प्रस्थापितांना हादरे दिले. आदिवासींच्या बाबतीत असं का घडलं नाही ? एखाद्या ठिकाणी जन्माला येणारा आंबेडकर वणव्यासारखा पसरतो. अनुताईसारख्यांना एका जागी बंदिस्त का व्हावं लागतं ? आजचा आदिवासी तरुण हे सर्व स्वतःच्या लेखणीचं हत्यार घेऊन तपासणार आहे. सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक हे सगळे संदर्भ तपासणार आहे. या सगळ्यातून आदिवासी साहित्य फुलत जाणार आहे. दलित चळवळीला आंबेडकरांचं छत्र लाभलं तशा प्रकारचं छत्र या देशातल्या आदिवासी चळवळीला लाभतं की नाही हा आदिवासींच्या विकासाचा मूलभूत प्रश्न आहे. आदिवासींच्या विकासाचा केवळ देखावा निर्माण करण्याचं तंत्र या देशात उभं राहत नाही ना हा खरा प्रश्न आहे. स्वातंत्र्यानंतर ३५ वर्षांनंतर सुद्धा आत्मप्रत्ययाची जाणीव होऊन आदिवासी का पेटत नाही ? हा खरा प्रश्न आहे. हे सगळे संदर्भ तपासत आदिवासी आपलं साहित्यशिल्प घडवणार आहे.

—माझी अवदशा का झाली ?

—माझ्यावर ही गुलामी कोणी आणि का लादली ?


—मी या देशामध्ये खरोखरच मागासलेला आणि गुलाम होतो का ?

या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरं आदिवासी साहित्यिक–कार्यकर्त्यांना शोधावयाची आहेत.

## प्रगतिशील साहित्यिकाची गरज

ज्येष्ठ आदिवासी कार्यकर्ते श्री. ऋषी मसराम म्हणाले, ' महाराष्ट्रातल्या प्रथितयश लेखकांनी आदिवासींच्या जीवनावर लिहिलं नाही. गोंडांनी १५० वर्षं महाराष्ट्रात राज्य केलं; पण त्यांचा इतिहास उपलब्ध नाही. पारंपारिक निसर्गानुभव, ललितसाहित्य व काव्यात्मकता यात अडकून न राहता आदिवासींच्या जीवनाचे सत्य चित्रण ज्यात असेल असे प्रगतिशील साहित्य निर्माण व्हावे, तसेच शासकीय विकास योजनांची माहिती देणारे साहित्यही निर्माण होण्याची गरज आहे मानवविज्ञानपरिषदेच्या कार्यात अधिकाधिक आदिवासी कार्यकर्त्यांना समाविष्ट करून घेण्यात यावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

भद्रावती येथे झालेल्या पहिल्या आदिवासी साहित्यसंमेलनाचे संयोजक श्री. विनायक तुमराम यांनी महत्त्वाचे विचार मांडले



**चर्चेस प्रा. सरदारांचे मौलिक मार्गदर्शन**

*

राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांच्या ग्रामगीतेमध्ये खेड्याविषयी उल्लेख आहे.

—खेड्याकडे चला म्हणता
कसलीही सोय नाही पाहता
घरे कसली खुडेची तत्वत:
डुक्कर कुडे–खुराडे

अशा या खुराड्यातून, डुक्कर–खुबड्यांतून बाहेर पडलेले आम्ही आदिवासी नवतरुण आहोत. महाराष्ट्रामध्ये आदिवासी साहित्याची चळवळ निर्माण करण्यापूर्वी इतर व्यासपीठांवरून प्राप्त झालेले अनुभव अतिशय दाहक आणि सावत्रपणाचे आहेत. ग्रामीण साहित्य चळवळ, नवसाहित्य चळवळ, अस्तित्ववादी साहित्याची चळवळ, दलित साहित्य चळवळ यांपैकी कोणत्याही साहित्य चळवळीने आदिवासी जीवनाला स्पर्श केलेला नाही. त्यामुळेच वेगळे आदिवासी साहित्यसंमेलन भरविण्याची गरज भासली. ज्ञानदेवांपासून राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांपर्यंत संतसाहित्य चळवळीने चातुर्वण्याचा पुरस्कार केलेला आहे. एकाही संताचे साहित्य आदिवासी जीवनाला स्पर्श करू शकलेले नाही.

'देवा तुझ्याकडे काय
अमुचे ते होय पूर्वकर्म'

असं म्हणणारा चोखामेळा आणि संतश्रेष्ठ तुकारामाच्या—

'ब्राह्मण जरी झाला कर्मभ्रष्ट
तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ तुका म्हणे।'

अशा प्रकारच्या उक्तीतून समाजाला जे दिलं गेलं त्याने काही आदिवासींची मुक्ती होऊ शकली नाही. संतसाहित्य–चळवळीप्रमाणेच दलित साहित्य–चळवळीनेही आदिवासी जीवनाला न्याय दिलेला नाही. दलित साहित्याची जाणीव आणि प्रेरणा हीच मुळी आदिवासी जाणिवेला नाकारणारी आहे. त्याचं कारण आदिवासी जीवनाचा आधार संस्कृती आहे, धर्म आहे. आदिवासी जीवनाचं स्वतंत्र दालन आहे, स्वतंत्र अस्मिता आहे, स्वतंत्र जाणिवेने आदिवासी जगतो आहे.

## आदिवासी साहित्यिकांपुढे आव्हान

काहीच आदिवासी साहित्य निर्माण झालेलं नाही, असं नाही. थोडंफार झालेलं आहे. त्यात बहुतांशी बिगरआदिवासींनी लिहिलेलं आहे. दुःखांतून, वेदनांतून जाणारा माणूसच या व्यथावेदना प्रखरपणाने व्यक्त करू शकेल. आदिवासी–जीवन प्रत्यक्ष जगलेला

आदिवासी माणूस साहित्य निर्माण करेल आणि त्याचं साहित्य घराघरात जाईल त्याच वेळी आदिवासी साहित्याचं स्वप्न पुरं झालं असं म्हणता येईल. आदिवासी जीवनाची अभिव्यक्ती नेमकी व्यक्त करणारं साहित्य तेच खरं आदिवासी साहित्य. आदिवासी साहित्यिकांपुढं हे आव्हान आहे.

आदिवासी कवी व कार्यकर्ते श्री. वाहरू सोनावणे यांनी आदिवासी बोलीत आपले विचार मांडले– साहित्याच्या व कलात्मकतेच्या कसोट्या लावणारे, हे कोण ? यांनाच केवळ समजते ? आम्हाला नाही ? आम्हालाही समजते. अडथळा दूर करणारे हे कोण ? अडथळा दूर करण्याची ताकद आपल्यामध्ये निर्माण होणं महत्त्वाचं आहे. साहित्य कशाला म्हणायचे ? ते सांगणारे हे कोण ? कविता, लेख म्हणजे साहित्य आणि बाकीचं काय ? आदिवासी गीतं म्हणजे साहित्य नव्हे काय ? आदिवासींचं जे साहित्य आहे ते लिखित स्वरूपात नाही. आदिवासी साहित्याची खरी ओळख आपल्याला पटलेली नाही. रात्ररात्रभर आम्ही आदिवासी गाणी गात असतो, गोष्टी सांगत–ऐकत असतो, लिहीता येत नसूनही आदिवासींनी हे लोकसाहित्य पिढ्यान्‌पिढ्या जसंच्या तसं जतन करून ठेवलेलं आहे. साहित्याची व्याख्या आपण अधिक व्यापक केली पाहिजे. दडपणाशिवाय, मनमोकळेपणाने उत्स्फूर्ततेने निर्माण होतं तेच खरं साहित्य. गुलामीतल्या साहित्याला अर्थ नाही. उघड्या डोळ्यांनी दुनिया पाहून ज्या प्रतिक्रिया स्वाभाविकपणे उमटतील ते साहित्य.

आपला समाज, संस्कृती यापासून ज्यांचा संपर्क तुटलेला आहे अशा शहरीकरण झालेल्या आदिवासींचं साहित्य हे खरं आदिवासी साहित्यच नव्हे. साहित्य हे जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारं, सर्वांगीण असलं पाहिजे. समाजाची प्रगती, विकास होईल असा दृष्टिकोन साहित्याने दिला पाहिजे. समाजामध्ये जे अनेक प्रश्न आहेत त्यांसंबधीदेखील साहित्याची जबाबदारी मोठी आहे.

मसरकोल्हेगुरुजींनी समन्वयाची भूमिका मांडली. पांढरपेशांना डावलून आम्हाला चालणार नाही. पांढरपेशांकडून मिळालेल्या स्फूर्तीचं स्मरण आपण ठेवलं पाहिजे. अभिजात साहित्याच्या वाचनानेच आपल्याला साहित्यनिर्मितीची प्रेरणा मिळालेली आहे, हे प्रांजळपणे मान्य केलं पाहिजे. आदिवासी साहित्यिक हा जन्माने आदिवासी असला पाहिजे असं नाही. जी व्यक्ती एका विशिष्ट जीवनानुभूतीशी समरस होते ती त्याच्याशी इमान राखून साहित्यनिर्मिती करू शकते.

¤

## ‘समाजकार्य व चळवळी’

दुसऱ्या सत्राचा विषय ‘आदिवासींमधील समाजकार्य व चळवळी’ असा होता. श्री. शरद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक करून रोजगारहमी, किमान वेतन, बांधील मजूरप्रश्नासंबंधी आदिवासींमध्ये कार्य करणाऱ्या विविध संघटना करीत असलेल्या चळवळींची माहिती दिली. ठाणे जिल्ह्यातील भूमिसेनेने लग्नाचा खर्च कमी करण्यासाठी चालविलेल्या सामुदायिक लग्न चळवळीची माहिती दिली. आदिवासींच्या वनविषयक हक्कांवर गदा आणू पाहणाऱ्या अनेक तरतुदी असलेले संकल्पित वनविधेयक संसदेत मांडले जाऊ नये यासाठी आदिवासींमध्ये काम करणाऱ्या देशभरच्या संघटनांनी एकत्र येऊन केलेल्या यशस्वी मोहिमेची माहिती त्यांनी दिली. ‘मुका, दुबळा’ हे आदिवासींचे जुने चित्र बदल पहात असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

ज्येष्ठ आदिवासी कार्यकर्ते श्री. जनार्दनमहाराज वळवी यांनी धुळे जिल्ह्यातील स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील चळवळींची माहिती दिली. आदिवासी समाजाला रसातळाला नेणाऱ्या दारूच्या व्यसनापासून त्यांना मुक्त करण्यासाठी संतपुरुष गुलाबरावमहाराज यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात सुरू केलेले कार्य शंकरराव ठकार, काकासाहेब बर्वे व बाळूभाई मेहता यांनी पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळाच्या वतीने पुढे चालविले. मटण व दारू घेणारे व न घेणारे असे दोन गट आदिवासींमध्ये पडले. संघर्ष निर्माण झाला. संघर्षातून रामदासमहाराजांना हद्दपारीची शिक्षा झाली. कित्येक आदिवासी घरे, दारे, जमिनी सोडून त्यांच्याबरोबर निघून गेले. १९४२ च्या चलेजाव चळवळीतदेखील आदिवासी सहभागी झाले होते. त्या वेळी झालेल्या गोळीबारात कित्येक आदिवासी मृत्युमुखी पडले. दादासाहेब सौंदाणकर यांनी सावकारांकडे गेलेल्या आदिवासींच्या जमिनी परत मिळवून देण्यासाठी सर्वोदयी कार्यकर्त्यांच्या मदतीने चळवळ उभारली. शहादे तालुक्यात गोळीबार झाला. त्यात पांढरपेशांनी १० आदिवासींना आरोपी ठरविले. चौकशीनंतर आदिवासी निर्दोष सुटले व खऱ्या आरोपींना शिक्षा

झाली. बाळासाहेब खेरांच्या कारकीर्दीत सुरू झालेली सहकारी चळवळ आदिवासींना स्वावलंबी बनविण्यात अयशस्वी ठरली.

□

## जागृतीसाठी संघर्ष

अंबरसिंगमहाराज यांनी भजनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जागृती केली. संघर्षाशिवाय जागृती नाही या निष्कर्षाप्रत आल्यानंतर त्यांनी श्रमिक संघटनेची स्थापना केली. अंबरसिंगमहाराज व जनार्दन महाराज यांनी काही काळ एकत्र काम केले; परंतु आदिवासींचा विकास व्हावयाचा असेल तर प्रथम त्यांच्या बुद्धीचा विकास झाला पाहिजे या दृष्टीने जनार्दनमहाराजांनी आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या वतीने प्राथमिक व माध्यमिक शाळा, वसतिगृहे, आश्रमशाळा चालविल्या जातात. आपली प्रगती आपणच केली पाहिजे, दुसऱ्याला दोष देण्यात अर्थ नाही. शिक्षणाशिवाय डोळसपणा येत नाही. शिक्षण घेतल्याशिवाय व व्यसनमुक्ती झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने प्रगती होणार नाही असे प्रतिपादन त्यांनी केले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती अनुताई वाघ यांनी काही मौलिक विचार मांडले. त्या म्हणाल्या– संघर्षाचा अर्थ नीट समजावून घेतला पाहिजे. संघर्ष करायचाच झाला तर तो दारूच्या व्यसनाविरुद्ध करा. आपल्या पायाखाली काय जळतंय ते प्रथम पाहिलं पाहिजे. पू. ठक्करबाप्पा, आचार्य भिसे यांचं आदिवासी क्षेत्रातलं कार्य फार मोठं आहे. आचार्यांनी आपल्या 'जंगलातील छाया' या पुस्तकात आदिवासींवर होणाऱ्या भीषण अन्यायाचं वर्णन केलं आहे. जिवंत माणसाला पेटत्या भट्टीत टाकल्याची हकिकत त्यात आहे. आदिवासींची केविलवाणी परिस्थिती मी मनात ठेवीन. त्याचं उघडं नागडं प्रदर्शन करणार नाही. आदिवासी हा जंगलचा राजा आहे. वारल्यांमध्ये एक गाणं आहे–

**'ब्राह्मण होशील तर लिखू लिखू मरशील**
**वारली होशील तर जंगलचा राजा होशील !'**


कुणी म्हणेल मग तुम्ही आम्हाला जंगलचे राजेच ठेवणार आहात का ? तर नाही– शिक्षणानेच आदिवासींची प्रगती होऊ शकेल. मात्र शिक्षण शांतपणे केलं पाहिजे. दीर्घ प्रयत्नांनंतर आता आदिवासींना शिक्षणाची गोडी लागू लागली आहे. कोसबाडच्या ग्रामबाल शिक्षा केंद्राच्या बालवाड्या व अंगणवाड्यांमध्ये आदिवासी स्त्रिया आपली मुलं आपणहून स्वच्छ करून पाठवू लागल्या आहेत. खायला नसलं तरी चालेल; पण बसवून घ्या असा आग्रह करू लागल्या आहेत. शिकलेल्या आदिवासींचा लोंढा शहराकडे वळू न देता परत त्यांच्या गावाकडे वळवला पाहिजे. शहराकडे गेलात तर तुमची गावं कशी सुधारणार ? मी माझ्या गावात, पाड्यावर, वस्तीवर जाऊन लोकांना दारू, अंधश्रद्धा, आळस यांच्या कचाट्यातून सोडवणे, लोकांना सुधारीन ही हिंमत धरणाऱ्या एका गावात ठाम बसून गाव सुधारण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या स्वयंसेवक, स्वयंसेविकांचा ताफा उभा करणे आवश्यक आहे. आम्ही यांना सुधारण्याचा प्रयत्न करतो तर मागासलेल्यांना सरकारी सवलती मिळतात म्हणून हे मागासलेले राहू इच्छितात, आम्हाला मागासवर्गात टाका असा आग्रह धरतात. हा तिढा सुटणार कसा ? आदिवासींमध्ये कित्येक चांगल्या प्रथा आहेत. ते बायकांना त्रास देत नाहीत, त्यांचा सन्मान करतात. दारू पिऊन माजले तरच मारतात. एक आदिवासी स्त्री म्हणाली– नवरा माजला तर मार खायचा ' –ते मुलांच्या अंगाला हात लावत नाहीत. त्यांची संस्कृती फार चांगली आहे. जी काही उणीव आहे ती शिक्षणाने, सतत प्रयत्नाने दूर करावयाची आहे.

□

## संस्कृतीत भिन्नता

गेली कित्येक वर्षे आदिवासी क्षेत्रात कार्यरत असलेले ज्येष्ठ कार्यकर्ते दादासाहेब बिडकर म्हणाले, महाराष्ट्रात मानवशास्त्रीयदृष्ट्या भिन्न भिन्न आदिवासी जमाती आहेत वेगवेगळ्या भौगोलिक परिस्थितीत ते राहतात. नासिक जिल्ह्यात कोकणा जमिनधारक आहेत, महादेव कोळ्यांकडे थोडी जमीन आहे, तर भिल्ल भूमिहीन आहेत. जमीन असणारे व नसणारे यांचे आचार–विचार व संस्कृती भिन्न आहे.

जंगल कामगार संघाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये बिगर-आदिवासी नकोत असा एक कायदा सरकारने केला. जंगल कामगार सहकारी सोसायट्या पुढं धनिकांच्या ताब्यात गेलेल्या आहेत. संघर्षाशिवाय काम होणार नाही. शिक्षणानं प्रगती झाली तरी कदाचित तो लाचार होण्याचा संभव आहे. आदिवासींना अन्यायाविरुद्ध



आदिवासी साहित्यिक व नवसमाजनिर्मितीसाठी प्रयत्नशील कार्यकर्त्यांत रंगलेली चर्चा

*

संघर्ष करायला, प्रतिकार करायला शिकविलं पाहिजे. आदिवासी आदिवासींवर अन्याय करतो ते कित्येकदा बाहेर येत नाही. आदिवासी उपयोजनेच्या अंमलबजावणीसाठी आदिवासी आमदार, खासदार यांची विशेष कार्यकारी समिती असते. तीच या योजनेच्या अंमलबजावणीचा निर्णय घेते. महाराष्ट्रात २०–२२ आदिवासी आमदार आहेत. आदिवासी कल्याण योजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी आदिवासी आमदार सभासद असलेली 'ट्रायबल कौन्सिल' आहे. महाराष्ट्र राज्यात सुमारे १३० कोटी रुपये आदिवासी कल्याणावर खर्च केले जातात. हा सर्व पैसा प्रत्यक्ष आदिवासींपर्यंत पोहोचतो का नाही याविषयी शंका आहे. नासिक जिल्ह्याच्या पेठ तालुक्यामध्ये आदिवासी उपयोजनेतून उपअभियंत्यांचे बंगले बांधले गेले. या सर्व परिस्थितीवर बोलणाऱ्या, डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवणाऱ्या, त्याचा जाब विचारणाऱ्या लोकांची जरुरी आहे. सुशिक्षित आदिवासी तरुणांनी हे काम केले पाहिजे. मानवशास्त्र, समाजशास्त्राच्या प्राध्यापकांनी, अभ्यासकांनी या प्रश्नांचा अभ्यास करून त्याचे निष्कर्ष समाजासमोर मांडले पाहिजेत. आदिवासी कल्याणासाठी कार्यरत असणाऱ्या शासनाच्या विविध खात्यांमध्ये आदिवासी विकासकार्यात सुसूत्रता असली पाहिजे.

प्रसंग पडला तर शासकीय अधिकाऱ्यांशी संघर्ष करावा लागेल. मात्र ज्याच्यासाठी संघर्ष करावयाचा त्याने हातपाय गाळता कामा नयेत. सामाजिक–आर्थिक परिवर्तनासाठी प्रयत्न करताना येणारे अनुभव आदिवासी-बिगरआदिवासी कार्यकर्त्यांनी टिपून ठेवायला हवेत. त्यातून साहित्य निर्माण होऊ शकेल. आदिवासींचं संगीत, उत्सवातली, लग्नसमारंभातली गाणी, आख्यायिका यातून किती तरी साहित्य निर्माण होऊ शकेल. शिक्षणाचा व साहित्याचा संबंध आहेच असं नाही. सामान्य आदिवासी कित्येकदा ज्या म्हणी सांगतो, उपमा, उदाहरणे देतो ती शिकल्यासवरलेल्यांनादेखील देता येणार नाहीत. आजवरचा अनुभव असा आहे की, सुशिक्षित आदिवासींचं आपल्या समा-

जाशी, संस्कृतीशी नातं तुटतं– आपली भाषा, संस्कृती, आशा–आकांक्षा तो विसरतो. आदिवासींचा स्वभाव सगळ्या जगात एक आहे. आदिवासींचं साहित्य हे प्रेमाचं साहित्य असेल, निसर्गाशी नातं सांगणारं साहित्य असेल. आदिवासी हा मूलत: विनोदप्रिय आहे. आपली गाऱ्हाणी, व्यथा तो सांगत बसणार नाही. आदिवासी हा पराक्रमी, साहसी आहे. अन्यायाविरुद्ध संघर्षासाठी त्याला तयार केलं पाहिजे.

धुळे जिल्ह्यातील श्रमिक संघटनेचे कार्यकर्ते श्री. वाहरू सोनावणे म्हणाले, 'समाजसुधारणा बाहेरून लादण्यापेक्षा स्थानिक लोकांचा सल्ला घेऊनच योग्य दिशेने होऊ शकेल.

सवर्ण समाज व दलित, आदिवासी यांची बरोबरी करता येणार नाही. हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या दलित व आदिवासींना सरकारी सवलती मिळणे योग्यच आहे

दारू हा आदिवासींच्या भूकेवरचा उपाय आहे. दारूच्या व्यसनाच्या मुळाशी असणाऱ्या कारणांचा शोध घेतला गेला पाहिजे.

आदिवासीच आदिवासी योजना बनवतात हे वरवर दिसत असले तरी त्यामागे इतर कोणाचे धागेदोरे आहेत, कोणाचे हितसंबंध जोपासले जातात याचा तपास करणे आवश्यक आहे.

ज्या साहित्याचा प्रगतिशील, विकसनशील समाज-व्यवस्थेशी संबंध आहे तेच साहित्य जिवंत होईल.

समाजकार्यामध्ये रचनात्मक व संघर्षात्मक असे विभाजन करणे घातुक आहे.

आजची शिक्षणपद्धती जाणीव निर्मिती करणारी नाही. ती माणसाला परावलंबी बनवणारी आहे.

कोणतीही सामाजिक चळवळ प्रतिक्रियात्मक नसावी.'

आदिवासी साहित्यिक श्री. ऋषी मसराम म्हणाले, आदिवासींमध्ये जागृती होत आहे. स्वयंनेतृत्वाकडे त्यांची वाटचाल सुरू झालेली आहे. आदिवासी समाजात जे नवीन नेतृत्व निर्माण होत आहे त्याचे पाय न ओढता त्याच्या योग्य गुणांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. 'आदिवासींच्या सामाजिक चळवळीत आदिवासींचे योगदान' यावरील आपले टिपण त्यांनी वाचले.

आदिवासी साहित्यिक श्री. विनायक तुमराम यांनी आदिवासी संस्कृतीची उन्नती अभिजात संस्कृतीला मारक ठरेल असा अभिप्राय मराठी साहित्यात नमूद होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली.

या सत्राचा समारोप करताना प्रा. मुटाटकरांनी आदिवासी चळवळीचे नेतृत्व आदिवासी व बिगर-आदिवासी दोन्ही प्रकारचे कार्यकर्ते करत असताना-देखील त्यात गैरव्यवहार होतो हे निदर्शनास आणून अजूनही आदिवासींना बौद्धिक नेतृत्व आदिवासी समाजातून मिळत नाही ही वस्तुस्थिती असल्याचे प्रतिपादन केले.

□

## ' साहित्य व समाजकार्य '

१ ऑक्टोबरला रात्री कवि-संमेलनाचा रंगतदार कार्यक्रम झाला. वाहरू सोनावणे, भुजंग मेश्राम, निळकांत कुलसंगे, विनायक तुमराम, राजाभाऊ राजगडकर, संघजा मेश्राम, रामसिंग ठाकरे, सुभाष आडे, विठ्ठलराव सन्नात्रे, सूर्यभान नागभिडे व मसरकोल्हेगुरुजी यांनी आपल्या कविता सादर केल्या. श्री. भुजंग मेश्राम यांनी उत्कृष्ट संचालन केले.

□

२ ऑक्टोबर रोजी सकाळी झालेल्या तिसऱ्या सत्राचा विषय 'आदिवासी साहित्य व समाजकार्य यांचा परस्पर संबंध' असा होता.

श्री. शरद कुलकर्णी यांच्या प्रास्ताविकानंतर श्री रा. वि. पाटणकर यांनी सांगितले की, केंद्रशासनामध्ये सुमारे १५ वर्षे आदिवासी आयुक्तपद भूषविणारे श्री. एल. एम. श्रीकांत आज ८६ वर्षांचे आहेत. म. गांधींच्या सल्ल्यानुसार श्रीकांतभाई गुजराथेतील पंचमहाल जिल्ह्यात पू. ठक्करबाप्पांबरोबर काम करू लागले. ठक्करबाप्पा सांगतील ती कामे केली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर श्रीकांतभाई यांचा आदिवासी क्षेत्रातील दीर्घ अनुभव लक्षात घेऊन पं. नेहरूंनी त्यांची आदिवासी आयुक्त-पदी नियुक्ती केली. आदिवासी कल्याणाच्या योजनांचे प्रारंभीचे काम श्रीकांतभाईंनी केले.

राजाभाऊ राजगडकर म्हणाले – साहित्य आणि समाज यांचा संबंध चिखल आणि पाण्यासारखा आहे. शत्रूच्या तोफांविरुद्ध निधड्या छातीचे वीर उभे करण्याचे सामर्थ्य शब्दांमध्ये आहे. माणूस केवळ शारीरिक शक्तीनेच लढतो असं नाही तर त्यामागे

असणारे पोलादी मन माणसाला लढण्यास प्रवृत्त करत असते. हे पोलादी मन निर्माण करण्याचे सामर्थ्य शब्दांमध्ये आहे. शब्दच नसते, शब्दशक्ती नसती तर मनुष्य आज जेथे आहे तेथे नसता, संस्कृतीची जडण-घडण आणि आजची विज्ञानसंस्कृती निर्माण झाली नसती. आदिवासींच्या संदर्भात शब्दसामर्थ्य कसे वापरायचे? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ३५ वर्षांनंतरही आदिवासी आहे तेथेच का आहे? हा आदिम प्रश्न आहे. उत्तर अजूनही सापडत नाही. त्याच्या दुःखाचं समूळ उच्चाटन करावयाचे असेल तर प्रथम गरज आहे ती त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याची. मी माणूस आहे, मला इतिहास आहे, या देशाच्या इतिहासात मला गौरवशाली स्थान आहे हे त्याच्या मनावर बिंबवले पाहिजे. उत्थानाच्या अत्युच्च शिखरावरून पतनाच्या खोल गर्तेत तो कसा पडला याची कारणं त्याला सांगितली पाहिजेत. या देशाच्या संस्कृतीने आम्हाला पतनाच्या खोल गर्तेत गाडलं आहे. कट, कारस्थान व फितुरी यामुळे आम्ही बरबाद झालो आहोत. देश हलवून टाकणारी शक्ती आदि-वासींमध्ये निर्माण करावयाची असेल तर त्याचा इतिहास त्याला सांगितला पाहिजे. केवळ कथा आणि कविता म्हणजेच साहित्य नव्हे, तर साहित्य हे इतिहासाच्या माध्यमातूनही सांगता येते. आदि-वासींच्या गौरवशाली इतिहासासंबंधीचे आपले टिपण राजगडकर यांनी वाचले.

वाहरू सोनावणे म्हणाले— साहित्य आणि समाज यांचं अतूट असं नातं आहे. ज्या समाजात आपण राहतो जो समाज आपण उघड्या डोळ्यांनी पाहिलेला असतो, कानाने ऐकलेलं असतं, त्यातून विचार प्रवाह फुटत असतो आणि हा प्रवाह कवितेतून, कथेतून व अन्य लिखाणातून व्यक्त होत असतो आणि त्यातूनच जन-जागृती होत असते. हीच साहित्याची खरी शक्ती असते. साहित्य हे सर्वांगीण असलं पाहिजे तसंच समा-जाच्या ज्वलंत प्रश्नांना सार्थ करणारं असलं पाहिजे. वेठबिगारी, शेतमजुरांचा प्रश्न, लग्नगडी, प्रथा इ. सामाजिक–आर्थिक प्रश्नांबाबत साहित्यिकाने काही तरी ठाम भूमिका घेतली पाहिज.

□

## साहित्याची भूमिका

लहान मुलांच्या सामाजिकरणामध्ये / संस्कृति-करणामध्ये साहित्याची भूमिका फार महत्त्वाची आहे. लहान मुले शाळेत काय शिकतात? तर मी शिकून नोकरीला लागेन, साहेब बनेन. सध्याच्या शिक्षणपद्ध-तीत श्रमाला काहीही महत्त्व दिलेले नाही. सध्याच्या शिक्षणपद्धतीत विद्यार्थी परावलंबी बनतो. त्याला स्वतःच्या पायावर उभा करू शकणारी, तसेच श्रमाला महत्त्व देणारी शिक्षणपद्धती निर्माण करणं हे समा-जाचं कर्तव्य आहे.

समाजपरिवर्तनाच्या चळवळीतून साहित्य आपोआप निर्माण होतं. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळी-मध्ये गाणं होतं—

**'मराठवाड्याला काय रं झालं**
**आंबेडकराचं नाव नाही दिलं**
**न् दलिता जागा होरं**
**आता तरी न्याय मिळव तरी.'**

दलित, श्रमिक यांनी एक झालं पाहिजे हेही गाण्या-तून सांगितलेलं आहे.

**'दलित श्रमिक एक होऊ**
**आता नाही मार खाऊ**
**न् दलिता जागा हो रं**
**आता तरी न्याय मिळव तरी.'**

स्त्री ही पुरुषाच्या गुलामगिरीत आहे. त्यातून तिची मुक्तता व्हायला पाहिजे हे लोकांच्या मनावर ठसविण्या साठी नंदुरबारला स्त्री मुक्ती परिषद भरली होती. त्या संदर्भात स्त्रियांनी गाणं केलं— 'चला नंदुरबारी स्त्री मुक्ती परिषद' ज्याच्या त्याच्या तोंडी आसपासच्या भागात हे गाणं होतं. सत्ताधारी पक्षाच्या गरिबी हटाव सारख्या तकलादू घोषणांची टर उडवणारं मिस्किल गाणं प्रचलित होतं—

**'धक्के खाऊ पोटाभरती**
**महागाईले ना डरियो**
**हटा दुंगी देशकी गरीबी**
**तुम देखते रहियो.'**

चळवळीशी, समाजाशी जिवंत नातं असेल तरच या प्रकारे साहित्य व्यक्त होऊ शकतं.

डॉ. उत्तमराव धोंगडे यांनी शासकीय अधिकाऱ्यां-कडून, पोलिसांकडून आदिवासींवर अत्याचार होत असल्याची तक्रार करून एका आदिवासी तरुणाला बळजबरीने मनोरुग्ण ठरविण्यात आल्याची घटना सांगितली. राजकीय पक्षांकडून आदिवासींचा मतबँका

म्हणून वापर होत आहे. आदिवासी नेतृत्वच पद्धतशीर खच्चीकरण केले जात आहे. मात्र अपयशाने खचून चालणार नाही.

□

## सामाजिक जाणीव हवी

दीनानाथ मनोहर म्हणाले— केवळ इतिहासाच्या पुनर्लेखनाने अस्मिता जागृत होत नाही. कारण ती केवळ इतिहासावर अवलंबून नाही. अस्मिता घडविण्यात साहित्याला मर्यादित महत्त्व आहे. कारण साहित्य म्हणजे संपूर्ण जीवन नव्हे तर जीवनाचे ते केवळ एक अंग आहे. माणसाचे दैनंदिन व्यवहार व त्यातील माणसाचे स्थान यावरदेखील अस्मिताजागृती अवलंबून आहे. आदिवासी व बिगरआदिवासींमधले तसेच माणसामाणसांमधले परस्परसंबंध बदलण्याचं काम समाजकार्य कसं असतं, हे संबंध बदलण्याचं काम आपलं आहे याची जाणीव साहित्यिकामध्ये असेल तर तो समाजाची स्वतःची कल्पना बदलण्याचं काम करेल. या बदलत्या संबंधांच वास्तव चित्रण करण्याचं काम साहित्यिकाचं. समाजकार्यकर्ता प्रत्यक्ष कृती करत असल्यामुळे या परस्पर संबंधाच्या धुमश्चक्रीत अडकतो त्यामुळे चळवळीचं यथार्थ मूल्यमापन करणं त्याला शक्य होत नाही. साहित्यिकाला मात्र तटस्थपणाने मूल्यमापन करता येणं शक्य असतं.

राजेंद्र अवस्थी म्हणाले— समाजात जाऊन वास्तव पाहून अनुभव घेऊन साहित्य निर्माण केलं पाहिजे. समाजाची दुःखं ही अनुभवातून तपासली पाहिजेत. साहित्य हे प्रेरणादायक असलं पाहिजे.

दर्शन शंकर यांनी महत्त्वाचे विचार मांडले— साहित्यातून समाजाची संस्कृती प्रकट होत असते. साहित्यामुळे आत्मविश्वास वाढला पाहिजे तो वास्तवाच्या जाणीवेनेच वाढेल. केवळ वर्तमान वास्तवता दाखवून आत्मविश्वास येणार नाही. भविष्याची दिशा साहित्याने दाखवली पाहिजे. गरीब–श्रीमंतामधील अंतर केवळ रोटीचे नसून साधनसामग्री आणि ज्ञानविज्ञान व तंत्रज्ञान यामध्ये कमालीचे अंतर आहे. जमिनीची लढाई आदिवासी समाज हरलेला आहे आणि आता औद्योगीकरणाची लढाईही हरण्याच्या बेतात आहे. कारखान्यांमधून अगदी खालच्या थरावरील मजूर म्हणून आदिवासी या प्रक्रियेत सामील होऊ लागले आहेत. यातल्या धोक्याची जाणीव साहित्याने करून दिली पाहिजे, भविष्यासंबंधी योग्य दिशादिग्दर्शन केलं पाहिजे.

श्री. झगडे म्हणाले— 'साहित्य व समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. निसर्गसौंदर्य वर्णनाबरोबरच जीवनाच्या सामाजिक–आर्थिक अंगांचा विचार साहित्यातून झाला पाहिजे. आदिवासी व जंगल यांचा विविधांगी परस्पर संबंध साहित्यातून प्रतित झाला पाहिजे.'

श्री. प्रभू राजगडकर म्हणाले—

'कथा, कविता, कादंबरी इ. साहित्याच्या माध्यमातून चळवळीचा जोम टिकविला गेला पाहिजे. उदयोन्मुख साहित्यिकांकडून अवास्तव साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य असा संकुचित दृष्टीकोन ठेवू नये. ज्या आदिवासींमध्ये शहरीकरणाची प्रक्रिया सुरू झालेली आहे त्यांची अभिव्यक्ती संमिश्र असणे साहजिक आहे. प्रत्यक्ष चळवळीत न राहतासुद्धा समाजाच्या वेदना जाणता येणं शक्य आहे. त्यांचं चित्रण साहित्यात आलं पाहिजे.'

प्रा. देवदत्त दाभोळकर यांनी काही महत्त्वपूर्ण विचार मांडले—

–आदिवासी साहित्य आणि सामाजिक परिवर्तन यांचा संबंध कसा असावा ? कसा असेल ?

१) प्रत्यक्ष आदिवासी आणि त्यांच्यासाठी निर्माण होणारं साहित्य—

२) जे आदिवासी नाहीत; परंतु हे प्रश्न ज्यांच्यापर्यंत जाऊन पोहोचले पाहिजेत त्यांच्यासाठी निर्माण होणारं साहित्य—

या दोन्ही प्रकारच्या साहित्याची गरज आहे. पहिल्या प्रकारचं साहित्य आदिवासींपर्यन्त पोहोचणारं परिवर्तनाची प्रेरणा त्यांच्यात निर्माण करणारं असेल, यात एक अडचण अशी आहे की, त्यापैकी बहुसंख्य निरक्षर आहेत. हे साहित्य ते वाचू शकणार नाहीत. त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे साहित्याचे प्रकार कोणते आणि पद्धती कोणत्या याचा विचार प्रथम झाला पाहिजे. दुसऱ्या प्रकारचं साहित्य म्हणजे बाहेरच्या, समाजावर प्रभाव टाकू शकेल आणि आदिवासीविषयक दृष्टीकोन बदलू शकेल अशा प्रकारचं साहित्य निर्माण होण्याची गरज आहे.

## स्वाभाविक प्रतिक्रिया हवी

अभिजात साहित्य निर्माण करू म्हणून होत नाही. भूदान चळवळीत पू. विनोबाजींनी जयसिंगपूरला साहित्यिकांच्या बैठकीत सांगितलं होतं की, तुम्ही भूदानाविषयी लिहा असा माझा आग्रह नाही. तुम्ही हट्टाने लिहाल तर ते उपयोगाचं नाही. काय चाललेलं आहे ते समजून घ्या. त्यानंतर तुमच्या अंत:करणात काही प्रतिक्रिया स्वाभाविकपणे उमटल्या तर त्यांना अवश्य प्रकटीकरण द्या. या प्रकारच्या स्वाभाविक भावना आदिवासींमध्ये असल्या पाहिजेत. नसतील तर त्यांचा आणि समाजाचा संबंध आधीच कुठे तरी तुटलेला आहे. तो जर असेल तर या भावना त्यांच्यात स्वाभाविकपणेच निर्माण होतील.

साहित्यनिर्मिती बोली भाषेत करावी की प्रमाणभाषेत करावी ? तुम्ही कोणाला उद्देशून लिहिता त्यावर ते अवलबून आहे. समाजावर उद्देशून लिहीत असाल तर या दोन्हींच योग्य संमिश्रण करून हे चित्रण केलं पाहिजे.

साहित्यामध्ये तीव्र प्रतिक्रिया येणं स्वाभाविक आहे; पण त्यास विकृत स्वरूप येणार नाही याची दक्षता आदिवासी तसंच दलित साहित्यिकांनीही घेतली पाहिजे समाजाला जागं करून हे प्रश्न त्याच्यासमोर मांडणं ही तिसरी प्रतिक्रिया होऊ शकते.

साहित्यिकाने प्रत्यक्ष चळवळीत भाग घेतलेला आहे किंवा नाही या गोष्टी महत्त्वाच्या असल्या तरी त्याने निर्माण केलेलं साहित्य प्रभावी झालेलं आहे किंवा नाही हे अधिक महत्त्वाचं आहे. उमललेल्या, उमलणाऱ्या आदिवासी साहित्यिकांचं साहित्य गोळा करून त्याचा प्रातिनिधिक संग्रह प्रसिद्ध करणाच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत अशी सूचना त्यांनी केली.

दादासाहेब बीडकर म्हणाले— साहित्यिकांनी, कार्यकर्त्यांनी समाजाच्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तसं झाल्यास यश मिळणं कठीण होईल. शेकडो कोटी रुपये खर्चूनही आदिवासींचा विकास का होत नाही याचा विचार आदिवासी कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. विधायक, संघर्षात्मक आणि जनजागृतीचं कार्य करणाऱ्यांनी एकत्र येऊन हा प्रश्न सोडविला पाहिजे. निरनिराळ्या विकास योजना आपल्यापर्यंत पोहचत नाहीत. योजना ठरवतं कोण ? त्याचं काय होतं ? या कोणापर्यंत जातात ? याचं भानही आम्हाला राहत नाही.

आपल्या अवतीभवती जे घडतंय, आपल्याला जे दिसतंय त्याचं आपण शब्दांकन करावं. अन्यायाचं, वेदनांचं शब्दांकन होऊन ते समाजाला समजलं पाहिजे वृत्तपत्रमाध्यमाचा योग्य उपयोग आपण करून घेतला पाहिजे, विविध प्रश्नांवर लिहून जनमत जागृत केलं पाहिजे. 'हाकारा' सारखी नियतकालिकं तळच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचली पाहिजेत. आज कार्यकर्त्यांचं प्रशिक्षण थांबलेलं आहे. जे काम मी करतो, त्यातली प्रवीणता, त्यातल्या खाचाखोचा, त्यात प्रगती कशी होईल चुका काय होतात ! नवे प्रश्न कसे उभे रहातात त्यांना तोंड कसं देता येईल ! यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. आदिवासीसंबंधीचं साहित्य कार्यकर्त्यांपर्यंत पोहचविण्यासाठी काही योजना आखली पाहिजे. त्यापासून काहींना स्फूर्ती मिळू शकेल.

## आदिवासींनी हिंमत धरावी

श्रीकांतभाईंनी आदिवासी क्षेत्रातील आपले अनुभव सांगून सत्ता, संपत्तीचे गुलाम आम्ही होणार नाही ही हिंमत आदिवासींनी धरली पाहिजे तसेच आत्मविश्वास वाढविला पाहिजे यावर भर दिला.

डॉ गोविंद गारे यांनी आदिवासी चळवळीला तात्त्विक अधिष्ठान लाभण्याच्या दृष्टीने वैचारिक साहित्य निर्माण होण्याची गरज प्रतिपादन केली. आदिवासी साहित्यिक स्वत:च्या पायावर उभा राहू शकेल याविषयी साशंकता आहे. प्रथितयश साहित्यिक व प्रकाशकांनी नवीन आदिवासी साहित्याचं स्वागत करून उदयोन्मुख आदिवासी साहित्यिकांना प्रोत्साहन दिलं पाहिजे. आदिवासी साहित्याला विषयांची मुबलकता आहे. सामाजिक–सांस्कृतिक प्रथा, संगीत नृत्य अशा अनेक विषयांवर लिहिता येणं शक्य आहे. आदिवासींच्या एखाद्या खेड्यातील सामाजिक जीवन आणि गुंतागुंतीचे सामाजिक संबंध हा कादंबरीचा विषय होऊ शकतो. अनेक सामाजिक प्रश्नांना नाट्यरूप देणं शक्य आहे.

श्री. ऋषी मसराम यांनी या सत्राचे संचालन केले. दोन दिवस चाललेल्या या चर्चासत्राचा समारोप प्रा. सरदार यांच्या प्रकट अभिष्टचिंतनसमारंभाने झाला.

सुधीर जोग सुषमा सोनक

## चर्चासत्रास उपस्थित असलेल्यांची यादी

१. डॉ. उत्तमराव घोंगडे, पद्मपानी कॉलनी, रेल्वे-स्टेशन, औरंगाबाद ४३१००१

२. श्री. एस. एस. आत्राम, भद्रावती, जि. चंद्रपूर

३. श्री. बी. एफ. मडावी ,, ,,

४. श्री. हि. वि. तिराणिक ,, ,,

५. श्री. रामचंद्र गजलेकर ,, ,,

६. श्री. कृष्णराव मरसकोल्हेगुरुजी, नवरगाव, ता. सिन्देवाही, जि. चंद्रपूर ४४१२२३.

७. श्री. लक्ष्मण कुळसंगे, भद्रावती, जि. चंद्रपूर

८. श्री. विठ्ठलराव कन्नाके, जामनारा, कोरेगाव, जि. गडचिरोली

९. श्री. विनायक तुमाराम, भद्रावती, जि. चंद्रपूर

१०. श्री. पुरुषोत्तम सेडमाके ,, ,,

११. श्री, राजाभाऊ राजगडकर, वणी, जि. यवतमाळ

१२. सुभाष आडे, ,, ,,

१३. श्री. देवकुमार बाचीकवार, ,, ,,

१४. श्री. प्रभू राजगडकर १४२५ बरॅकजवळ गजाननगर, उल्हासनगर, जि. ठाणे, ४२१००४

१५. श्री. विठ्ठलसिंग धुर्वे ११५, बैरामजी टाउन–नागपूर

१६. श्री. काळूराम निरगुडा, 'वननिकेतन' ताड-आळी, मुरबाड, जि. ठाणे

१७. श्री. कान्‍ होभला ,, ,,

१८. श्री. ऋषी मसराम २५३, चॉक्सकॉलनी, कामठीरोड, नागपूर

१९. सौ. कमल मसराम ,, ,,

२०. श्री. भुजंग मेश्राम, २७ अ, जययशवंत

२१. सौ. संघजा मेश्राम, हाउसिंग सोसायटी, भांडुप विलेज, (पूर्व) भांडुप मुंबई–७८

२२. डॉ. नीलकांत कुलसंगे, गांगलवाडी,

२३. सौ. चंद कुलसंगे, ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर

२४. श्री. चंद्रकांत उईके, आखाडावार्ड, पांढरकवडा, जि. यवतमाळ

२५. श्री. दीनानाथ मनोहर, नंदुरबार, जि. धुळे

२६. श्री. भीमराव झगडे, 'सूर्या' देवखोप, ता. पालघर, जि. ठाणे

२७. श्रीमती छायाताई सुरतवंती, सातपुडा सर्वोदय मंडळ, धडगाव, ता. अक्राणी, जि. धुळे

२८ श्री. वाहरू सोनावणे, श्रमिक संघटना, मोहिदे रस्ता, शहादे. जि. धुळे

२९. श्री. तुळशीराम ठाकरे, मोहिदे, ता. तळोदे जि. धुळे

३०. श्री. रायसिंग ठाकरे, फत्तेपूर, ता. शहादे, जि. धुळे

३१ श्री. शातुसिंग गोरख भिल, नांदे, ता. शहादे, जि. धुळे

३२. श्री. दादासाहेब बीडकर, डांग सेवा मंडळ, शरणपूररोड, नासिक

३३. श्री. जनार्दनमहाराज वळवी, रामपूर, पो. फत्तेपूर, ता. शहादे, जि. धुळे

३४. प्रा. भाऊ मांडवकर, विजयकॉलनी, अमरावती–२

३५. श्री. अनिल शिदोरे, पुणे

३६. श्री. वीरसिंग पाडवी, ग्रामस्वराज्यसमिती भिलटेकडी, ता. शहादे, जि. धुळे

३७. श्री. पद्माकर वळवी, तळोदे, जि. धुळे

३८. श्री. सिताराम पाडवी, धडगाव, ता. अक्राणी-महाल, जि धुळे

३९. श्री. सूर्यकांत नागभिडे, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

४०. श्रीमती अनुताई वाघ, ग्रामबालशिक्षाकेंद्र, कोसबाडहिल, जि. ठाणे

४१ श्रीमती सिंधुताई अंबिके ,, ,,

४२, श्री. दर्शनशंकर ॲकडमी ऑफ डेव्हलपमेन्ट सायन्स, कशेळे ता. कर्जत जि. रायगड

४३. सौ. नॅन्सी गायकवाड, मु. मार्गाची वाडी, पो. पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड

४४. श्री. नारायण नाईक मु. वावर्ले, पो. चौक,

४५. श्री. कमळाकर हिलम, ता. खालापूर, जि. रायगड

४६. श्रीमती मालतीबाई गाडगीळ, देशमुखवाडी, सदाशिव पेठ, पुणे

४७. श्री. रा. वि. पाटणकर, सत्यनिकेतन, मु. पो. ता. राजुर, जि. अहमदनगर

४८. श्री. मिलिंद बोकील ,, ,,

४९. प्रा. देवदत्त दाभोळकर, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन १२८/२ कोथरूड, पुणे २९.

५०. श्री. एल. एम. श्रीकांत, अहमदाबाद

५१. श्री. उल्हास राजज्ञ, राष्ट्रसेवादल, पर्वती पायथा, पुणे.

५२. श्री. डॉ. बाबा आढाव, ७८ नानापेठ, पुणे

५३. प्रा. गं. बा. सरदार, आपटेरोड, डेक्कन जिमखाना, पुणे

५४. डॉ. गोविंद गारे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षणसंस्था, २८, क्वीन्स गार्डन, पुणे

| | |
|---|---|
| ५५. प्रा. रा. के. मुटाटकर, | ई/५ प्राध्यापक– |
| ५६. श्री. म. रा. खंडकर, | निवास,पुणे विद्यापीठ पुणे |
| ५७. श्री.जगदीश गोडबोले, सौ. गीता गोडबोले, | बी/७सीमा अपार्टमेन्टस्, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे, ४११ ००५ |
| ५८. श्री. शरद कुलकर्णी, | १३/२ बंधन को. ऑ. |
| ५९. श्री अरुंधती मुंडले, | सोसायटी, कोथरूड, पुणे ४११ ०२९ |
| ६०. डॉ. विजय भानू, | मानवशास्त्रविभाग, |
| ६१. प्रा. वि. श्री. कुलकर्णी, | पुणे विद्यापीठ, |
| ६२. प्रा. म. बा. मांडके, | पुणे ४११ ००७. |
| ६३. श्री. बी. आर. पठाण, | ,, |
| ६४. श्री. सुधीर जोग, | ,, |
| ६५. सुषमा सोनक, | ,, |
| ६६. संध्या राव, | ,, |
| ६७. सुनीता बांदेवार, | ,, |
| ६८. श्री. एस. एन. कुलकर्णी, | ,, |



# आदिवासींनी अभ्यासिलेली पशूंची काही वैशिष्टये

| नाव | थोडक्यात वैशिष्टय |
|---|---|
| गाय | (१) काळा रंग–गोड दूध<br>(२) सफेत रंग–कमी चवदार दूध<br>(३) लाल रंग–दुधात तुपाचा अंश जास्त<br>(४) अंगावरचे कातडे पातळ असणे-जास्त दूध देणारी |
| दरडया | वेलीला शिंगे अडकवून झोके घेणारा प्राणी |
| भेकर | उलट दिशेने पळणारा प्राणी |
| डुकर | (१) गणेशचतुर्थीचे चंद्रदर्शन वर्ज असणारा<br>(२) वालाच्या वेलीच्या छायेत न जाणारा |
| वाघ | (१) नदी पार करताना सरळरेषेत निघाल्यास अपमान मानणारा<br>(२) बिचकावणाऱ्या शिकाऱ्याचा वचपा काढण्यास परत येणारा |
| सायाळ–साळू | झाडाखाली पडलेले फळ दूर नेऊन खाते (घट्ट कवटीअभावीची भीती) |
| वळीण (जवादि) | सुवासिक मांजर |
| हीमोर | नराला ४ व मादीला २ अंडकोश असतात |
| घोंग्या | बदलत्या हवामानात वृषण फुगणारा |
| उंदीर | (१) दहा जती (२)कणीस न खाता फक्त दांडी खाणारा कोळचा जातीचा उंदीर |

**संग्राहक : गं. जा. आवारी गुरुजी**

# समाजशिक्षकाची भूमिका जगणारे प्रा. सरदार

महाराष्ट्र मानवविज्ञानपरिषदेच्या वतीने परिषदेचे अध्यक्ष व नामवंत साहित्यिक-विचारवंत प्रा. गं. बा सरदार यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त रविवार २ ऑक्टोबर १९८३रोजी एका स्नेहपूर्ण व साध्या समारंभात अभिष्टचिंतन करण्यात आले. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राम ताकवले होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मा. स. गोरे उपस्थित होते. परिषदेचे सचिव प्रा. रा. के. मुटाटकर यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर प्रा. देवदत्त दाभोळकर, शंकरराव खरात, राजाभाऊ राजगडकर, डॉ. गोविंद गारे, डॉ. गोरे, यांची प्रा. सरदार यांच्या गौरवपर भाषणे झाली. यानंतर 'हाकारा'च्या प्रा. सरदार गौरव अंकाचे प्रकाशन डॉ. राम ताकवले यांच्या हस्ते झाले. प्रा. सरदार यांच्या सत्कारास उत्तरादाखल केलेल्या भाषणानंतर डॉ. ताकवले यांचे अध्यक्षीय भाषण झाले. परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. शरद कुलकर्णी यांनी आभारप्रदर्शन केले या समारंभातील भाषणांचा गोषवारा येथे देत आहोत.

¤

**प्रा. रा. के. मुटाटकर :** गेले दोन दिवस परिषदेच्या वतीने चाललेल्या 'आदिवासींचे सामाजिक प्रश्न व त्यांचे साहित्यातील प्रतिबिंब' याबरील चर्चासत्राचा आज समारोप होत आहे. प्रा. सरदारांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्ताने हे चर्चासत्र भरविण्यात आलं यात औचित्य आहे. आदिवासी साहित्याच्या इतिहासात प्रा. सरदारांचं मार्गदर्शन लाभलेल्या या चर्चासत्राचं अनन्यसाधारण महत्त्व राहील हे निश्चित.

महाराष्ट्र मानवविज्ञानपरिषदेची स्थापना पुणे विद्यापीठात १९७५ साली प्राध्यापकांच्या एका चर्चासत्रात Maharashtra Association of Anthropological sciences अशा भारदस्त नामकरणाने झाली. प्राध्यापकांनी आपल्या हस्तीदंती मनोऱ्यातून उतरून आपल्या भोवतालच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीचं वस्तुनिष्ठ परीक्षण करावं हा या मागची भावना. आदिवासी कार्यकर्ते, शासकीय अधिकारी, राजकीय नेते व विचारवंत यांचे पक्षातील खुले व्यासपीठ असावे यासाठी प्रयत्न करण्यात आले. १९७६ साली सामाजिक विज्ञानाच्या ४० प्राध्यापकांनी ठाणे जिल्ह्यातील दुर्गम मोखाडा भागात १०-१२ दिवस 'आदिवासींचे शिक्षणविषयक प्रश्न' याबाबत खेड्यात राहून संशोधन केलं व प्रा. सरदारांच्या जन्मगावी जव्हार येथे चर्चासत्रात मांडलं. प्रा. सरदार व प्रा दाभोळकर दोघेही या चर्चासत्रास उपस्थित होते. त्यानंतर परिषदेने आदिवासी कार्यकर्त्यांची चर्चासत्रे, शिबिरे महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात आयोजित केलेली आहेत आदिवासींच्या समस्यांवर चर्चा व्हावी, कार्यकर्त्यात संवाद व्हावा व खेड्यांतील कार्यकर्त्यांना विविध स्वरूपाची माहिती मिळावी या उद्देशाने 'हाकारा' हे त्रैमासिक जानेवारी १९८० मध्ये सुरू करण्यात आले. त्यातून वनविषयक प्रश्नांवर जास्त भर देण्यात आला, त्यास वनविकास महामंडळ व वनखात्याने उत्तम प्रतिसाद दिलेला आहे. वनविषयक प्रश्न हे आदिवासींशी निगडीत व पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे व गुंतागुंतीचे आहेत. या संदर्भात महाराष्ट्रातील सुमारे ५० आदिवासी व इतर कार्यकर्त्यांचा हिमालयातील जंगलतोडीचे प्रश्न व चिपको आंदोलन याविषयी अभ्यासदौरा आयोजिला होता. प्रा. सरदार परिषदेचे अध्यक्ष व त्यांच्या प्रेरणेचे हे कार्यक्रम घेतले गेले व यशस्वीरित्या पार पडले.

## संघर्षाशी नातं

प्रा. सरदारांनी नेहमीच मानवमुक्तीची कास धरली, प्रथम भूतदयेच्या प्रेरणेतून नंतर जागृतीतून

संघर्षांशी नातं जुळवून. त्यांचं नातं प्रथम आदिवासींशी जुळलं, ते त्यांनी संकुचित न ठेवता समग्रलक्षी ठेवलं. मानवशास्त्राच्या अध्ययनास आदिवासीपासून सुरुवात होते. अध्ययनपद्धती असते समग्रलक्षी. यामुळेच प्रा. सरदारांचं मानवविज्ञान परिषदेशी नातं जुळलं. सरदारांचं नाव आदर्श अध्यक्ष म्हणून कायम स्मरणात राहील. कार्यकारी मंडळास स्वायत्तता, 'हाकारा' संपादकास पूर्ण स्वातंत्र्य म्हणजे चुका करण्यास मोकळीक; परंतु चुका निस्तरण्यास आम्ही अध्यक्षांचं बळ वापरलं. त्यांनी ते वापरू दिलं· परिषदेने त्यांच्यावर खर्च करावयाचा नाही या अटीवर प्रा. सरदारांनी या समारंभास मान्यता दिली; परंतु समाजमान्य पद्धतीप्रमाणे या निमित्ताने आम्ही केवळ आमचे प्रेम व आदर व्यक्त करीत आहोत म्हणूनच आदिवासी साहित्यिकांना आम्ही प्रथमतःच बोलावलं आहे. प्रा. सरदारांची निवृत्ती कोणालाच मान्य नाही ते आपले प्रमुख सल्लागार राहतील ही दिलासा देणारी गोष्ट आहे,

प्रा. सरदारांची अध्यक्षपदाची धुरा सांभाळणार णार आहेत धुळे जिल्ह्यातील सरदारांच्या साधेपणाचा, निरिच्छपणाचा, निःस्पृह वृत्तीचा वारसा चालविणारे जनार्दनमहाराज वळवी. ते पहिल्या विधानसभेचे आमदार होते; परंतु नंतर त्यांनी मानाची व सत्तेची स्थाने नाकारून राजकारणसंन्यास घेतला व धुळ्यातील अतिशय दुर्गम अशा अक्राणीमहाल भागात शिक्षणाचे कार्य जोमाने करीत आहेत. आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ या त्यांच्या सस्थेमार्फत हायस्कूल, आश्रमशाळा व वसतिगृहे चालविण्यात येतात. धुळ्यातील पहिली आश्रमशाळा त्यांनी काढली व तालुक्यात अजूनही त्यांचे हायस्कूल एकमेव आहे. जनार्दन महाराजांचा आमच्याशी गेली २० वर्षे घनिष्ट संबंध आहे. पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागाचे विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली दुर्गम आदिवासी भागात अनेकदा अभ्यासदौरे करून आलेले आहेत परिषदेच्या स्थापनेपासून ते कार्यकारी मंडळाचे सभासद आहेत व प्रा. सरदारांच्या विनंतीवरून परिषदेच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी स्वीकारली ही आनंदाची बाब आहे. आदिवासीविषयक मानवविज्ञान परिषदेचं अध्यक्षपद आदिवासी कार्यकर्त्यांने भूषवावे ही अभिमानाची गोष्ट आहे.

□

**राजाभाऊ राजगडकर :** ज्यांच्या वाणीने महाराष्ट्राच्या तीन पिढ्यांवर संस्कार केले, आपल्या अत्यंत रसाळ, सुबोध शैलीने समाजवादाचा विचार आमच्या मनावर बिंबवला अशा या थोर विचारवंताच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने चर्चासत्रास उपस्थित असलेल्या आदिवासी साहित्यिकांचा प्रतिनिधी या नात्याने बोलायला मिळत आहे याबद्दल मी स्वतःला धन्य समजतो. आता कुठे हे आमचं विद्यार्थी दशेतलं पाऊल आहे, अनेक उन्हाळे पावसाळे आम्हाला पाहायचे आहेत, जीवनानुभव घ्यायचे आहेत. दऱ्याखोऱ्यातून आलेले आम्ही आदिवासी आहोत. मानव विज्ञानपरिषदेने आयोजित केलेल्या चर्चासत्रातून आम्हाला काय मिळालं तर बाबा रे, तुम्ही विश्वासाने उभे रहा, अपयशानं खचून न जाता कार्यरत रहा असा संदेश या चर्चासत्रातून ग. बा. सरदारांनी दिलेला आहे. या चर्चासत्रामध्ये सामाजिक चळवळी. साहित्यातलं त्यांचं प्रतिबिंब, आम्ही काय लिहीत आहोत, काय लिहावं यावर टीकाटिपणी होऊन ते अधिक रेखीव कसं होईल, त्याला कलात्मकता कशी येईल, ज्ञानाची सखोलता कशी येईल, या दृष्ठीनं आम्ही काय प्रयत्न केले पाहिजेत याविषयी सखोल चर्चा झाली. येथं मिळालेलं हे विचारधन घेऊन आम्ही येथून जात आहोत. या प्रकाशामध्येच आमची पुढील वाटचाल होणार आहे हे या चर्चासत्राचं यश आहे.

प्रा. सरदारांनी मार्क्सवादी विचाराच्या अन्वयार्थ या भूमीच्या संदर्भामध्ये अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितला. मार्क्सनं सांगितलेलं मुलभूत तत्त्वज्ञान मराठी भाषेच्या, परंपरेच्या, साहित्याच्या, जीवनाच्या संदर्भात चपखलपणे बसवून त्यांना शिकविलं आहे. याबद्दल आमचा तिसरी पिढीही त्यांचं ऋण मान्य करेल.

□

**प्रा. देवदत्त दाभोळकर :** समाजशास्त्रज्ञ या शब्दाची आम्ही जी तांत्रिक व्याख्या करतो त्यामध्ये बसणारे प्रा. सरदार आहेत असं कदाचित मान्य होऊ शकणार नाही; परंतु समाजशास्त्राविषयी आस्थेने विचार करणारी, त्याचा अभ्यास, चिंतन करणारा हा प्रत्येकजण जर समाजशास्त्रज्ञ असेल तर त्या समाजशास्त्रज्ञांच्या गेल्या पिढीमध्य प्रा. सरदार हे आदर्श विचारवंत आहेत. प्रा. सरदार आदर्श विचारशील आहेत

पुणे विद्यापीठाचं जे ध्येयवाक्य 'यः क्रियावान् स पण्डितः' या वाक्याचा आदर्श जर आपल्या परिसरात शोधायचा असेल तर तो हा आदर्श. जुनं आणि नवं, मार्क्सनं जे सांगितलं त्यातील योग्य आणि अयोग्य, साधुसंतांनी जे सांगितलं त्यातील योग्य आणि अयोग्य, गांधीजींनी जे सांगितलं त्यातील योग्य आणि अयोग्य साधुसंतांनी जे सांगितलं त्यातील योग्य आणि अयोग्य याचा संपूर्ण मिलाफ त्यांच्या विचारात झालेला आहे, त्यांच्या अंतःकरणातही झालेला आहे. प्रा सरदार हे एक संतकोटीतलं व्यक्तिमत्त्व आहे. शासनाकडून आलेला सर्वोच्च मान व सुविधा आणि समाजाकडून येणारा मानसन्मान या दोन्ही गोष्टी आपल्या स्वतंत्र वृत्तीला बाध आणतील म्हणून त्यांनी अगदी सम-वृत्तीने नाकारलेल्या आहेत. प्रा. सरदार हे केवळ ज्ञानानंद म्हणून देखील आपला अभ्यास करणारे नाहीत; परंतु ज्ञानार्जनापलिकडेदेखील आपलं काही उत्तरदायित्व आहे, त्याच्या आड ज्ञानार्जन येत असेल तर ज्ञानार्जनदेखील तितक्याच तटस्थपणाने बाजला ठेवलं पाहिजे, त्याचा आनंददेखील तितक्याच सहजपणे बाजूला ठेवला पाहिजे असं मानणारे आहेत. आपल्या-कडे जी जी जबाबदारी येईल ती ती कोणतीही अपेक्षा न बाळगता, प्रकृतीची पर्वा न करता स्वीकारावी हे आपल्याकडं पूर्वसूरींकडून आलेलं ऋण आहे. आपण ते परत फेडतो आहोत एवढ्या नम्र भावनेनं कर्तव्य करावं अशी त्यांची भावना आहे. त्यांची निवृत्ती आणि प्रवृत्ती यात फरक नाही. त्यांची शक्ती जोपर्यंत त्यांना साथ करील तोपर्यंत त्यांची निवृत्ती आणि प्रवृत्ती आगगाडीच्या रुळांप्रमाणे सतत बरोबर चालत राहील.

□

**शंकरराव खरात** : गेली सतत ४० वर्षे कोणाच्याही रागालोभाची पर्वा न करता प्रा. सरदार सामाजिक समतेचा विचार मांडत आलेले आहेत. विष्णुबुवा ब्रह्मचारी, न्या. रानडे, शाहूमहाराज आणि अलीकडे डॉ. आंबेडकर यांचे सामाजिक समतेचे विचार त्यांनी सर्व-सामान्यांपुढे मांडलेले आहेत. सामाजिक समतेचा विचार महाराष्ट्रात रुजविण्याच्या दृष्टीने प्रा. सरदार यांना फार मोलाचं स्थान आहे. जोपर्यंत या देशात सामाजिक समता आणि आर्थिक समता प्रस्थापित होणार नाही तोपर्यंत मोठ्या परिश्रमाने उभा केलेला हा लोक-शाहीचा डोलारा केव्हा कोसळेल याचा नेम नाही असा धोक्याचा इशारा डॉ. आंबेडकरांनी दिला होता. मार्क्सचाव र्गलढ्याचा विचार आणि आंबेडकरांचा वर्णलढ्याचा विचार याची संगती लावण्याचं अतिशय मोलाचं कार्य प्रा. सरदारांनी केलेलं आहे. डाव्या आघा-डीच्या चळवळीतली १९२० पासूनची उणीव बरोबर हेरून वर्गलढ्याबरोबरच वर्णलढाही चालविला पाहिजे हे त्यांनी सांगितलं. डाव्या चळवळीला भारतीय समा-जाच्या वास्तवाची जाणीव करून देण्याचं मोलाचं कार्य प्रा. सरदारांनी केलेलं आहे. साहित्य आणि समाज यांचं नातं अतूट असल्यामुळे कोणत्याही साहित्यानं सामाजिक बांधिलकी मानली पाहिजे हा मोलाचा विचार त्यांनी सतत मांडलेला आहे.

मात्र सामाजिक समतेच्या चळवळीचा पराभव महाराष्ट्रात सतत होत आलेला आहे याची खंत आहे. वर्गलढ्याबरोबरच वर्णलढा करण्याची समाजाची कित-पत तयारी आहे यावर या निमित्ताने विचार होणे आवश्यक आहे.

□

**डॉ गोविंद गारे** : मानवविज्ञानपरिषदेचं कार्य विस्तारित होण्यात प्रा. सरदारांचं मार्गदर्शन अतिशय मोलाचं ठरलेलं आहे. त्यांचा जन्म ज्या जव्हार भागात झाला तो आजुबाजूचा प्रदेश आदिवासींचा आहे. त्या काळातल्या आदिवासींचं जीवन, त्यांची दुःखं, त्यांच्या वेदना प्रा. सरदारांच्या मनावर बिंबलेल्या आहेत. त्या-मुळेच ज्या ज्या ठिकाणी आदिवासींचा प्रश्न उपस्थित होईल अथवा आदिवासींसंबंधी जेथे जेथे कार्यकर्ते एकत्र जमतील तेथे तेथे त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केलेलं आहे. आपलं विचारधन पेरलेलं आहे. आदिवासी हा जो दुबळा, खचलेला आहे, त्याचा आवाज उठवू शकत नाही, वेदना सांगू शकत नाही अशा आदि-वासींचा आत्मविश्वास वाढला पाहिजे, त्यांच्यामध्ये स्वाभिमान निर्माण झाला पाहिजे. मात्र अहंभावना निर्माण होणं, परिवर्तनविरोधी प्रतिक्रिया निर्माण होणं बरोबर होणार नाही ही आपली भूमिका त्यांनी वारंवार मांडलेली आहे. आदिवासींच्या चळवळींना तात्त्विक अधिष्ठान देण्याचं मोलाचं कार्य प्रा. सर-दारांनी केलेलं आहे. महाराष्ट्रातल्या पुरोगामी सामा-जिक चळवळींना योग्य दिशा देण्याचं काम त्यांनी केलेलं आहे. आदिवासी कार्यकर्त्यांना वेळोवेळी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनामधून शिक्षण, प्रबोधन आणि जाणीव जागृती यांच्या सहाय्याने परिवर्तनाच्या दिशेने समा-जाचा गाडा आपल्याला कसा पुढे नेता येईल यावर त्यांनी भर दिलेला आहे. अपयशाची पर्वा न करता परिवर्तनाची चळवळ सातत्याने पुढे चालवत नेली पाहिजे हा संदेश त्यांनी सातत्याने दिलेला आहे.

□

**डॉ. मा. स. गोरे** : प्रा. सरदारांनी आपल्या लिखा-णातून महाराष्ट्रातील सामाजिक विचारांचा परामर्श ऐतिहासिक दृष्टिकोनातून तसेच त्यांच्या वर्तमानातील

सातत्याच्या संदर्भात घेऊन आपल्या या विषयीच्या ज्ञानात मोलाचो भर घातलेली आहे महाराष्ट्रातील संतवाङ्मयाच्या सामाजिक फलश्रुतीकडे लक्ष वेधणारे प्रा. सरदार हे पहिलेच विचारवंत. १९ व्या शतकात होऊन गेलेल्या महाराष्ट्रातील विष्णूबुवा ब्रह्मचारी व यासारख्या अनेक अपरिचित समाजसुधारक व विचारवंतांच्या विचार व कार्याकडे लक्ष वेधून प्रा. सरदारांनी महाराष्ट्राच्या सामाजिक विचारधारे- संबंधीच्या आपल्या ज्ञानात महत्त्वपूर्ण भर घातलेली आहे. समकालीन सामाजिक चळवळींशी सतत संपर्क राखण्याचे कौशल्य व या चळवळींना त्यांनी दिलेले सम्यक् मार्गदर्शन या त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील पैलूने मला प्रभावित केले आणि विविध पदांवर असलेले आपण किती कमी काम करतो याची जाणीव झाली. कोणत्याही सार्वजनिक जबाबदारीच्या पदावर नसतानादेखील विविध सामाजिक चळवळी, चळवळींनी घेतलेली वळणे, त्यांचे परिणाम, चळवळीतील विचार व कृती व्यवहाराच्या निकषावर पारखून घेणे व चळवळीना प्रोत्साहन देणे अशा विविध प्रकारे समाज- प्रबोधनाचे, सामाजिक चळवळींच्या मार्गदर्शनाचे मोलाचे कार्य प्रा. सरदारांनी आयुष्यभर निष्ठेने केले आहे. जेथे जेथे समता, स्वातंत्र्य तसेच पददलितांचे प्रश्न निर्माण झाले तेथे तेथे त्यांची सहानुभूती जेथे ती असायला हवी तेथेच ती राहिलेली आहे. आपली मूल्ये कोणती असावीत, त्याविषयी आपण किती जागरूक असलं पाहिजे आणि या मूल्यांचं जतन कसं करावं हे प्रा. सरदारांनी आपल्या कृतिशील उदाहरणाने दाखवून दिलेले आहे, याबद्दल आपण त्यांचं ऋण मान्य केलंच पाहिजे. महाराष्ट्रामध्ये समाजशिक्षकाची भूमिका खऱ्या अर्थाने प्रा. सरदारांनी समर्थपणे पार पाडलेली आहे याबद्दल व्यक्तिशः व आपणा सर्वांच्या वतीने मी त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करतो.

□

**डॉ. राम ताकवले** : प्रा. सरदारांचं जीवन जर पाहिलं तर संतवाङ्मयाचा अभ्यासक, गांधीवादाचा अभ्यासक, मार्क्सवादाचा अभ्यासक एवढंच नव्हे तर निरनिराळ्या चळवळीत विविध प्रकारे त्यांनी भाग घेतलेला आहे. एका अर्थाने महाराष्ट्राचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास जर पाहिला तर या सगळ्या बदलाचा अभ्यास त्यांच्या जीवनात झालेला आहे. या स्थित्यंतरातून ते स्वतः गेलेले आहेत आणि म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्रातील सामाजिक बदलाचं / सामाजिक चळवळीचं प्रतीक म्हणून प्रा. सरदारांकडे पाहिलं तरी चुकीचं होणार नाही. समाजपरिवर्तनासाठी धडपडणाऱ्या संस्था व कार्यकर्ते सर्वांना प्रा. सरदार अत्यंत जवळचे वाटतात, मार्गदर्शक वाटतात यातच त्यांचं मोठेपण सामावलेलं आहे. वर्गसंघर्षाबरोबरच वर्णसंघर्षही चालविला पाहिजे ही भारतातील डाव्या चळवळीतली त्रुटी त्यांनी भरून काढली. महाराष्ट्रात अशा अनेक व्यक्ती आहेत की, त्या एखाद्या संस्थेमध्ये गुंतलेल्या नाहीत. त्या सर्वत्र वावरतात आणि आपल्या ज्ञानाचा, विचारांचा, चिंतनाचा फायदा इतरांना करून देतात, मार्गदर्शन करतात. अशा व्यक्तींमध्ये प्रा. सरदार अग्रगण्य आहेत. त्यांनी सामाजिक चळवळींचा, समाजपरिवर्तनाचा व्यासंग केलेला आहे आणि कृतिशील होण्यासाठी सतत प्रयत्न केलेले आहेत. पुणे विद्यापीठाचं ब्रीदवाक्य आहे 'यः क्रियावान् स पण्डितः' 'ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान' या दोन्ही दृष्टींनी विद्वानांची, अभ्यासकांची जबाबदारी मोठी आहे. प्रा. सरदारांचा आदर्श हा प्रत्येक अभ्यासकापुढे रहावा असाच आहे. समाजप्रबोधनाचं कार्य प्रा. सरदारांनी कुणावरही अवलंबून न राहता आयुष्यभर निःसंगपणानं केलेलं आहे.

समतेची चळवळ अपयशाप्रत तर चाललेली नाही ना अशी खंत येथे व्यक्त करण्यात आली. त्या संदर्भात असं वाटतं की, समतेची चळवळ ही विस्तारणाऱ्या क्षितिजासारखी आहे. त्यामुळे यात अंतिम यश असं कोणतं असेल असं वाटत नाही. कारण ही विषमता निराळ्या थरावर, पातळीवर येणार आहे. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने पुढारलेले व मागासलेले यामधून ('तंत्रज्ञानाधारित वसाहतवाद' Technological Colonialism) हा एक नवीनच वाद निर्माण झालेला आहे संपर्कमाध्यमातून, नवीन येणाऱ्या तंत्रज्ञानातून तुमच्या–आमच्या जीवनामध्ये तो निराळ्या स्वरूपात येणार आहे पुढची एक–दोन दशकं ही संपूर्ण बदलाच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाची ठरणार आहेत हा जो बदल आपल्या जीवनामध्ये यापुढे येणार आहे त्यातून विषमतेचे निराळे प्रश्न निर्माण होणार आहेत कदाचित समता निर्माण करण्यामध्येही याचा काही बाबतीत उपयोग होण्याची शक्यता आहे याचा समग्रपणे विचार करून विशेषतः आपल्या भारतीय संस्कृतीतील परंपरांच्या संदर्भात त्यामध्ये जे चांगले आहे ते घेऊन जुन्या व नवीन गोष्टींचा समन्वय घडवून आणण्याच्या दृष्टीने विचारवंतांची जरुरी भासणार आहे. या बदलाचं विश्लेषण आणि सम्यक् मार्गदर्शन प्रा. सरदारांसारख्या विचारवंतांकडून भविष्यकाळात व्हावं असं वाटतं.


# उद्याचा इतिहास आम्ही निर्माण करणार आहोत !

(२ ऑक्टोबर १९८३ रोजी अमृतमहोत्सवी अभीष्टचिंतनसमारंभात प्रा. गं. बा. सरदार यांनी व्यक्त केलेले विचार येथे देत आहोत.)

**हा जो समारंभ आयोजित करण्यात आला त्याचं मुख्य प्रयोजन हे होतं की, या निमित्ताने आदिवासी साहित्य आणि समाजजीवन यावर एक चर्चासत्र घडवून आणावं आणि त्याचा समारोप व्हावा; पण ही सगळी भाषणं आदिवासींऐवजी माझ्याभोवती केंद्रित झाली त्यामुळे मला बोलतानासुद्धा खूप संकोच वाटतो.**

महाराष्ट्रातल्या ३ पिढ्यांची जवळीक आणि ममत्व आपल्याला लाभलेलं आहे हे या निमित्तानं दिसलं आणि याबद्दल मात्र मला मनापासून आनंद झाला. दुसरं असं की, महाराष्ट्रातले विद्यावंत आणि अनेक कार्यकर्ते या दोघांचीही तितकीच जवळीक मला मिळाली, याबद्दल मात्र मला सांगितलं पाहिजे की, माझी प्रतिक्रिया ही निखळ आनंदाची आहे.

ज्या सामाजिक समतेसंबंधाने मी आग्रह धरतो आणि हा विचार लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी काही पथ्यं आपण पाळली पाहिजेत, व्रतस्थ वृत्तीनेच आपण राहिलं पाहिजे ही जी माझी भावना आहे ती गेल्या शंभर वर्षांमध्ये महाराष्ट्रात सामाजिक चळवळी ज्यांनी घडवून आणल्या त्यांचे ऋण म्हणून मी हे मान्य करतो खेड्यापाड्यांमध्ये अनेक सुशिक्षित तरुण आज आपल्या ऐहिक उत्कर्षाकडे पाठ फिरवून काम करताहेत. अशा २५-३० संस्था तरी महाराष्ट्रात आहेत की, त्यांचे कार्यकर्ते तरुण आहेत, निष्ठावान आहेत, सुशिक्षित आहेत. पहिल्या प्रतीची ज्यांची बुद्धिमत्ता आहे. असे हे तरुण खेड्यापाड्यांत राहून निवडणुकीच्या राजकारणाकडे पाठ फिरवून मात्र राजकारणाबद्दल उदासीन न राहता लोकमत संघटित करण्यासाठी कार्यरत आहेत याची जाणीव मला आहे. त्यांच्या त्यागाच्या पासंगालासुद्धा माझा त्याग पुरणार नाही हे मी अगदी प्रांजळपणे मान्य करतो. गेल्या शंभर वर्षांमध्ये अनेकांनी सामाजिक समतेचा, सुधारणेचा पक्ष अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत यशापयशाची फिकीर न करता उचलून धरला. आगरकरांच्या भाषेत सांगायचं झालं तर– 'मला अपयश येणार हे निश्चित आहे. एक आगरकर पुरणार नाही, समाजपरिवर्तनासाठी शंभर आगरकर लागतील ! मी त्याची सुरुवात करत आहे; पण शेवटी माझ्या तत्त्वाचा विजय होईल हे मात्र निश्चित पहिला आगरकर झाला नाही तर शंभर कधीच होणार नाहीत !' तेव्हा ही परंपरा आहे विठ्ठल रामजी शिंद्यांपासूनची की, ३० वर्षं स्वतःला एका क्षेत्रात वाहून घेतल्यानंतरसुद्धा त्यांना त्याचं काहीच नाही. त्यांना त्याचं मोठं यश पदरात पडलं असं नाही; परंतु अखेरपर्यंत कुठेही त्यांच्या मनाला निराशा शिवलेली नाही. या सामाजिक समतेचा ध्येयवाद स्वीकारून आपलं सर्वस्व अर्पण करून जे तरुण आज खेड्यापाड्यात काम करताहेत त्या सर्वांचा गौरव या दृष्टीने हा गौरव मी स्वीकारतो. चर्चासत्रामध्ये ऐकलं त्यावरून आपण जे काही केलंय त्याच्या कितीतरी पट समाजाकडून आपल्याला परत मिळतंय. त्यामुळं माणसाच्या सद्भावनेवरचा, प्रगमनशीलतेवरचा माझा विश्वास वाढलेला आहे. मागच्या पिढीतल्या लोकांना काहीही मिळालं नाही. केशवसुत, आगरकर यांना काय मिळालं ? फुल्यांना तर खूपच छळ सोसावा लागला. त्या परंपरेत आपण आहोत. पुढच्या पिढीला थोडं श्रेय मिळत जातं हे उघडच आहे. कारण मागच्यांची पुण्याई त्यांच्या पाठीशी असते. त्यांचं श्रेय म्हणून मी हे स्वीकारतो. त्यांचं हे श्रेय पुढच्या पिढीकडे सुपूर्त करणारा मी केवळ एक दुवा आहे या दृष्टीनं मी याकडे पाहतो.



या वयांतही उद्याचा इतिहास निर्माण करण्याची जिद्द !

*

## विषम संग्राम

अनेक ध्येयवादी तरुणांशी माझा संबंध आहे. अशा क्षेत्रात त्यांनी स्वतःला डांबून घतलय की त्यात ताबडतोब यश येणार नाही, याची त्यांना जाणीवही आहे. भाबडा आशावाद त्यांच्यापैकी कुणाकडेही नाही. किती विषम हा संग्राम आहे, किती प्रतिकूल परिस्थितीला आपल्याला तोंड द्यावं लागणार आहे, कुणाशी आपल्याला मुकाबला करावा लागणार आहे आणि त्या शक्ती किती संघटित आणि प्रबळ आहेत, त्यांच्या पाठीमागे सत्तेचं, पैशाचं, प्रतिष्ठेचं पाठबळ किती मोठ्या प्रमाणावर आहे या सगळ्याची जाणीव असूनसुद्धा ज्यांची निष्ठा ढळलेली नाही अशा तरुणांबद्दल मला मनातून खूप वाटतं की, त्यांच्याशी आपण समरस व्हायला पाहिजे. हीच माझी आयुष्यभरची तळमळ आहे.

समाजपरिवर्तनाच्या चळवळीला निरनिराळ्या शक्तींच्या समन्वयाने यश येईल. आमची दिशा जर बरोबर असेल, आमची भूमिका कालप्रवाहाशी सुसंगत असेल आणि मानवी प्रगमनशीलतेवर आमचा जर विश्वास असेल तर आपल्याला यश मिळालंच पाहिजे ! केवळ मला हे वाटत आहे याला महत्त्व नाही. आज निरनिराळ्या थरांतल्या अनेक तरुणांना हे वाटत आहे. काल आदिवासी लेखक आणि कार्यकर्ते बोलताना पाहिले, त्यांच्यामध्येही एक श्रद्धा निर्माण झालेली आहे की, आमचं भवितव्य उज्ज्वलच आहे. समाजाच्या वेगवेगळ्या थरांतले लोक आज जागृत होत आहेत. या सर्वांना एक विश्वास आहे की,उद्याच्या इतिहासाचे शिल्पकार आम्ही आहोत. हे आज फार मोठं आशास्थान आहे. समतेच्या लढ्याचा पराभव तर होणार नाही ना अशी शंकेची पाल मात्र कधीकधी चुकचुकते. निराशा वाटावी अशी परिस्थिती नाही असं काही म्हणता येत नाही. मात्र मानवसमाज हा सतत पुढे जात आलेला आहे. अगदी विनाशाच्या कडेवर येऊनदेखील मानवजात नष्ट झालेली नाही. ती पुढेपुढेच जात राहिलेली आहे. हा इतिहासाचा निर्णय जर आपल्याला मान्य असेल तर हे निराशेच पटल नाहीसं झाल्याशिवाय राहणार नाही !

## न्याय प्रस्थापित करणं अवघड

१९५० साली आपण खूप गोष्टी पत्करल्या. भारतीय संविधनाच्या प्रास्ताविकामध्ये सामाजिक न्याय, आर्थिक न्याय, राजकीय न्याय, संधीसमानता, व्यक्तीची प्रतिष्ठा या दिशेने आपल्या देशाची वाटचाल होणार

आहे असं नमूद केलेलं आहे. सर्व पक्षांचे लोक त्या वेळी प्रतिज्ञाबद्ध झाले. ही तत्त्वं कुठं वाईट आहेत ? न्याय कुणाला नको आहे, समता कुणाला नको आहे ? पण न्याय व समतेचं तत्त्व वास्तवाच्या पातळीवर उतरणं किती अवघड आहे ! त्या अमूर्त पातळीवर ती तत्त्वं सगळ्यांनाच आकर्षक वाटली. सगळ्यांनी ती पत्क-रलीसुद्धा. आता ३०-३५ वर्षांनंतर भारतीय समाजाचा हा विराटपुरुष जागा झाल्यानंतर आणि तो या तत्त्वांची अंमलबजावणी करा असा आक्रोश करू लागल्यानंतर विषमतेने पोखरलेल्या या समाजामध्ये न्याय प्रस्थापित करणं, व्यक्तीची प्रतिष्ठा वाढवणं किती अवघड आहे हे आता जाणवू लागलेलं आहे. आज आपल्याला समाजपुरुषाचं जे भव्य, विराट स्वरूप दिसतं आहे, हे दिसणं अपरिहार्यच आहे. इतक्या जाती, इतक्या भाषा, इतके पंथ इतके थर, वेगवेगळ्या काळात ते जागे झालेले आहेत. त्यांचं पूर्व-संचित वेगळं आहे, त्यांचे देव वेगळे आहेत, त्यांचे संस्कार वेगळे आहेत. खंडप्राय असा हा देश विषमतेने ग्रासलेला आहे. हा सगळा समाज जागा झाल्यानंतर एकदम सुसंवाद निर्माण व्हावा, एकदम सगळे प्रश्न सुटावेत अशी अपेक्षा करणं मुळातच चुकीचं आहे. या सगळ्याला आपल्याला तोंड द्यावं लागणार आहे.

## प्रगतीचं पाऊल

आजवर लाचार बनलेला, निश्चेष्ट पडलेला जो समाज होता तो आज जागा झालेला आहे, बोलू लागलेला आहे, हे प्रगतीचं पाऊल आहे असं मला वाटतं. आता ते म्हणतात की, 'ब्राह्मणोऽसि मुखंऽसि' हा काळ आता गेला. आमच्यासाठी तुम्ही बोलायचं हे आता चालणार नाही. आता आम्ही आमच्या मुखानं बोलणार. ही फार चांगली गोष्ट आहे. हजारो वर्षांची परंपरा अशी को, जे काय सगळं समाजाच्या वतीनं बोलायचं ते आम्ही बोलायचं. गोखले, टिळ-कांच्या काळापर्यंत we are the natural spokes man असं होतं. आता हे चालणार नाही असं ते म्हणतात. विषमतेने ग्रासलेल्या समाजामध्ये प्रथम विसंवादच येणार, ताणतणावच येणार. कारण असं आहे की, ही जी तत्त्वं आहेत त्याच्याही पलीकडे हितसंबंधाचा भाग असतो. ही रस्सीखेच सगळ्या जगाच्या इतिहासामध्ये आहे, तर ती आपल्याकडेही झाल्याशिवाय राहणार नाही. या सगळ्यातून आप-ल्याला जावं लागेल.

## संस्कारजड विद्यावंत

खेड्यापाड्यांतून काम करणारे बुद्धिमंत तरुण आपल्या दैनंदिन कार्यात इतके गढून गेलेले आहेत की, त्यांना तत्त्वविचाराकडे पाहायला उसंत नाही. त्यांची बौद्धिक कुवत असूनसुद्धा कृतिशीलतेचं कार्य त्यांना इतकं महत्त्वाचं वाटतं की, ज्ञानार्जनाचं व्रत करीत असतानासुद्धा कृतीच्या क्षेत्रात हे तरुण उतरलेले आहेत. त्यांना ज्ञानाचं, विद्येचं, विचाराचं पाठबळ देणं हे कुणाचं काम आहे ? मला सतत असं वाटत आलेलं आहे की, या समाजामध्ये विद्यावंत आणि कार्यकर्ते यांच्यात सतत संवाद होण्याची गरज आहे. कार्य कितीही त्यागबुद्धीनं केलं, कितीही उत्कटतेनं केलं तरी त्याच्यामागे जर काहीएक तत्त्वज्ञान नसेल तर ते निरर्थक ठरण्याचा संभव असतो. यासाठी हा सुसंवाद असणं आवश्यक आहे. आपल्या देशातले विद्यावंत हे अगदी संस्कारजड आहेत असं म्हटलं म्हणजे पुढे काही बोलायलाच नको. वेळ लागेल, आघातही होतील आमच्यावर. लोक आम्हाला जाब विचारतील आणि केव्हा तरी आमची भूमिका आम्हाला स्वीकारावीच लागेल. तो दिवस केव्हा उजाडतोय हे मी बघतोय. ज्या ज्या वेळेला कार्यकर्ते अतिशय त्वेषाने आम्हाला सांगतात की, तुम्ही काही केलं नाही आमच्यासाठी. ब्राह्मणांबद्दल लोक बोलतात, विद्या-वंतांबद्दल बोलतात. हे सगळं स्वीकारलं पाहिजे, प्रांजळपणे स्वीकारलं पाहिजे. काही उत्तर नाही त्याला आपल्याकडे. हे लोक कामं करताहेत त्यांना आपण मदत केली पाहिजे नाही तर आपल्या ज्ञानाचा काहीही उपयोग नाही असं मी मानतो. एक गोष्ट मान्य केली पाहिजे की, विद्यापीठातली आताची जी तरुण पिढी आहे तिला याची जाणीव झालेली आहे. आता तो गंभीरपणे प्रश्नाचा विचार करतो; परंतु ही संख्या कमी असणारच. टिळक–आगरकरांच्या काळात किती लोक होते ? पण हे असे जे निष्ठावंत आणि सर्वस्व झोकून देणारे थोडे लोक असतात तेच परिवर्तन घडवून आणतात. तेव्हा आज ही जाणीव झालेली आहे. गेल्या दहा वर्षांत युवक–चळवळ पुन्हा आकाराला येऊ लागलेली आहे. या चळवळीला अजून



**प्रा. सरदार यांच्या अमृतमहोत्सव समारंभासाठी उपस्थित असलेले त्यांचे चाहते**

*

परिपक्वता आली नसेल. पूर्वीसुद्धा अपुरेपणा नव्हता असं नाही; पण हे आजचं मोठं आशास्थान आहे असं मला वाटत.


विचारवंतांनी आपलं औदासीन्य झटकून टाकून कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला पाहिज. हे इतकं सोपं आहे असं नाही; पण ते केलं पाहिजे आणि मी आशावादी आहे. महाराष्ट्राच्या भूमीला एक परंपरा आहे. इथेच आंबेडकर झाले, फुले झाले, शाहूमहाराज झाले, शिंदे झाले. यालाही काही एक क्रम आहे. शंभर वर्षांमध्ये विद्यावंतांनी जर मोठं काम केलं तर पुढे काही निघणार नाही असं म्हणायला काही कारण नाही.

मी असं मानतो की, चळवळ काही एकटया-दुकटया नेत्याच्या हातून होत नाही. असंख्य लोक त्यात भाग घेतात आणि त्यांची नावनिशाणीसुद्धा आपल्याला माहीत नसते; पण नेत्याचं हे कर्तव्य आहे की, त्यानं हे जाणलं पाहिजे की, माझ्या शब्दाला आज जी किंमत आलेली आहे ती असंख्य लोकांच्या सहकार्यामुळे आहे. व्यक्तिगत गौरवाला काहीही महत्त्व नाही. महात्मा गांधींसारखा मोठा माणूस झाला तरीसुद्धा लाखो लोक तुरुंगात गेले, किती तरी लोकांनी गोळीबारापुढे आपल्या छात्या उघडया ठेवल्या आणि त्यामुळं स्वातंत्र्य आलं. नाव गांधींचं राहिलं. कुणी तरी प्रतीक म्हणून लागतंच. लिहिला गेलेला इतिहास तर आपण बदलू शकत नाही. नव्या इतिहासात हे घडू नये याची काळजी घेतली पाहिजे; पण आपलं सामर्थ्य तोकडं आहे. विचारवंतांचं सामर्थ्य तर त्याहून तोकडं आहे; पण त्याला काही एक सामर्थ्य आहे एवढा विश्वास जरी आपण ठेवला आणि या दृष्टीनं महाराष्ट्रात काही घडलं तर ही जी आदिवासी मंडळी आहेत, कार्यकर्ते आहेत यांच्यामध्ये एक आशावाद निर्माण होईल की, आपल्याला चांगला प्रतिसाद मिळाला आणि पुढेसुद्धा त्यांना तो सतत मिळत राहो अशी सदिच्छा मी व्यक्त करतो

☐

# रेला नृत्य :
## माडिया आदिवासींचा स्थायी भाव

माधव बावने



नृत्य ही अत्युच्च कला आहे. नृत्यकलेचा उगम प्राचीन काळातील आहे. भारतीय हिंदु पुराणग्रंथात देवाधिदेव श्रीशंकर हे तांडवनृत्य करीत होते असे नमूद आहे. केवळ भारतातच नव्हे, तर जगातील सर्वच ठिकाणी नृत्य ही कला आपले सन्माननीय स्थान कलाजगतात पूर्वीपासूनच ठेवून आहे. नृत्य म्हणजे प्रफुल्लित चित्तवृत्तीचा उत्स्फूर्त हुंकार मन पिसाइतके हुलके व्हावे, चित्त सैरभर व्हावे, हृदय उचंबळून यावे, देहाचा विसर पडावा, मग आपोआप पाय तालावर थय–थयू लागतात पदन्यासाला गती मिळते. लय अभौतिक पातळीवर घेऊन जाते. नृत्याचा उत्कट, अलौकिक आविष्कार साकार होतो

नृत्य ही पवित्र कला असून तिला प्रतिमेचा दैवी आविष्कार म्हटले जाते. ते संस्कृतीचे लेणे आहे; परंतु अत्यंत अप्रगत व मागासले समजले जाणाऱ्या आदिवासी माडियाच्या जीवनात नृत्याला अढळ व अटळ स्थान आहे. ह्या अजोड नृत्यकलेचा आनंदमयी प्रत्यय त्याच्या जीवनात हरघडी इतक्या सहज वाटयास येतो. की, त्यांना रानटी, असंस्कृत कसे म्हणावे असा प्रश्न मनास पडतो. माडिया आदिवासींच्या अतर्मनातून कलेचा स्त्रोत अहर्निश वाहतो. नृत्य, गाणे, कोरीवकाम शिकार, विणकाम, हस्तकला, मातीकाम, सोनारकाम परंपरेचे माडिया लोक एवढया सुबकपणे व उत्तम दर्जाचे करतात की, त्यांना मागासलेले म्हणणे जीवावर येते. फार तर ते आपल्या जुन्या प्रथा रीतीरिवाज, वैशिष्टये व परंपरा प्राणापलिकडे काळजीने जपतात, असे म्हणता येईल.

### जीवनाचे अंग

नुकत्याच नव्याने अस्तित्वात आलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील (पूर्वीचा चंद्रपूर जिल्हा) भामरागड, एटापल्ली, पेंढरी, धानोरा परीसरातील घनदाट जंगलात राहाणारे माडिया आदिवासी अतिशय नैसर्गिक जीवन जगतात. मात्र त्यासोबतच हे आपल्या अतिशय पुरातन आदिम संस्कृतोची जोपासना करतात हेही खरे आहे. भोळे, सरळ, थोडे भित्रे, पण निरागस मनाचे आणि अत्यल्प गरजा असलेले हे आदिवासी सहजपणे नित्यनेमाने नटराजाची आराधना करतात. कुठलाही देखावा, भपका अथवा मोठेपणाचा दिमाख वा आव न दाखविता माडिया ढोलाच्या तालावर केव्हा नाचायला शिकतो हे त्याला अंगाखांद्यावर खेळविणाऱ्या नद्या, नाले, जंगले. टेकडया ह्यांना देखील जाणवत नसावे; इतके नृत्य हे त्यांच्या आदिवासो जीवनाचे अकृत्रिम अंग बनून जाते.

सामुदायिकपणे नाचणे हा त्याचा अतिशय आवडता छंद. त्याला ते 'रेलॉ' असे म्हणतात. 'रेलॉ' हे केवळ त्यांच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग एवढेच नसून ते नृत्य म्हणजे त्यांचा स्थायीभाव होय असे म्हणणे योग्य होईल. रेला त्यांच्या वनवासी, संथ निष्पाप जीवनाचे

संगीत, प्रतीक होय. 'रेला' हे त्यांच्या समाधानी, संतोषी वृत्तीचे प्रतिबिंब आहे. अंधाराच्या पार्श्वभूमीवर लवलवणाऱ्या ज्वाला सोबत शेकोटीभोवती नाचगाण्याची एकच धमाल उडवून जाते, तरुण–तरुणींच्या परस्परातील स्पर्शाची अद्‌भूत असोशी शब्द, सूर, ताल यांच्या समन्वयातून ओघळताना दिसते. मद्य व मदनाचा प्रभावही अशा उत्कट नृत्यप्रसंगी नेत्रकटाक्षाच्या जुगलबंदीतून प्रत्ययास येतो.

रेलॉ म्हणजे माडिया आदिवासींचा सामुदायिक नाच हा अर्थ सहज काढता येतो. रेलॉ पुरुषांचा तसाच स्त्रियांचा देखील. स्त्री व पुरुष दोघांचा 'मिश्र रेला' असतो. त्यात स्त्री–पुरुष हा भेद नसतो. स्त्रिया आणि मुली पुरुषाच्या बरोबरीने रोज चालणाऱ्या रेल्यात नित्यनेमाने भाग घेतात फाजील शालीनता, स्त्रीसुलभ संकोच वगैरे शब्द येथे परके आहेत. प्रत्येक जण नृत्यातील कलावंत म्हणून सहजपणे वावरतो. स्त्री–पुरुष एकमेकांचे हात–हातात घेऊन किंवा कमरेत हात घालून रेल्याचे स्वर आळवीत रात्र–रात्र अनामिक आनंदात मनविभोर होऊन नाचत राहतात.

## सामूहिक कृती

'रिरीलो ऽऽ रे ऽ रिरीलो ऽऽ रिरीलो' असं म्हणत फेर धरून माडिया आदिवासी आपल्या नृत्याला सुरुवात करतो. कुठलेही का नृत्य असेना 'रिरीलो ऽ रेला ऽऽ' हे स्वर स्वाथीला असतातच. दोन–चार–दहा–वीस अशी गोलाकार फेर धरून नाचायला सुरुवात होते. येथे 'स्टेज' असते विस्तीर्ण आकाशा खालची सपाट जमीन. प्रकाशयोजनेचा सोस नाही, उलट ते वर्ज्यच, अंधारपार्श्वभूमीवर हातात–हात घेतला जातो. पावले एका लयीत पडतात. नर्तक हा समूहातील एक असतो. रेल्यातील नृत्य ही सामुहिक कृती असते. इतर लौकिक कलाप्रकाराप्रमाणे माडियाची नृत्यकला वैयक्तिक आविष्कार व अभिव्यक्ती नाही. तर समूह मनाची ती एक सतत घडत राहणारी क्रिया 'process' होय. गीत किंवा दृश्य संपले तरी नृत्य थांबत नाही. रेल्यातील स्त्री–पुरुष फेर धरून 'रे रिरी ऽऽ लो' हे स्वर आळवित, नाचवितच राहातात. नृत्य-गीत यांची ती एक प्रकारे अतूट मालिकाच असते. एकापाठोपाठ अनेक गीत नृत्यप्रकार आणि दृग्विशेष साकार होतात. अगदी झोप आवश्यक होते तेव्हाच नृत्य थांबविले जाते. तेही त्या रात्रीपुरते.

रेल्यात नृत्याबरोबर गीत असतेच. नृत्याचा आणि गीताचा जवळचा संबंध असणे अपरिहार्य आहे. रोजचा जेवणानंतरचा 'रेला' असो वा लग्न किंवा 'करसाळ' (मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ करावयाचा नाच) असो, नृत्य व गीत ओघानेच येते. किंबहुना माडियाला बसून गाता येतच नाही हेच खरे. त्यांच्या कुठल्याही गीताची सुरुवात 'रिरीलो ऽऽ रेला ऽऽ रीला' अशीच असते. 'रिरीली' म्हणत सूर धरायचे व पायाचा ताल सांभाळायचा असा रेला सुरू होते. नृत्याला पूरक असे गीत असते. आधी ताल, नृत्यातील पदन्यास आणि नंतर त्याला प्रसंगानुरूप गीत असा क्रम असतो. गीताचे अनेक प्रकार नृत्यप्रसंगी हाताळले जातात. गीताच्या साथीने रात्रभर नृत्य साकार होते. म्हणूनच त्यास नृत्यगीत म्हणायचे.

रेल्यातील गीत जेव्हा बदलते तेव्हा नृत्याचा पदन्यास बदलतो. केवळ नृत्य करण्यापेक्षा त्याच्या जोडीला लयबद्ध, ठेक्यावर सुरावटीतील, स्वरबद्ध गीत असावे अशा केवळ कल्पनेतून रेल्यातील नृत्यगीते माडिया भाषेत प्रचलित झाली असावीत. रेल्याची चाल नृत्याच्याच रचनेनुसार वेगवेगळी असते. माडिया लोक रानटी व अज्ञानी अवस्थेत असूनही त्यांची कल्पना अभिरुची आणि भावप्रकटीकरणसामर्थ्य अशा नृत्यप्रसंगी गायल्या जाणाऱ्या गीतातून सहज स्पष्ट होते. त्यांच्या रेल्याचे काही बोल असे आहेत.

रेला यो रेला ॥ धृ ॥
कुदूर उत्ता भुदुरी, कोंडामे का रो
भारुड मे मामा, कारडू, मे मामा
रेला यो रेला ॥१॥

या गीतातील युवती सांगते की, रांजीचे बुडातून कोवळा कोंब निघून तो आता करडा बास झालेला आहे. तसे आम्ही किशोरावस्थेतून तरुणपणात आलो आहोत.

निरनिराळ्या प्रसंगाची गाणी असतात, मुलींचे सासरी जाणे, राजाचे गुणगान, शिकार, लग्न करणाऱ्या उपवर तरुणाचे मनोगत, किती प्रकारची गीते असतात. शृंगार, प्रणय तर त्यांचा आवडता विषय. एखाद्या पाहुण्याचे आगमन त्यांना एवढे आवडते की, ते रेला करूनच साजरे केले जाते. अशा वेळी ठेवणीतला साज आणि पोषाख काढला जातो. पिसांचे मुकुट काढले

जातात. पायात घुंगरू, हातात काठी, चिटकुरा ह्यांच्या स्वरमेळात हातात हात गुंफून गायला नाचायला सुरुवात होते

येरे वाई रे, ये रे वाई रे
मर्मीत वाई रो, मर्मीत वाई रो... रे रेलॉ
मर्मीत बाई कबाळ किती हन्दन
निम्न संगोन, निम्म संगोन, प्रतिकिस्त वाई
सांगोना दिवाना बरीवायो रे रेलॉ . रे रेलॉ...

' या हो या पाहुणे, या, आमच्या बोलवण्याला टाळू नका आम्ही तुमचे, तुम्ही आमचे, रंगरंगोली करू या खूप मजा करू या हो या पाहुणे या. '

रेल्याला लय व गती मिळते ती ढोल, मांजरी ह्यांच्या तालावर नाचायच्या वेळी वाजवायचे ढोल माडिया खेड्यातून घरोघरी दिसतील. सर्वांना सवयीने वाजविता येते, ढोलाच्या ओढून लावलेल्या कातडीवर थाप मारल्यामुळे होणारा आवाज बराच मोठा व मर्दानी असतो. ढोलाच्या कातडीस शेक दाखवून ' डांग इ इ ग डांग ' आवाज टणकपणे कसा वाढेल त्याची काळजी घेतली जाते.

त्याच प्रकारे ' मांजरी ' ह्या वाद्यास ऊन-ऊन भात कातडीला लावल्याशिवाय पाहिजे तसा आवाज येत नाही. म्हणून मांजरी बडविताना गरम भात शिजवून एका परातीत ठेवला जातो. ह्या ढोल मांजरी वाद्याच्या उपयोग रेल्यातील नाचाबरोबर इतर उत्सव, समारंभ प्रसंगातही केला जातो.

नाचात फेऱ्यातील कमीत-कमी दोन तीन नृतकां-जवळ चिटकुरा असतो. ' चिटकुरा ' म्हणजे लाकडी सव्वा ते दिड फुट लांब लाकडी काठी. तिला कोरीव काम करून शोभिवंत केले जाते. काठीच्या मध्ये तीन चार ठिकाणी छिद्र पाडून त्यात लोखंडी ३-४ चकत्या बसविल्या जातात. चिटकुऱ्याच्या एकमेकांवर आपटण्यामुळे खूप सुरेल छुन-छुनसोबत काठ्याची ठक् ठक् असा लयबद्ध गती देणारा तालात पावले पडत असताना धुंद करणारा आवाज रेल्याची जी रंगत आणि एक-तानता वाढवितो त्यास तोड नाही.

## नेपथ्य व साज

काही खास रेल्यात वेगवेगळे रंगीबेरंगी पोषाख मुकूट-मुखवटे घालण्याची प्रथा आहे. कधीकधी वेगळी सोंगे घेण्यात येतात. कुठे-कुठे स्त्रिया नाचताना डोक्यावर पितळी मुकुट घालतात. पुरुष पिसे, कवड्या शिंगाचा उंच टोप किंवा मुकुट घालतात. मुकुटात खोवलेली पिसे स्वतः शिकार करून मिळवलेली असतात. दुर्मिळ पिसे मिळविणे व अभिमानाने लावणे माडियाच्या शिकारी वृत्तीस साजेशीच आहे. जास्तीत जास्त आणि विविध प्रकारची पिसे खोवून असा रसिक तरुण रेल्यातील तरुणींची मने जिंकणे मग सहज असते. तो समारंभात आपली विशेष छाप पाडतो.

समारंभाच्या वेळी होणारा रेलॉ विशेष धडाक्याने होतो. याप्रसंगी सर्वांनी गेलेच पाहिजे असा दंडक आणि संकेत आहे. एखाद्या युवक किंवा युवती रेल्यात येण्याचे जाणून बुजून टाळत असेल तर त्यांना १० रुपये पर्यंत दंड द्यावा लागतो.

रेल्यात नाचताना फारसे संकेत नियम पाळावे लागत नाहीत. जेवणे झाल्यानंतर कुटुंबातील साथी मंडळींनी चांदण्याच्या प्रकाशात अंगणात एकत्र येऊन धिळोप्याच्या गप्पा माराव्यात, एवढा सहजपणा माडियाच्या रोजच्या नाचात असतो. लवकर जेवण आटोपून आपल्या हातात टिपऱ्या चिटकुरा, काठ्या घेऊन ठेका धरीत नाचणे, गाणे गात फेर धरणे हा माडियाचा आवडता छंद असतो. मनसोक्त गप्पा, थट्टा विनोद करून दिवसभर पडलेल्या कष्टाचा विसर पडावा, सर्व समाजाने कुटुंबाप्रमाणे एकत्र येऊन एकात्मतेचा विकास करावा, आपसात मोकळे संबंध ठेवणे, मतभेदांना मोकळी वाट करून देणे, किती म्हणून परंपरागत रेल्याच्या मागील कारणे सांगावी ? अगदी सहजपणे परंपरेने माडियाच्या अप्रगत रानटी वनवासी जीवनात हा ' रेला ' हे सारे घेऊन येतो.

' करसाळ म्हणजे तर पंचक्रोशीतल्या उत्साहाला उधाण आणणारा नृत्याची संधी देणारा श्राद्धवजा उत्सव. गावा गावातून माडिया लोक निरोप मिळाला न मिळाला तरी नुसते कार्यक्रमाची माहिती मिळवून चालत आपले वाजविण्याचे नाचण्याचे साहित्य घेऊन वाजत-गाजत निरनिराळ्या पोषाखात येतात. नृत्य-गायनाची एकच धमाल उडून जाते. रात्र रात्र खाणे व नाचणे गाणे चालते माडिया नाचतो व थकला की जेवून पुन्हा नाचत राहातो. नाचण्याचा थकवा येतच नाही.

लग्न, विशेषप्रसंगीचा नाच महत्त्वाचा असल्याने त्या दृष्टीने नाचायची तालीम होते. त्यात कसूर नाही.

संक्रांतीनंतर माडियाच्या मुलुखातून नुसते हिंडा वेशी-वर तुम्हाला रिरीलो–रेला ऽऽ रिरीलो ऽऽ असे स्वर वाऱ्याच्या हिंदोळ्यावर तुमच्यापर्यंत येतील. तुमचे पाय आपोआप नादात ताल आणि सुराच्या दिशेने पडत जातील. असा नाच गावा–गावातील 'घोटुल' मध्ये रोज सांज झाल्यावर होतो. घोटुलात नाचण्यासाठी तर हा माडचा (माडियाचे प्रचलित नाव) आपले आयुष्य निछावर करील.

'रेलॉ' माडियाचा जणू प्राणच आहे तो नाचता नाचता लहानाचा मोठा होतो. रेल्यात त्याच्या जीवनास गती लाभते. रेला त्याला तरुण बनवितो. तरूणीचा पहिला ज्वानस्पर्श तो रेल्यातच अनुभवतो. रेल्यात पावले पावलांशी जुळवित बरोबर वाद्याचा ताल व नृत्यगीतातील लयीबरोबर पदन्यास टाकताना युवक युवतींच्या नजरा भिरभिरत असतात. आपल्या गावी जोडीदाराच्या शोधात आपले लग्न ठरविण्याचा पूर्ण अधिकार तरुणांना असतो. रेल्यात नाचतांना मग आपल्याला आवडते ती व्यक्ती कायमची जीवसाथी म्हणून पारखून पसंत केली जाते. मुलगी मुलाला आपल्या वडीलांकडे विधीवत मागणी घालायला बोलावते. दोन मने 'रेलॉ' जुळवितो. माडियाच्या जीवनात एवढे 'रेल्याचे' स्थान की, त्याच्या जीवनातील रेलॉ वगळावा तर माडिया आपली अस्मिताच हरवून बसावा !

रेलॉ रोज सहज घडणारी एक काव्यमय घटना असतो रेल्याचे माडियाच्या जीवनातले स्थान वैशिष्टच पूर्ण आहे रेलॉ म्हणजे प्रेमी युगुलांचे भेटण्याचे संकेत स्थल असते. ज्यांचो मिलनाकडे वाटचाल सुरू असते. त्यांना घोटुलातील रोजचा रेलॉ म्हणजे प्रणयसाधनेचा मुक्त परवानाच असतो. रेला केवळ नृत्यकला नसून ते बनते मग माडियाचे काव्यमय स्वप्न. त्याचे सारे आयुष्यच संगीतमय, सूरमयी, भावमधूर बनविणारे ते त्याचे आशास्थान असते. त्याच्या चिरंतन स्मृतीत तो अक्षरशः जगतो. त्याच्या जीवनातील क्षण न क्षण रेला व्यापतो. तो मरतो; पण त्याच्या मरणातही धुंद करून सोडणारा 'रेलॉ' बेभानपणे साजरा केला जातो. असे वाटते की, मानव मर्त्य आहे; पण रेलॉ अमर आहे, कारण प्राण सोडून जातानाही रेल्याचे स्वर माडियाच्या कानाशी रुंजी घालतात जणू रेल्याचे स्वर अमर असतात!

---

–महाराष्ट्रातील आणखी एक उपेक्षित वर्ग हा आदिवासींचा होय. पूर्वीच्या हैद्राबाद राज्यातील एक तालुका राजुरा आणि दुसरा किनवट येथे तसेच चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा जिल्ह्यांत गोंड, कोलाम, नायकपोड, प्रधान इत्यादी आदिवासी जमाती आहेत. त्याशिवाय ठाणे, धुळे, नगर भागांतही आदिवासी जमाती आहेत. या आदिवासींचे लोकसाहित्य महत्त्वाचे आहे हे मी अनुभवाने सांगू शकतो. आदिवासींचे साहित्य मराठी साहित्याचा एक भाग बनणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकडे दुर्लक्ष झाले तर मराठी साहित्याची आणि भाषेची निश्चितच हानी होईल.

**–सेतू माधवराव पगडी**

(बोरीवली येथील रौप्यमहोत्सवी मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणातून)

---


# आदिवासींनी अभ्यासलेली पक्ष्यांची काही वैशिष्टये

| नाव | थोडक्यात वैशिष्टये |
| --- | --- |
| कावळा | स्थानिक हवामानाचा जाणकार |
| बग-बगळा | एकाच झाडावर सर्वांची घरटी असतात |
| गीद-गिधाड | (१) ज्या शिवारात जनावर मेले असेल त्याच शिवारात उतरणारा<br>(२) वतनदारी पक्षी |
| हारोड | जमिनीला पदस्पर्श न करणारा |
| पारवा | प्रथम बुंध्याजवळ पडून तेथून झाडाच्या शेंड्यापर्यंत चढून नंतर उड्डाण करणारा |
| भेनस | अंडी उबविताना गळ्याभोवती चिखलाचा पक्का लेप देणारा |
| शिवशंकर | गावात रोगराई येण्याचे भविष्य वर्तविणारा |
| भिंगराज | याच्या चतुराईवर आदिवासी लोक–कथा बनविल्या गेल्या |
| पोपली | पर्जन्य उघाड व उष्णतावाढ वर्तविणारा |
| काकड कुंभाऱ्या (भारद्वाज) | घरट्यात पिल्लांसाठी जिवंत सर्प ठेवणारा |
| मोर | (१) उघड्या फांदीवरच झोपणारा (रंग बदलणारा सरडा हा त्याचा शत्रू म्हणून)<br>(२) हवामान ढगाळ असल्यासच ओरडणारा<br>(३) अंडी उबविताना बिचकून दक्षिणेकडे गेल्यास परतून न येणारा<br>(४) पांढरे दगड पचविणारा |
| टिटवी | (१) पाण्याशिवाय इतर जागी न वावरणारा<br>(२) गावातील कोणी तरी नक्की मरण्याचे भविष्य सुचविणारा |
| बोंबल्या | (१) थंडीची लाट सुचविणारा |
| कनिल | डोळ्यात लहान मुलाच्या नखाप्रमाणे थर असणारा |
| पिरवीट | (१) एकाच बिळात ७ वेळा अंडी घालून सर्व खेपांची पिल्ले एकाच वेळी बिळातून बाहेर काढून निघून जाणारा |
| साळमोरडा | फोलून भाताचे (धान) दाणे खाणारा |
| हळदून | अतिथिआगमन सुचविणारा |
| पाणकेवडा | पर्जन्यवृष्टीदर्शक आवाज करणारा |
| भोजा | पर्जन्यउघाडीचे भविष्य सुचविणारा |

संग्राहक : गं. जा. आवारीगुरुजी

# विज्ञान :
# असली आणि नकली

**माधव गाडगीळ**



मराठी विज्ञानपरिषदेच्या उदगिर येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनात डॉ. माधव गाडगीळ यांनी अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणाचा सारांश

□

**विसाव्या शतकात विज्ञान ही एक प्रचंड सामाजिक शक्ती बनली आहे. विज्ञानाधिष्ठित तंत्रज्ञानाने आपले सारे आर्थिक जीवन पालटून टाकले आहे. यांत्रिक उद्योग, नवी खते, कीटकनाशके आणि पिकांच्या संकरित जाती, आगगाड्या, विमाने आणि उपग्रह, गणकयंत्रे या साऱ्यांनी एक नवे जग निर्मिले आहे. या जगात साहजिकच नवी मूल्येही उद्भवली आहेत.**

ही नवी मूल्ये अनेकदा जुन्या पारंपरिक मूल्यांच्या विरुद्ध जातात. जुन्या–नव्याच्या या विसंवादात आपण कोणती मूल्ये स्वीकारावी हा आपल्या समाजापुढचा फारच महत्त्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न आपण कसा सोडवतो यावर आपल्या समाजाचे भवितव्य मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहणार आहे.

ह्या असाधारण महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात मराठी विज्ञानपरिषदेसारख्या संस्था फार मोठे कार्य करीत आहेत आणि करणार आहेत. कारण या प्रश्नाचे उत्तर शोधणे हे केवळ वैज्ञानिकांचे, तंत्रज्ञांचे कर्तव्य नाही, ते साऱ्या समाजाचे कर्तव्य आहे. जोवर विज्ञान आणि तंत्रविद्या बाकीच्या समाजापासून दूर राहतील तोवर सारा समाज या प्रश्नांचे उत्तर शोधण्यापासून दूर राहील. परिणामी समाजाचा एक छोटासा, अप्रातिनिधिक वर्ग आपली मते सर्व समाजावर लादण्याचा प्रयत्न करील. हा वर्ग बहुजन समाजापासून जितका तुटलेला, त्याच्याशी असमरस असेल, तितकी ही मते, ही मूल्ये सगळ्या समाजाच्या दृष्टीने अयुक्त असतील आणि शेवटी समाजहिताला घातक ठरतील. हे टाळायचे असेल तर विज्ञान आणि तंत्रज्ञान हे लोकाभिमुख झाले पाहिजे. वैज्ञानिक आणि तंत्रज्ञ समाजाशी समरस झाले पाहिजेत !

## क्रांतिकारी विज्ञान

मी एक जीवसृष्टीचा अभ्यासक आहे आणि माझे संशोधन मुख्यत: जीवसृष्टी, मानवजात आणि परिसर ह्यांच्या परस्पर संबंधाविषयी आहे. ह्या माझ्या विषयाला परिसरविज्ञानाला, अनेकदा एक क्रांतिकारी विज्ञान अशी संज्ञा दिली जाते. परिसरविज्ञान अशी काय क्रांति घडवून आणत आहे ? ही क्रांति मानवी मूल्यांशी निगडित आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या गेल्या दोन शतकांच्या अचाट प्रगतीमुळे मानवजातीचे डोळे दिपले आहेत. त्यामुळे वैज्ञानिक निकषावर जे जे मान्य होते, तेच केवळ समाजहिताला उचित आहे, विज्ञानाधिष्ठित आहे असे आधुनिक तंत्रज्ञान हेच केवळ स्वीकारणीय आहे. बाकी पारंपारिक समजुती या वेडगळपणाच्या अंधश्रद्धा आहेत आणि पारंपारिक तंत्र हे मागासलेले, अतएव टाकाऊ आहे, अशी मूल्ये मोठ्या प्रमाणावर मान्य झाली आहेत. परिसरविज्ञान आज या मूल्यांना आव्हान देत आहे.

विज्ञान ही एक प्रकारची विचारपद्धती–कार्यपद्धती आहे. कोणतेही विधान अखेरीस प्रत्यक्ष प्रमाणावर आधारित असले पाहिजे, कपोलकल्पित प्रमेयांवर नव्हे

हे या पद्धतीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. या पद्धतीचा कटाक्षाने उपयोग करीत गेल्यामुळे आज मानवाच्या एकूण ज्ञानाच्या भांडारात प्रचंड भर पडली आहे, हे निर्विवाद आहे आणि या ज्ञानाचा उपयोग करून मानवाने जी आधुनिक तंत्रे निर्मिली आहेत त्या तंत्रविद्येने माणसाला निसर्गावर प्रभुत्व प्रस्थापित करता आले आहे हेही उघड आहे; परंतु अखेर हे विज्ञान आणि तंत्रज्ञान मूल्यरहित आहे. याचा उपयोग जसा मानवी जीवन अधिक सुखी करण्यासाठी होऊ शकतो, तसाच अधिक दुःखी करण्यासाठीही होऊ शकतो आणि असा वाईट उपयोगही मोठ्या प्रमाणावर करण्यात आला आहे, हेही स्पष्ट आहे. या दुष्परिणामातील एक कदाचित सर्वांत महत्त्वाचा दुष्परिणाम म्हणजे मानवी परिसराचा नाश ! या नाशाचा अभ्यास हे परिसर विज्ञानाचे एक अंग आहे. त्यामुळे विज्ञानाधिष्ठित तंत्रज्ञानाचे दुष्परिणाम दाखवून देणे हे परिसरविज्ञानाचे एक कर्तव्य ठरते. परिसरविज्ञानाच्या ह्या कर्तव्यामुळे ते एक क्रांतिकारी विज्ञान बनले आहे. कारण असा अभ्यास करताना अनेक पारंपरिक समजुती, अंधश्रद्धा या परिसराच्या संतुलनाला पोषक होत्या, अनेक पारंपरिक तंत्रे ही परिसराच्या दृष्टीने समर्पक होती. याउलट अनेक आधुनिक मूल्ये, आधुनिक तंत्रज्ञान हे परिसराच्या संतुलनाला घातक आहेत असा निष्कर्ष निघतो.

विज्ञानपूर्व कालातही शहाणपण होते आणि आधुनिक वैज्ञानिक युगातही अनेक गोष्टी समाजविघातक आहेत असे कबूल केल्यास प्रत्येक गोष्टीचा खूप खोलवर विचार करणे भाग आहे. माझ्या मते असा खोलवर विचार करणे आणि त्या प्रक्रियेत सारा समाज सहभागी करून घेणे ही निकडीची गरज आहे.

हा विषय पुरा समजून घ्यायचा असला तर आपल्याला मानवजातीच्या विज्ञानपूर्व कालातील ज्ञानाचा, परंपरांचा आढावा घ्यावा लागेल. असा आढावा घेता घेता आधुनिक विज्ञान कसे निर्माण झाले, त्यामागच्या प्रेरणा काय होत्या हे पाहावे लागेल आणि शेवटी आधुनिक विज्ञानाचे आजचे सदुपयोग आणि दुरुपयोग, त्याचे खरे स्वरूप काय आणि त्याचे विडंबन कसे झाले आहे याचा मागोवा घ्यावा लागेल. या सर्व विवरणाला प्रत्यक्ष उदाहरणे म्हणून मानव आणि जीवसृष्टीच्या परस्पर संबंधांचा इतिहास मी वापरणार आहे.

महाकाय गजराजांचे मला पहिल्यापासून आकर्षण. तेव्हा दहा वर्षांपूर्वी बंगलोरला गेल्यावर पहिला कार्यक्रम ठरविला हत्तींशी जानपहचान वाढवण्याचा. बंगलोरजवळ बंडीपुराचे प्रचंड अभयारण्य आहे. तिथे एक छोटासा संशोधन प्रकल्प हाती घेतला आणि पहिल्या दिवशीच कळले की, हत्तींच्या मुलखात काम करणे ही जोखमीची गोष्ट आहे. दर वर्षी दक्षिण भारतात १५–२० लोक हत्तींच्या पायी मृत्यू पावतात तेव्हा त्यांच्याच जंगलात जगायचे असेल तर फार सावध राहायला पाहिजे. हत्तींशी ओळख करून घेता येईल. त्यांचा अभ्यासही करता येईल; पण तो करताना सारखे हत्तींचे कळप कोठे आहेत, त्यांच्यापासून सुरक्षित अंतर किती आहे हे अजमावत राहिले तरच. नाही तर मामला खतम. मग बंडीपुरातल्या काडुकुरुबा आदिवासींच्या हाताखाली हे सगळे शिकायला लागलो आणि हत्तींबरोबरच विज्ञानाच्या उगमाबद्दलही बरेच काही शिकलो.

हत्तींच्या जंगलात राहणारे हे आदिवासी क्षणोक्षणी कान नाक डोळ्यांचा वापर करून हत्तींबाबत अनुमान बांधत असतात. आणि हे आदिवासी ही अनुमाने नुसती बांधत नाहीत तर पुन्हा पुन्हा त्याचे तथ्य तपासत राहतात.

## उंबराची फळे

अवती - भोवतीच्या जगातील प्रत्यक्ष चिन्हांचा आणि ही चिन्हे कशी निर्माण होतात याच्या अनुभवांचा वापर करून हे आदिवासी शितावरून भाताची परीक्षा करत होते. त्यासाठी एकाला जोडून एक तर्क लढवत होते आणि ती अनुमाने प्रत्यक्ष अनुभवाने तपासून पाहात होते. मानवी ज्ञानाची सुरुवात अशीच झाली असणार. हे ज्ञान होते तत्क्षणी जरूरीचे, अगदी जगण्या–मरण्याच्या प्रश्नाशी निगडित असलेले; पण मानवी जीवनाच्या अगदी प्राथमिक अवस्थेतही सर्व ज्ञान समजुती केवळ उपजीविकेशी संबद्ध होत्या का ? या आदिवासींच्याही अनेक धार्मिक समजुती, चालीरीती असतात. वड–पिंपळ–उंबरांना तोडायचे नाही अशी त्यातलीच एक समजूत. ही आजवर सगळ्या भारतीय समाजात पसरलेली दिसते. आता आमचे आधुनिक परिसरविज्ञान वड, पिंपळ, उंबरांना एक विशिष्ट स्थान देते प्रत्युपकारी वनस्पती जाती म्हणून त्यांच्या फळांवर इतर अनेक कीटक, पक्षी, पशू अवलं-

बून असतात. जोवर रानात ही झाडे टिकून असतात, तोवर इतर अनेक जातींचे प्राणीही राहू शकतात. तेव्हा अभयारण्यात या प्रकारची झाडे मुद्दाम राखावीत असे आधुनिक विज्ञान सांगते.

भारतातच नव्हे तर इतरत्रही म्हणजे आशिया, आफ्रिकेत वड-पिंपळ–उंबरांना पवित्र वृक्ष म्हणून स्थान दिले आहे. आधुनिक विज्ञानही असे विशिष्ट स्थान देते. हा केवळ योगायोग होता काय ?

## शास्त्रगति

आजूबाजूच्या परिसराबद्दलच्या समाजाला, त्याबद्दलच्या साध्या ज्ञानाला फार पूर्वी सुरुवात झाली असणार. मनुष्यप्राणी प्रथम भाषा शिकला, वापरू लागला पंचवीस–तीस हजार वर्षांपूर्वी. याच्या पुढचा पल्ला गाठायला हे ज्ञान पद्धतशीर बांधायची आवश्यकता होती. असे पद्धतशीर बांधलेले ज्ञान म्हणजे शास्त्र अशा शास्त्रांची सुरुवात खगोलशास्त्रापासून झाली असावी. दरवर्षी बंडीपुरात हत्तींचे मोठे कळप वैशाखात येतात आणि कार्तिकापर्यंत राहतात या चक्राबरोबरच आकाशातल्या नक्षत्रांची स्थितीही हळूहळू बदलत राहते. यांचा परस्पर संबंध जोडायला ज्ञान खूपच पद्धतशीरपणे गोळा करायला हवे हे सुरू झाले असावे. कृषीसंस्कृतीच्या सुरुवातीपासून, आठ-दहा हजार वर्षांपूर्वी. खगोलाला पूरक म्हणून गणित आणि जीवसृष्टीच्या रासायनिक गुणांच्या परिक्षेवर आधारलेले आयुर्वेदाचे ज्ञान ही अगदी पुरातन शास्त्रे अशीच मानवी संस्कृतीच्या पहाटे पहाटे जन्मली असावीत.

या शास्त्राच्या प्रगतीतून मानवाला विश्वाची आणखी कारण परंपरा समजत चालली; परंतु त्याबरोबरच अगम्य, अतर्क्य असेही खूप राहिले. त्यामुळे मानव विश्वातील अनेक घटनांची मीमांसा दैवी चमत्कार म्हणून करत राहिला. सूर्य आणि चंद्रग्रहणे केव्हा लागतील याचे बिनचूक गणित मांडून झाल्यावरही ही ग्रहणे राहू–केतूंनी सूर्य चंद्र गिळल्यावर लागतात हा कार्यकारण भाव बदलला नाही. जोवर दैवी चमत्कारांनी वाटेल ते घडू शकेल असे मानव मानत होता. तोवर संपूर्ण विश्वाची कारणपरंपरा एका सुसंगत सूत्रांत बसावयाची गरज नव्हती. जरी अनेक शास्त्रात विविध घटनांचा परस्पर संबंध व्यवस्थित जोडला गेला तरी असा संबंध कसोशीने तपासून पाहायची पद्धती अजून निर्माण झाल्या नव्हऱ्या त्यामुळे खऱ्याखऱ्या प्रात्यक्षिक प्रमाणांवर आधारलेल्या खगोलशात्र, आयुर्वेदाच्या जोडीलाच केवळ कपोलकल्पित संबंधांवर आधारलेल्या ज्योतिषशास्त्रासारख्या शास्त्रांनाही मान्य केले गेले होते. या साऱ्या भेसळीमुळे विज्ञानपूर्वकालात शास्त्राची प्रगती अडखळत, चाचपडत, हळूहळू होत राहिली.

## विद्वगणाची मक्तेदारी

या विज्ञानपूर्व युगातही मानवाने प्रचंड शास्त्रसंग्रह केला. इतका की हे शास्त्रज्ञान आत्मसात करायला आयुष्य वाहायची जरूर होती. शिकारी टोळ्यांच्यातसुद्धा काही असे विशेषज्ञ असतात. ऋतुमानाची, जडीबुट्टीची, जनावरांच्या हालचालींची खास माहिती त्यांच्याकडे असते. कृषिसमाजात ह्या जीवनपद्धतीचा विकास होऊन विद्वानांचा स्वतंत्र व्यावसायिक वर्ग निर्माण झाला. ह्या वर्गाच्या हाती असलेले ज्ञान महत्त्वाचे होते, प्रभावी होते. ऋतुमान अचूक वर्तवणे, रोगांवर योग्य त्या जडीबुट्टीचा वापर करणे हा खरोखरीच जीवनमरणाचा प्रश्न होता. शिवाय ज्योतिष, मंत्रतंत्रालाही समाजात मोठे महत्त्व होते. या सगळ्याचा वापर विद्वानांनी आपल्या पोळीवर तूप ओढण्यासाठी करावा हे मनुष्यस्वभावाला धरून होते. तेव्हा जगभरच सुसंस्कृत समाजात ज्ञानाची मक्तेदारी पटकावलेले वर्ग हळूहळू निर्माण झाले.

भारतीय जातीसमाजात ही मक्तेदारी पराकोटीला गेली. ह्या समाजात विवाहसंबंध अगदी लहान लहान पोटजातींपुरते मर्यादित झाले. प्रत्येक पोटजातीचा एक एक जातीपरंपरागत व्यवसाय निश्चित झाला. हा त्यांचा स्वधर्म. विद्याव्यासंग हा ब्राह्मणवर्गातील पोटजातींचा स्वधर्म ठरविण्यात आला. फासेपारध्यांकडे पारधीबद्दलचे, धनगरांकडे पशुपालनाचे, सुतारांकडे लाकूडकामाबद्दलचे, कुणब्यांकडे शेतीचे बरेच ज्ञान होते; परंतु इतर जातींकडचे हे ज्ञान आदिवासी समाजातल्या ज्ञानाप्रमाणे असंघटित होते. सुसंबद्ध रीतीने वाढवलेल्या सूक्तात, ग्रंथात ओवलेल्या सर्व प्रगत शास्त्रांचा मक्ता होता केवळ ब्राह्मणांकडे !

ज्ञानाचा मक्ता पटकावलेल्या ब्राह्मणांचा इतर जगाशी असलेला संबंध खूप तुटला होता. प्रत्यक्ष रानावनातील वनस्पतींचे ज्ञान वैदू, धनगर, कुणब्यांसारख्या

शूद्र वर्णातल्या जातींकडे होते. तर या वनस्पतींच्या उपयोगाचे सूत्रबद्ध आयुर्वेदाचे ज्ञान ब्राह्मणांकडे होते. अशा रीतीने प्रत्यक्ष ज्ञानाची आणि सूत्रबद्ध ज्ञानाची फारकत झाल्यामुळे जातीसंस्था निर्माण झाल्यावर आयुर्वेदाची प्रगती कुंठित झाली. पुढे पुढे सूत्रांत सांगितलेली वनस्पती खरोखर कोणती याबाबत अनेक घोटाळे निर्माण झाले.

## लोकायन

ब्राह्मणवर्गाची ही ज्ञानाची मक्तेदारी, त्यांनी केलेली प्रत्यक्ष प्रमाणाची आणि काल्पनिक प्रमेयांची भेसळ ही सर्वांनाच मान्य नव्हती. इसवी सनपूर्व सहाव्या शतकात याला आव्हान देणारी लोकायन नावाची परंपरा भारतात उद्‌भवली. दुर्दैवाने या परंपरेचे सर्व मूळ ग्रंथ नष्ट झाले आहेत, आणि तिचे स्वरूप माधवाचार्यांच्या 'सर्वदर्शनसंग्रहा' सारख्या खंडनात्मक ग्रंथावरून ताडावे लागते. या साधनावरून ही परंपरा प्रत्यक्ष प्रमाणवादी, नास्तिक आणि इहवादी होती असे दिसते. ही लोकायतिक भूमिका जर भारतात मूळ धरू शकली असती तर विश्वाच्या कारणमीमांसेतून दैवी चमत्कारांची उचलबांगडी होऊन भारतीय शास्त्रांची पुढे प्रगती होऊ शकली असती; परंतु तसे झाले नाही.

## देव–दानवा नरे निर्मिले

भारतीय ज्ञानस्रोत असा निश्चल झाला तेव्हा युरोपीय देशात त्याला हळहळू गति मिळू लागली. विशेषत: इसवी सनाच्या पधराव्या शतकापासून युरोपात प्राचीन शास्त्रांचे आधुनिक विज्ञानात परावर्तन होत होते. प्रत्यक्ष प्रमाणाचे महत्त्व स्थापन होणे हे या परावर्तनाचे मुख्य कारण होते. अर्थात यानंतरही अनेक शतके विज्ञान दैवी लीलेला मानून राहिले. ईश्वरी इच्छेने जग कसे चालते याचा अभ्यास म्हणजे विज्ञान असे खुद्द न्यूटन मानत होता; परंतु त्यांच्या गुरुत्वाकर्षणाच्या नियमांनी बुधाची परिक्रमा नीट वर्तवता आली नाही. तेव्हा वैज्ञानिकांनी ही दैवी लीला म्हणून सोडून दिली नाही. उलट ती परिक्रमा गुरुत्वाकर्षणाच्या नियमात का बसत नाही याचा छडा ते लावत राहिले. हळूहळू निसर्ग हा पूर्णपणे नियमबद्ध आहे आणि हे नियम शोधून काढणे हेच विज्ञानाचे इतिकर्तव्य आहे. ही कल्पना दृढ झाली. अर्थात विज्ञानाचे नियम अनेक प्रश्नांची उत्तरे तेव्हाही देऊ शकत नव्हते. व आजही देऊ शकत नाहीत; पण अखेर या निसर्ग नियमांपलिकडे काही नाही. निसर्गाची कारणमीमांसा करताना दैवी हस्तक्षेपाचा उल्लेख करण्याची जरूरी नाही, हे मत पसरत गेले. विख्यात गणितशास्त्रज्ञ लप्लासने १८२७ मध्ये ईश्वर या कल्पनेची मला काहीही गरज वाटत नाही असे जाहीर केले. अशा रीतीने एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी भौतिक शास्त्रातून दैवी लीलेची हकालपट्टी झाली आणि त्याच शतकाच्या शेवटी डार्विनचा उत्क्रान्तिवाद शास्त्रमान्य झाल्यावर जीवविज्ञानातूनही दैवी लीलेची उचलबांगडी झाली.

प्रत्यक्ष प्रमाणावर आधारलेल्या निसर्गनियमांनी साऱ्या जगाची कारणपरंपरा लावायची हे तत्त्व अशा रीतीने प्रस्थापित होणे ही युरोपीय विज्ञानाच्या यशाची गुरुकिल्ली होती, हे प्रत्यक्ष प्रमाणाचे महत्त्व स्थापन होण्यात युरोपीय समाजरचनेचा प्रभाव निश्चित पडला. कारण युरोपीय समाजात शिक्षण ही केवळ पुजाऱ्यांची मक्तेदारी नव्हती. मोठे शेतकरी, व्यापारी, कारागीर हेही शिकू शकत होते. विज्ञानाच्या अभ्यासात, संशोधनात भाग घेऊ शकत होते. त्यामुळे आजूबाजूच्या सृष्टीशी प्रत्यक्ष नाते असलेले लोक विज्ञान स्रोतात सहभागी होऊन त्याच्या प्रगतीला हातभार लावू शकत होते. या लोकांच्या सहभागामुळे युरोपात विज्ञानाचा वापर करून तंत्रज्ञानही पुढे यावयाला लागले. एकोणीसाव्या शतकात विज्ञानाधिष्ठित तंत्रज्ञानाने युरोपातल्या आर्थिक–सामाजिक जीवनात प्रचंड क्रांति घडवून आणली.

## धर्म की निसर्ग नियम

मनुष्यप्राण्याला सर्व आचार–विचारांचे काही तरी तात्त्विक समर्थन करण्याची जरूरी भासते. अशा समर्थनासाठीच वेगवेगळे धर्म, अध्यात्म, तत्त्वज्ञान सर्व मानवसंस्कृतीत निर्माण झाले आहेत. असे सारे धर्म नेहमीच समाजातल्या विषमतेचेही समर्थन करतात; परंतु एकोणिसाव्या शतकातील युरोपात वैचारिक आणि आर्थिक जीवनातून धर्माचा प्रभाव नाहीसा होऊ लागला होता. हा प्रभाव नाहीसा होण्याचे मूळ कारण असलेले विज्ञान धर्म निष्प्रभ झाल्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यास पुढे येत होते.

साहजिकच एकोणिसाव्या शतकातील जगात जे जे बदल घडत होते त्यांचे समर्थन करण्याची जबाबदारी धर्माकडून विज्ञानाकडे आली. ईश्वराची जागा आता निसर्गनियमांनी घेतली. जे जे निसर्गनियमांना धरून आहे ते ते योग्य, इतर सारे असमर्थनीय असे तत्त्वज्ञान मान्यता पावू लागले. अर्थातच विज्ञानाधिष्ठित तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन सत्तेवर आलेला वर्ग या तत्त्वज्ञानाचा फायदा घेण्यासही पुढे सरसावला. हा वर्ग या वेळी मोठ्या प्रमाणावर युरोपीय देशातील श्रमिक वर्गाच्या आणि जिंकलेल्या इतर खंडांतील देशांच्या सर्व साधनसंपत्तीच्या शोषणात गुंतलेला होता. तेव्हा हे शोषण पूर्णपणे निसर्गनियमांना धरून आणि अतएव विज्ञानाच्या कसोटीवर समर्थनीय आहे हे दाखवून देण्याचा अट्टाहास सुरू झाला.

यासाठी निर्माण झालेल्या विचारपरंपरेला 'सामाजिक डार्विनवाद' म्हणतात. मानवसमाजातील भेदाभेद हे आनुवंशिक उच्चनीचतेवर अवलंबून आहेत. युरोपातील सत्ताधारीवर्गातील लोक हे निसर्गत च श्रेष्ठ आहेत. त्यामुळे इतरांवर त्यांनी सत्ता गाजवणे, त्यांचे शोषण करणे हे निसर्गाला धरून आणि म्हणून उचित आहे, असे हे प्रतिपादन होते. अर्थात वैज्ञानिकदृष्ट्या ही कल्पना मांडून ती प्रत्यक्ष प्रमाणाच्या निकषावर तपासून पाहण्यास काहीच हरकत घेता येत नाही; परंतु ही कल्पना पुढे आल्यावर अनेक वैज्ञानिकांनी खोटानाटा पुरावा, तर्कदुष्ट मांडणी करून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, असा इतिहास आहे.

## निसर्गसंपत्तीचे शोषण

युरोपातील सामाजिक विषमतेच्या समर्थनासाठी एक 'नकली' विज्ञान युरोपीयांनी जिंकलेल्या देशांच्या निसर्गसंपत्तीचे शोषण ज्या प्रकारे सुरू केले होते, त्याच्या समर्थनासाठी निर्माण झाले. इंग्रजांच्या अशा शोषणाचा एक मुख्य रोख भारताच्या वनसंपत्तीवर होता. आरमाराच्या आणि व्यापारी नौका बांधण्यासाठी इंग्रजांना प्रचंड प्रमाणावर लाकडाची जरुरी होती. भारतावर सत्ता प्रस्थापित करेपर्यंत त्यांनी स्वतःच्या देशातील जंगलाची वाट लावली होती. त्यामुळे ब्रिटीश राज्याच्या पहिल्या काही दशकांत भारतात मनमुराद जंगलतोड केली गेली; पण मग जेव्हा इंग्रजांच्या नौका बांधणी व्यवसायाला भारतातून पुरेसे लाकूड मिळेनासे झाले तेव्हा याबद्दल विचार सुरू झाला.

इंग्रजांचा पहिला रोख मलबारच्या सागवानी जंगलांकडे वळला. १८०७ साली ईस्ट इंडिया कंपनीने साऱ्या वृक्षराजीवर आपली सत्ता जाहीर केली. कंपनीने स्थानिक लोकांच्या शेतात घुसून फुकट झाडे तोडून नेली. उलट स्वतःच्या शेतावर वाढणारी झाडे तोडण्यासाठी शेतकऱ्यांना कंपनीला पैसा भरण्याची सक्ती करण्यात आली. ह्या काळात जंगलखाते स्वतः एकही झाड लावत नव्हते. या जुलमाविरुद्ध असंतोष इतका वाढला की १८२२ मध्ये मलबारातील इंग्रजांचे जंगलखाते गुंडाळण्यात आले. मलबारातील हा प्रकार अपवादात्मक नव्हता. सर्वच देशभर हे चालू होते. काही विचारी इंग्रजांनाही हे पसंत नव्हते. इतके की, १८७८ मध्ये मद्रासच्या राज्यपालाने तत्कालीन ब्रिटिश वनव्यवस्था हीही 'वनसंरक्षण' नव्हे तर वनसंपत्तीचा 'जबरदस्तीने कबजा बळकावणे' आहे, असे मत नमूद केले आहे.

## पारंपरिक वनव्यवस्था

इंग्रज आरमाराच्या, सैन्याच्या व इंग्रजी उद्योगव्यापाराच्या गरजा पुरवण्यासाठी भारताच्या वनसंपत्तीवर कबजा प्रस्थापित करणे हा इंग्रजांच्या वननीतीचा एकमेव उद्देश होता. इंग्रजांचे राज्य येण्यापूर्वी ही वनसंपत्ती बहुतांशी स्थानिक ग्रामस्थांच्या हाती होती आणि काही प्रमाणात राज्यकर्त्यांनी ती जोपासलीही होती. ह्या पारंपारिक व्यवस्थेत ती वनसंपत्ती मुबलक टिकून होती. किती होती याचा आपल्याला आज कल्पनाच करवत नाही. राजस्थानातल्या मरुभूमीवरही त्या वेळी भरपूर वृक्षराजी होती.

ही वनसंपत्ती भारतीयांच्या हातून बळकावताना तेथील जनतेच्या परंपरा वेडगळपणाच्या, अवैज्ञानिक होत्या व राज्यकर्ते बेजबाबदार होते, असे प्रतिपादन करणे साहजिकच आले आणि ब्रिटिशांनी ते मनापासून केलेही.

इंग्रजांनी लिहिलेल्या वनेतिहासात १८४० साली मलबारात नीलांबूरला सागवानाची लागवड करून कॉन्तेलीसाहेबाने भारतात वनरोपणाची सुरुवात केली असा

उल्लेख जिकडे तिकडे केला जातो; पण याच्या किती तरी पूर्वी १६८० साली कान्होजी आंग्रे याने स्वतःच्या आरमारासाठी रत्नागिरी जिल्ह्यात सागवानाची लागवड केली होती. आंग्रे ह्या सागवानाच्या जंगलांचे संरक्षण करत होते व इंग्रजांचे राज्य येईपर्यंत मराठ्यांच्या नौका बांधायला वापरूनही त्यांनी लावलेली सागवानाची जंगले चांगली राखून ठेवली होती. हे सर्व वर्णन १८८० सालच्या रत्नागिरी जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्ये उपलब्ध आहे. तरीही ब्रिटिश वनाधिकाऱ्यांनी लिहिलेल्या ब्रिटिशपूर्व कालाच्या वनेतिहासात हे संदर्भ पुसून टाकलेले आहेत.

एवंच इंग्रजांनी वनसमृद्ध भारतावर सत्ता स्थापून तेथल्या अरण्यांचा स्वतःची तुंबडी भरण्यासाठी यथेच्छ उपभोग घेतला याचे समर्थन करताना ब्रिटिशपूर्व कालात जनता व राजे हे अवैज्ञानिक पद्धतीने जंगलांचा नाश करीत होते आणि ब्रिटिशांनीच विज्ञानाधिष्ठित वनव्यवस्था भारतात आणली अशीही समजूत प्रसृत केली.

## वनविज्ञान

वनविज्ञान हे केवळ मूलभूत नव्हे तर उपयोजित विज्ञान आहे अरण्याचा अशा रीतीने वापर केल्यास, त्यातून असे लाभ होतील हे दाखवून देणे हा या उपयोजित विज्ञानाचा उद्देश आहे. उदाहरणार्थ, 'दर चाळीस वर्षांनी एखादे अरण्य पूर्ण कापले, तर येणाऱ्या फुटीपासून आणखी चाळीस वर्षांत यातून काही हजार घनफूट लाकूड उपलब्ध होईल. ते जर दर वीस वर्षांनी पूर्ण कापले, तर येणाऱ्या फुटीपासून खूप कमी लाकूड मिळेल किंवा दर साठ वर्षांनी कापले तरीही प्रतिवर्षी कमी लाकूड उपलब्ध होईल' असे शास्त्रोक्त विधान असू शकेल. यावरून हे अरण्य दर चाळीस वर्षांनी कापावे असा निष्कर्ष निघू शकेल.

प्रत्यक्ष सयुक्तिक माहितीवरून असे निष्कर्ष काढून धरलेली उद्दिष्टे पुरी करण्यास कशी वनव्यवस्था हाती घ्यायची हे ठरवणे हे विज्ञानाधिष्ठित वनव्यवस्थेचे स्वरूप आहे. हे साधण्यासाठी अरण्य या जीवसमूहात काय क्रिया-प्रक्रिया चालतात याविषयी काही कमीत-कमी माहितीची जरूर आहे. अरण्यात वाढत असलेली झाडे किती आहेत, झाडांची वाढ काय वेगाने होते, झाडे कापल्यावर जमीन उघडी झाल्यावर तेथे नवी रोपे किती प्रमाणात उगवतात, लाकडाच्या रूपाने अरण्यातील खनिजे बाहेर नेल्यास त्यांची भरपाई कशी होते अशा प्रकारची पद्धतशीर माहिती गोळा केल्यावरच खरोखरीचे विज्ञानाधिष्ठित व्यवस्थापन करता येईल.

आपल्या देशाच्या निसर्गसंपत्तीच्या व्यवस्थापनाचा पाया तावून-सुलाखून पाहणे हे सर्व सुशिक्षित नागरिकांचे कर्तव्य आहे. विशेषतः मराठी विज्ञानपरिषदेसारख्या संस्था यात अधिकाधिक पडल्या पाहिजेत. केरळातील शास्त्र साहित्यपरिषदेने कुट्टनाड बांध, मावूर रेयॉन कारखान्याचे प्रदूषण, सायलेंट व्हॅली बांध, असे अनेक प्रश्न हाती घेऊन, त्यावर चांगला अभ्यास करून मोठे परिणामकारक भरीव कार्य करून दाखवले आहे; परंतु आजची लोकविन्मुख सरकारी यंत्रणा असे काहीही काम करायचा प्रयत्न केल्यास त्यात पदोपदी अडथळे निर्माण करते. यातील सर्वांत मोठा अडथळा म्हणजे सर्व प्रकारची माहिती नाकारणे. कारण काय तर ही माहिती 'अधिकृत गुपिते' असतात. आपल्यासारख्या लोकशाही देशात लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांबाबतच्या सरकारी योजना या अधिकृत गुपिते असणे ही कल्पनाच असह्य आहे; परंतु ही वस्तुस्थिती आहे. आपला समाज विज्ञानाभिमुख बनवायचा असेल तर प्रथम ही अन्याय्य परंपरा तोडली पाहिजे. मराठी विज्ञानपरिषदेसारख्या संस्थांनी याबाबत आवाज उठवला पाहिजे.

## लोकाभिमुख विज्ञान

विज्ञान आणि त्यावर आधारलेले तंत्रज्ञान ह्या आजच्या जगातील प्रचंड सामाजिक, वैचारिक, आर्थिक शक्ती आहेत. प्रत्येक निरीक्षण, प्रत्येक विधान, प्रत्येक प्रमेय कसोशीने प्रत्यक्ष प्रमाणावर तावून-सुलाखून पाहिल्यास मानवी ज्ञानाची वाढ काय अफाट वेगाने होऊ शकते, हे विज्ञानाने दाखवून दिले आहे. साहजिक जग या शक्तींची उपासना करू लागले आहे.

परंतु कोणत्याही शक्तीची उपासना आंधळेपणे करू नये. विज्ञान आणि तंत्रज्ञान या शक्ती लोकाभिमुख झाल्यास समाजाला तारक होतील आणि लोकविन्मुख झाल्यास मारक होतील. आज मोठ्या प्रमाणात यांचा दुरुपयोग होत आहे. ह्या प्रवृत्ती बदलून विज्ञान आणि

तंत्रज्ञान लोकाभिमुख बनवणे हे आजच्या युगातील महत्त्वाचे कार्य आहे आणि ते कार्य करायला केरळ शास्त्र साहित्य परिषद आणि मराठी विज्ञानपरिषदे-सारख्या संस्था पुढे सरसावल्या आहेत ही फार आनंदाची गोष्ट आहे.

माझ्या स्वतःच्या अभ्यासविषयाच्या संदर्भात या दृष्टीने काय करण्याजोगे आहे, याचा थोडक्यात आढावा घेऊन मी हे भाषण संपवतो.

१) विज्ञानपूर्वकाळातील चालीरीती सरसकट सर्व अंधश्रद्धा आणि म्हणूनच टाकाऊ म्हणून त्यांच्यावर हल्ला चढवणे हे अनुचित आहे. त्यांचा प्रत्यक्ष काय परिणाम होतो हे पाहून मग त्या उचित किंवा अनुचित हे ठरवावे. उदा. वृक्षांना, वनांना पवित्र मानल्यामुळे आज भारताच्या अनेक भागात काही तरी वनराजी टिकून आहे. एरव्ही ती केव्हाच पुरी नष्ट झाली असती !

२) केवळ एक पद्धतशीर सांगाडा निर्माण केला की, निसर्ग–संपत्तीचे व्यवस्थापन वैज्ञानिक बनत नाही. त्याचा खरा पाया तपासून पाहिला पाहिजे. आपल्या वनव्यवस्थेचा असा पाया विज्ञान–चळवळीतील कार्यकर्त्यांनी प्रत्येक वनविभागाची कार्ययोजना हातात घेऊन तावून–सुलाखून पाहिला पाहिजे. त्यासाठी सर्व माहिती दिली गेली पाहिजे, असा हट्ट धरला पाहिजे.

३) आधुनिक तंत्रज्ञानावर अवलंबून असलेले उद्योग हे प्रगत, उलट पारंपारिक उद्योग हे मागासलेले आणि टाकाऊ ही भ्रामक कल्पना सोडून दिली पाहिजे. कोणता उद्योग, कोणते तंत्रज्ञान उचित हे त्याच्या सर्वांगीण परिणामावरून ठरवले पाहिजे. आज अरण्य-खाते आधुनिक उद्योगांना निष्कारण फुकट माल पुरवून पारंपारिक कुटीरोद्योगांना मारत आहे. उदाहरणार्थ, काही वर्षांपूर्वी कर्नाटक सरकार कागद-गिरणीला बांबू एक रुपया दराने पुरवायचे तर बंगलोरातल्या बुरडांना तोच बांबू दोन–तीन हजार रुपये टनाने विकत घ्यायला लागायचा. अशा साऱ्या गोष्टींचा व्यवस्थित अभ्यास करून त्या पुढे मांडायला पाहिजेत.

४) स्थानिक जनतेला उपयुक्त, लाभदायक अशा वनस्पतींची आज फार कमी माहिती उपलब्ध आहे. त्यांचा अभ्यास करून, त्यांच्या लागवडीचे प्रत्यक्ष प्रयोग करून खूप वैज्ञानिक माहिती गोळा करायला पाहिजे. अशा प्रकारचे वैज्ञानिक संशोधन करायला जास्ती साधने, उपकरणे, पैसे कशाचीच जरुरी नाही. गावा–गावातल्या शाळांतून, महाविद्यालयांतून असे काम सुरू करता येईल आणि लोकाभिमुख विज्ञान-चळवळींना यात मोठा भाग घेता येईल.

# हार्दिक अभिनंदन

यंदा विविध प्रकारे सन्मानित झालेल्या महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या पुढील सल्लागार व सहकाऱ्यांचे ' परिषद ' व ' हाकारा 'तर्फे मनःपूर्वक अभिनंदन !

**श्री. बाबा आमटे :**

कुष्ठरोगक्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च समजला जाणारा डेमियन डटन पुरस्कार.

**श्री. शंकरराव खरात :**

जळगाव येथे नुकत्याच झालेल्या ५८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड.

**श्री. विजय तेंडुलकर :**

मराठी साहित्यातील बहुमोल कामगिरीबद्दल भारत सरकारतर्फे ' पद्मभूषण ' सन्मान.

**डॉ. अनिल अवचट :**

' माणसं ' या पुस्तकास राज्यशासनाचा ललित गद्य-विभागातील पुरस्कार.

**श्री. जगदीश गोडबोले :**

' माणूस ' साप्ताहिकांतील ' चिपको ' लेखमालेस गुरुवर्य रा. न. सबनीस वाङ्मय पुरस्कार १९८३.

**श्री. संजय पवार :**

प्रायोजित कलाविभागात ' राष्ट्रीय एकात्मतेवरील ' चित्रास राज्यपुरस्कार.

# परधानांचा ‘ शिमगा फाग ’ आणि लोकगीते



सौ. शैलजा देवगांवकर

मध्यप्रदेश आणि विदर्भ भागात परधानांची वस्ती मुख्यत्वेकरून आढळून येते. पंतप्रधान (सं.) प्रधान परधान अशी त्यांच्या नावाची उपपत्ति श्री. रसेल आणि हिरालाल ह्यांनी सांगितलेली आहे. पर–पर-क्याचे, धान–तांदूळ खातात ते परधान असे डॉ. मांडव-कर आपल्या ‘ आदिम ’ पुस्तकात म्हणतात. परंपरागत-रित्या बघता परधान हे गोंडांचे पुरोहित किंवा भाट होत. ते वंशावली ठेवण्याचे काम करीत असत. परधान स्त्रिया सुईणीचे काम करीत– असे भा. संस्कृतिकोश-कार म्हणतात. परधान म्हणजे सांस्कृतिकरणाच्या प्रक्रियेत स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवणारी आदिवासी जमात आहे. ते आपल्या ‘बना’ किंवा ‘किंगरी’ नामक वाद्यावर जीवापाड प्रेम करतात. पूर्वजांच्या व शूरांच्या गाथा गाणारी, धार्मिक कथागीते गाणारी ही भाटमंडळी होत.

परधान दिवाळी, दसरा, संक्रांतीसारखे विविध सण साजरे करतात. त्यावरून त्यांच्यावर हिंदुसंस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसतो. मात्र ‘ शिमगा फाग ’ हा त्यांचा प्रमुख सण आहे. परधान हा सण अत्यंत धुमधडाक्याने साजरा करतात. ह्या सणासाठी वर्गणी गोळा करतात. लाकडं आणतात. मिठाई, फळे, कंदमुळे एकत्र करतात. दारू, तंबाखूदेखील आणली जाते. वाद्यांची दुरुस्ती होते नृत्याची तालीम होते. कधीकधी नवी काव्य-रचनासुद्धा केली जाते.

हा सण ‘ सुंदी भुरांग ’च्या सात मुली व एक मुलगा यांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. ‘ नोंदयाल मानको ’ देवीचा नवस पूर्ण झाला नाही तेव्हा देवीचा कोप गावावर झाला. तळचाला पाणी लागेना. देवीने एकुलत्या एक मुलाचा बळी मागितला. सुंदी भुरांगच्या मुलाच्या चितेची राख टाकताच तळे भरले. त्या दिवसा-पासून हा सण साजरा करतात. अशी परंपरागत लोक-कथा आजही परधान सांगतात. अंगण स्वच्छ करून देवींची स्थापना करतात. पुजारी पूजा करतो. मग होळी पेटवितात. त्यानंतर जेवण, दारू, मौजमजा व रात्रभर नाचगाणे चालते. दुसऱ्या दिवशी घरोघर जाऊन रंग लावतात.

## उन्मुक्त आनंद

धरतीची लेकुरे असलेले हे परधान निसर्गाच्या प्रांगणात लहानाचे मोठे होतात. त्यांचे जीवन, त्यांच्या सामाजिक परंपरा आणि त्यांची संस्कृती आजही निसर्ग-सान्निध्यामुळे आपले शुद्ध स्वरूप टिकवून आहे. त्यांची जोश व उल्हासाने भारलेली लोकगीते, संगीतमय झालेली लोकनृत्ये म्हणूनच मनाला मोहवितात. त्यांच्यात भावनांचे प्रदूषण झालेले नसल्याने उन्मुक्त आनंदाचा लाभ त्यांना होऊ शकतो. त्याचेच दर्शन शिमगा फागच्या लोकगीतात आपल्याला होते. परधान गीत–

**येन्दानावे मिंदा हो**
**निलायान्द लानोना बान्दोना फुंदा**
**निलायानो येन्दाले ढोल मालो कितोन**
**ढोलक्याना तलाते येन्दा नावे मिंदा हो–१**

( नाचायला या हो. ढोल दुरुस्त करू या. नाचू या.)

( येन्दलावा–नाचायला, कितोन–करून, ही गोंडी भाषेतील शब्दांची रूपे येथे दिसतात. )

अशा प्रकारे ढोल, जंतूर, किंगरी, रोंगा, बासरी, घुंगरू, ड्रुम इ. इ. वाद्यांची नावे घेत गाणे चालते. त्या वाद्यांची दुरुस्ती तर होतेच; पण चांचणीसुद्धा घेतली जाते. तालीम सुरू झालेली असतेच.

होळी, गिरजालदेवी तसेच लिंगोदेव, बडादेव यांची स्तुतीपर गाणी असतात; पण होळी कुठे करायची ? देवाची स्थापना कुठे करायची ? अशी सर्वांनाच काळजी असते. (परधान आणि गोंडांच्या देवदेवतांचे साधर्म्य येथे लक्षात घेण्यासारखे आहे. )

**कहाँ रचून निवे होली हो गिरिजामाये**
**बेगे रचून निवे होली हो–१**
**बाहरो रचून निवे होली गिरिजामाये**
**मैदान रच्चून निवे होली हो–२**

( गिरिजामाऊली, होळी कुठे रचायची ? बाहेरील मैदानात रचायची. होळी साजरी करायची.

वरील गाण्यात निवा, बेगे असे गोंडी शब्द आहेतच; पण कहाँ, बाहरो, होळीचा होली उच्चार, ह्यात हिंदी भाषेचा प्रभाव दिसून येतो. माय, रचणे ही मराठी भाषेची रूपेही आढळतात.)

जागा तर नक्की ठरली; पण होळीसाठी काय काय आणले आहे बरे...

**होली के वास्ते रे क्या बुलायो**
**होली के वास्ते रे गेदानगा बुलायो—१**
**होली के वास्ते रे क्या क्या बुलायो**
**होली के वास्ते रे दारू बुलायो—२**

( प्रस्तुत गाण्यात गेंडाते–जंगलात–गेदानगा–जंगलातील लाकूड हा गोंडी शब्द सोडल्यास बाकी सर्व हिंदी मराठी शब्द आहेत. वास्ते, बुलायो ही त्याचीच उदाहरणे होत. ) आणलेल्या सर्व वस्तूंची एकामागून एक नावे घेत हे गाणे चालू राहते. मग गायकाच्या हस्ते होळी रचली जाते आणि पूजा सुरू होते.

**आकी पुंगारे रो**
**बेले पतारिता**
**पुंजा निवा आयला–१**
**राले कपूरे रो**
**होमा उजाबत्ती ते**
**पुंजा निवा आयला–२**

( बेलाची पाने, राळ, कापूर, उदबत्ती आणून होम करून आईची पूजा करू या. ह्यातही आकी, निवा गोंडी शब्द सोडल्यास राळ, कापूर, उदबत्ती, होम, पूजा हे मराठी भाषेतील शब्द दिसून येतात.)

पूजा संपल्यानंतर जेवण होते. दारूचे सेवन आवश्यक मानतात. रात्री होळीच्या सभोवती फागाची गाणी गातात. ड्रम वाजविणारा मध्ये बसतो. त्याच्याजवळ टिमकी, पिपाणी वाजविणारे बसतात. मुख्य गायक समोर व इतर गोलाकार फेर धरतात व उदो उदो करणारे प्रेक्षक एकदम पुढे बसतात. फाग–स्तुतीपर गाणे चालू होते. त्यात विविध देवांची नावे घेतात.

**झुला राहे बापा**
**भोवताला देवराया झुला राहे**
**बदकोन्या देवराया चौरंगा डोले**
**फालापेना देवराया चौरंगा डोले**
**भोवताला देवराया झुला राहे–१**

( फेरसापेन देवावर चौरी डोलते आहे. देव एकत्र झाले असून झुलत आहेत. येथे सुद्धा भोवताली, देवराया डोले, झुला हे हिंदी–मराठी शब्द आढळतात. ) अशा प्रकाराने जानको, मानको, भीवसेन, बडादेव इ. देवांची नावे तर घेतातच; पण हनुमान इ. हिंदु देवांची पण नावे गाण्यात गुंफतात.

**करेला विलीना उकाले दोंहाता**
**ताना पारो आईवाताला गामाली बी ताराता**
**जों बापू जों झोंका ऊंगो लता**
**रे रे ना रे पाटा वारी लता–१**

रात्रभर अशा प्रकारची विविध पाटा ( **गाणी** ) चालू असतात. दुसऱ्या दिवशी सकाळी रंग फेकणाऱ्यांची एक छोटी चमूच निघते. हातात रंगाच्या बादल्या आणि नाचत–गात ही मंडळी सर्वप्रथम पुजाऱ्याच्या घरी जातात. नंतर इतरांच्या घरी जातात.

**कौन कौन खेले गुलाभोकी छडिया**
**हनुमान खेले शेंदुडूका पुडीया–१**
**राधा किसनकी जाया होली**
**कौन कौन खेले गुलाभीकी छडिया...२**

ह्यातही विविध देवांची नावे गाण्यात गुंफतात. अगदी मुस्लिम रहेमानसुद्धा अबीर खेळतो. प्रस्तुत गाणे तर पूर्णच हिंदी गाणे आहे. म्हणजे हिंदी–मराठी

भाषेचा प्रभाव आणि सांस्कृतिक देवाण–घेवाण बरीच झालेली आहे असे म्हणावे लागते. असे जरी असले तरी त्यांची फेरसापेन देवावर अढळ श्रद्धा आहे.

**सब देवतासे कौन देव बडा**
**सब देवतासे फेरसापेन देव बडा**
**दूरसेने नातूरोको छोडो बे लाला**
**मथुरा ये नागर सुवानो बे लाला...१**

फेरसापेन देव सर्व देवात श्रेष्ठ आहे असे त्यांना वाटते. त्याला नेत्तूर (रक्त), पिसापिल्ला (कोंबडीचे पिलू), पदीपिल्ला (डुकराचे पिलू) इ. इ. दुरून अर्पण करू व त्याला संतुष्ट ठेवू या.

**मोगल सेनाता गोंडवनाता रो गडचा**
**रानतेनी खुबा लडी माता हीडारानी दुर्गावती...१**

पौराणिक देवदेवतांच्या बरोबरीने ऐतिहासिक वीरगाथा देखील परधान गातात. मोंगल व गोंडांच्या लढाई मर्दानी पोशाख केलेली. गोंडवनाची राणी दुर्गावती शूरपणे लढली असे वर्णन मोठ्या सुबक व नेटक्या शब्दात वरील गाण्यात आढळून येते.

याशिवाय शिमग्याची खास शिवीगाळ करण्याची गीते आढळतात. काठ्या घेऊन गमतीजंमतीने मारणेसुद्धा चालते. एकूण वातावरणातच उल्हास. आनद व उल्हास भरून गेलेला असतो. प्रणय हा तर आदिवासी लोकगीतांचा स्थायीभाव, त्याचे इथेही मिष्किल दर्शन झाल्याशिवाय कसे राहील ?

**झुमना ले, बालकुवारी ताना**
**झुमना ले,**
**सरीयाना ले, बालकुवारी ताना**
**सरीयाना ले.**

प्रिये, तू तर अजून कुमारिकाच आहेस. झुमका व साखळी घे आणि

**लोतुदाहोडिकालीना सथाना**
**डिकाली–मिकाली, पोंडा तुली येन्दलावा हो...**


बाजारात ये साडी घ्यायला. मग सगळे दागिने घालून नाच करायला ये. परधान स्त्रियांना दागिन्यांची व नटण्याची खूप हौस आहे. प्रस्तुत गाण्यात विविध दागिन्यांची नावे घेतली जातात. पुरुषसुद्धा पानांचा, फुलांचा गुच्छ लावून रंगी–बेरंगी पोशाख करून नाचतात आणि स्वतःला राजा समजतात.

**ये गोंडी राजा बना दियो रे...**
**जमुनका तुरी लगा दियो रे, राजा केवडा...१**

नृत्यगीताच्या विश्वात रंगलेल्या उल्हासपूर्ण वातावरणात शिमगा–फाग संपतो; पण नंतर किती तरी दिवस सणाची गाणी परधानांच्या ओठांतून घरंगळतच असतात...


गोंडांपासून ऐतिहासिक व भौगोलिक कारणाने दूर झालेली असली तरी सांस्कृतिक व धार्मिक बंधनांनी गोंड जमातीशी संलग्न असलेली ही जमात, ही जवळीक अशा सणांच्या, देवदेवतांच्या आणि लोकगीतांच्या माध्यमातून प्रगट होते. 'येगोंडी राजा बना दियो रे,' असा उल्लेख मोठ्या आदराने व गौरवाने हा गोंडांचा परधान (प्रधान) आजही लोकगीतातून करतो. प्रचलित लोककथेनुसार परधान हा सहा गोंडभावांचा भाऊ समजण्यात येतो. इतकेच नव्हे तर, धार्मिक व सांस्कृतिक गोंडी परंपरेचे जतन मौखिक परंपरेतून या भाटानेच केलेले आहे. मात्र अ–गोंडी संस्कृतीतील भाषिक, सांकृतिक व धार्मिक प्रभाव त्यांच्यावर प्रकर्षाने पडलेला आढळून येतो. हिंदुसण व देवदेवता, हिंदी व मराठी भाषेचा प्रभाव, इतकेच नव्हे तर, मुस्लिम देवांचाही उल्लेख हा परधानाच्या सांस्कृतिक गतिक्षमतेचा पुरावाच म्हणावा लागेल. □

(प्रस्तुत लेखातील लोकगीते डॉ. एस्. आर. मुरकुटे, केसरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती, ह्यांच्या सौजन्याने प्राप्त झाली आहेत.)



# आश्रमशाळांतील मुलांच्या प्रगतीतील अडसर

देविदास गिरी




आज आदिवासींच्या मुलांचा विकास होण्यासाठी आश्रमशाळेची गरज प्रतिपादन केली जाते. आश्रम शाळेवर आजमितीला कोटयावधी रुपये खर्च होत असतो; पण आदिवासी मुलांची प्रगती होताना दिसत नाही. त्यांची गुणात्मक प्रगती होत नाही. अशी परिस्थिती आज प्रत्यक्ष पाहावयाला मिळते. त्यांची गुणात्मक प्रगती का होत नाही ? याचा खालील लेखामध्ये ऊहापोह अल्पशा अनुभवाने मांडीत आहे.

आश्रमशाळेमध्ये एकदा पालकाने आपल्या पाल्याला घातल्यावर त्याचे काम संपले असेच तो समजत असतो. 'माझं पोरगं शाळतं जातं' एवढाच त्याचा अभिमान असतो. याला कारण पालक नाही, कारण पालक अशिक्षित त्याला शिक्षणाचा गंध नाही अशा परिस्थितीत दिवसभर शेतामध्ये काम केल्यावर किंवा मजुरी केल्यावर तो घरी थकून येत असतो. करमणुकीचे साधन आदिवासी भागामध्ये नाही. त्यामुळे व परंपरागत चालत आलेली त्यांच्यातील परंपरा ही म्हणजे रोज पिणे. आणि हे सर्व अनुकरणाने त्याचा लहानसा मुलगा शिकत असतो. हे सर्व वाईट संस्कार त्याच्यावर घडत असल्याने लहानपणीच कसलीही जाणीव नसताना तो सर्व वाईट कृत्ये, कधी चोरून तर कधी देखत करीत असतो. त्यामुळे त्यांची प्रगती खुंटते व ही लहान मुले कोवळया वयातच वाममार्गाला लागतात.

आश्रमशाळेत जर हा मुलगा आला तर त्याला तेथील सर्वच जीवन अनोखे म्हणजे नवीन असते. त्याला शाळेत दिले जाणारे औपचारिक शिक्षण नको असते. त्याला लहानपणापासूनच निसर्गाची ओढ, स्वच्छंदी बागडणे आणि मन मानेल तसे वागणे. याची सवय झालेली असते. त्यामुळे आश्रमशाळेतील ते सर्व नवीन जीवन त्याला नकोसे वाटते. ते पुस्तके, पाटी, पेन्सील वर्गामध्ये दोन दोन तास बसणे हे सर्वच त्याला कंटाळवाणे व नकोसे वाटत असते. त्याचे कारण म्हणजे त्याला लहानपणापासून आश्रमशाळेत येईपर्यन्त कसलाच गंध नसतो ना पाटी पाहिलेली असते ना पुस्तक पाहिलेले असते. त्यामुळे त्याचे आश्रमशाळेत लक्ष लागत नाही.

आश्रमशाळेत त्याचे दैनंदिन जीवन सुरू होते. आश्रमातील तेथील आपल्याच समाजातील मुले त्यांची वागणूक व इतर चालीरीतींचे त्याच्यावर दाट संस्कार होतात.

## गुणात्मक प्रगती

मानसशास्त्राचा अभ्यास करीत असताना मुलाची गुणात्मक प्रगती तीन गोष्टींवर अवलंबून असते. त्याची मानसिक वाढ, शारीरिक वाढ, बौद्धीक वाढ ह्या तिन्ही गोष्टी परस्पर पूरक आहेत. नेमकी मुलांची मानसिक वाढ होत नाही आणि मुलांची गुणात्मक प्रगती खुंटली जाते.

शिक्षकही काही प्रमाणात या मुलांची गुणात्मक प्रगती रोखण्यास कारणीभूत ठरतो. शिक्षकाला समाजाच मान राहिला नाही. त्यामुळे तो भरकटत जातो, तसेच त्याच्या मनाविरुद्ध त्याला आदिवासी भागात टाकलेले असते, अशा एक ना अनेक कारणांमुळे तो तेथे रमत नाही. आश्रमशाळेत आपले लक्ष्य केन्द्रित करू शकत नाही. कधी येथून जाईन असे त्याला होत असते. या मन:स्थितीमध्ये असताना त्याला दारूचे

व्यसन जडते. तो आश्रमातील मुलालाच मोहाची, पहिल्या धारेची बाटली आणावयाला पाठवितो. शिक्षणाधिकाऱ्याकडे अनेक अर्ज विनंत्या करीत असतो. याला भेट त्याला भेट यातच त्याचे दिवस जात असतात. त्यामुळे त्याचे परिणाम काही अंशी मुलांना भोगावे लागतात. अशी अनेक कारणे आश्रमशाळेतील मुलांची गुणात्मक पातळी रोखण्यास कारणीभूत होतात.

आदिवासी भागामधील मुलांचे शैक्षणिक अनुभव कमी असतात. त्याने आगगाडीसुद्धा कधी पाहिलेली नसते.त्यांना पुस्तकातले शैक्षणिक अनुभव समजावून देत असताना शिक्षक कमी पडतो. का कमी पडतो याला मुख्य कारण म्हणजे शैक्षणिक साधनांचा अपुरेपणा नुसते ऐकण्यापेक्षा प्रत्यक्ष पाहिल्याने प्रसंग मनावर अधिक ठसत असतो. नेमके याच्या उलट आश्रमशाळेत घडत असते. आश्रमशाळेत शैक्षणिक साधने काहीच नसतात. नकाशे, तक्ते, चित्रे याचा मोठ्या प्रमाणात अभाव असतो. त्यामुळे शिक्षण अर्धवटच होत असते. व ह्या सर्व कारणामुळे त्याची गुणात्मक प्रगती रोखली जाते.

# इंद्रावती मोहिमेचे मोहक वर्णन




'ग्रंथाली'ने जगदीश गोडबोले यांचे 'मोहीम इंद्रावतीची' हे पुस्तक प्रकाशित करून आदिवासी जीवनावरील प्रत्यक्ष अनुभवावर आधारित मराठी साहित्यामध्ये मोलाची भर घातलेली आहे. लष्करच्या भाकऱ्या भाजण्याची आवड व जिद्दीमधून झालेले हे लिखाण अथपासून इतिपर्यंत चुलीवरच्या भाकरी सारखेच खमंग व खुसखुशीत झालेले आहे. थोरा–मोठ्यांचे 'आशीर्वाद' 'दोन शब्द' 'पुरस्कार' असल्या भानगडीत न पडता लेखकाने वाचकांशी साधलेला थेट संवाद त्यांची दाद घेऊन जाईल.

काम करण्याच्या भावनेने भारावलेली, साहसाच्या वेडाने पेटलेली माणसे आणि रंगलेली तशीच भंगलेली आदिवासी दुनिया यांची प्रत्यक्ष जानपछान करून देऊन त्यांना अस्वस्थ करून प्रत्यक्ष कृतीसाठी उद्युक्त करावे म्हणून; महाराष्ट्र, ओरिसा व मध्यप्रदेशाच्या आदिवासी भागातून वाहणाऱ्या इंद्रावतीनदीवर १९७७च्या जानेवारी–फेब्रुवारीमध्ये काढलेल्या मोहिमेचे रंगतदार वर्णन यात आहे. इंद्रावतीच्या मार्गातील निर्मनुष्य जंगली भागापेक्षा इंद्रावतीतिरी व आसमंतात बहरलेल्या माणसाचा शोध घेण्याचा प्रयत्न या मोहिमेत केला गेला. उपेक्षित आदिवासी भागाकडे, माणसाकडे जास्तीत जास्त लोकांचे लक्ष वेधून घेणे व काही साहसी जाणकार व सामाजिक दृष्टी असलेल्यांना आदिवासी जीवनाचे अगदी जवळून दर्शन घडवून आदिवासींचे प्रश्न सोडविण्याकडे लोकांना प्रवृत्त करणे हा या मोहिमेचा उद्देश होता.

मोहिमेची सुरुवात झाली इंद्रावतीच्या उगमापासून. ओरिसाच्या पूर्वकिनाऱ्यावरील तोहमल–रामपूर हे इंद्रावतीचे उगमस्थान. पहिल्यांदा पश्चिम मग उत्तर आणि भामरागडला एकदम मुरकी घेऊन दक्षिणेकडे ओरिसा–महाराष्ट्र–आंध्रप्रदेश असा प्रवास करून इंद्रावती गोदावरीला मिळते. इंद्रावतीचे लेखकाने केलेले वर्णन कलात्मक व मनोहरी आहे. इंद्रावतीचा सर्व प्रवास आदिवासी मुलुखातूनच. भत्रा, डोरला, कीया' परधान, परजा, माडिया, मुरिया या रंगलेल्या तितक्याच भंगलेल्या जमातींकडे लक्ष वेधून लेखक वाचकाला

अंतर्मुख करतो. खेड्यापाड्यांतील जनता साध्यासुध्या रोगांनी मरत असताना अंगठ्यापासून करंगळीपर्यंत नुसत्या हाताचेच डझनावारी स्पेशॅलिस्ट शहरातून जन्मू लागले; पण डॉक्टरांच्याच नावाने आपण दिवसरात्र बोटे मोडीत असतो. जिच्या पैशावर शिक्षणाचे दिवे पाजळवत असतो, त्या जनतेचे अश्रू पुसायचे दूरच राहू द्या, निदान दुःख जाणून घेण्याचा आपल्यापैकी किती जणांनी प्रयत्न केला? अडी-अडचणींना हात घातला? उन्हा–तान्हात, कट्याकुट्यांतून अनवाणी भटकणाऱ्या गरीब जनतेच्या पायताणांची सोय आधी करून देण्याऐवजी 'जनता–मोटारी'ची आपल्याला काळजी अधिक होती. अद्ययावत विमाने बनविणाऱ्या वैज्ञानिक भारतात, बैलगाडीवर संशोधन होण्यास पाव शतक लोटावे लागले. विमानांनी ध्वनिमंडल तोडले, तरी बैलगाडी शतकानुशतकाच्या चाकोरीतून रडतखडत चालावी!' यातून आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या प्रगतीचा अपुरेपणा लेखकाने प्रभावीपणे दाखवून दिलेला आहे. तसंच समाजातील प्रश्नांविषयीच्या सुशिक्षितांच्या उदासीनतेवर नेमकं बोट ठेवलेलं आहे.

## बोलकी प्रतिक्रिया

आदिवासी म्हणजे कोण? तसेच आदिवासीविषयक दृष्टिकोनासंबंधी विद्वानांची मते याचे थोडक्यात विवेचन करून, ब्रिटिशांच्या आदिवासीविषयक धोरणाचा आढावा घेऊन 'पण एकूण आदिवासींचे साधे–सुंदर जग पार उध्वस्त झाले आणि आपल्या तथाकथित संस्कृतीचे मुख्यत्वे काटेच त्यांच्या नशिबी आले,' ही लेखकाने केलेली टीका मार्मिक आहे. समाज कल्याण खात्यातील एका अनुभवी अधिकाऱ्याने आदिवासींना स्वस्त दरात पुरवायच्या साठ वस्तूंची भली मोठी यादी तयार केली. स्वतःवर खूष होऊन त्याने ती एका आदीवासीला दाखवली. तो एवढेच म्हणाला– 'साहेब, कशाला गरिबासाठी एवढे कष्ट घेता. फक्त पीठ आणि मीठ द्या. मात्र खरोखरच आणि वेळच्यावेळी द्या!' त्याची ही बोलकी प्रतिक्रिया आदिवासी कल्याणाच्या सरकारी योजनांविषयी बरंच काही सांगून जाते. आदिवासींमधील विवाहविषयक प्रथा, मंत्रतंत्र, जादूटोणा, धार्मिक समजुती यांचे वर्णन वाचनीय आहे.

आदिवासी विकासाची दिशा आणि समस्या सामाजिक संस्था, सरकारी यंत्रणेच्या भूमिका यांविषयीचे विवेचन वाचकांचे प्रबोधन करणारे आहे. 'आदिवासींचा विश्वास संपादन करण्यासाठी केवळ त्यांच्या 'करिता' नाही, तर त्यांच्या 'बरोबर' राहून आज निःस्वार्थीपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फार मोठी गरज आहे' हे लेखकाचे विधान आदिवासींमध्ये काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना प्रयत्नांची योग्य दिशा दाखविणारे आहे.

## शोकांतिका

बस्तरचा राजा प्रवीणचंद्र भंजदेव यांच्या उदाहरणावरून आदिवासी नेतृत्वाच्या शोकांतिकेचे दर्शन घडते. 'विकासाच्या प्रक्रियेमध्ये एक अटळ संघर्ष आहे. संघर्ष दोन कारणांमुळे उद्भवतो. एक तर होऊ घातलेला बदल

# स्वागत व अभिनंदन!

श्री. राजाभाऊ राजगडकर यांच्या संपादनाखाली 'आदिवासी भारत' या नवीन त्रैमासिकाचा पहिला अंक (डिसेंबर ८३ फेब्रुवारी १९८४) वणी (जि. यवतमाळ) येथून नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या अंकातील संपादकीय तसेच 'आदिवासी कसे झाले?' हा प्र. रा. देशमुख यांचा लेख व 'आदिवासी साहित्य व संस्कृतीचे भवितव्य' प्रा. भिलवडीकर यांचा लेख हे सर्वत्र लिखाण वाचनीय आणि आदिवासींना नवा आत्मविश्वास देणारे आहे. वाहरु सोनवणे, लक्ष्मीकांत घुमे व उषाकिरण आयाम यांच्या कविता भुजंग मेश्राम यांची कथा हे सर्वच साहित्य आदिवासी साहित्याच्या उज्ज्वल भवितव्याची झलक दाखविणारे आहे.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व 'हाकारा' 'आदिवासी भारत'चे मनःपूर्वक स्वागत व अभिनंदन करीत आहे. या स्तुत्य उपक्रमात परिषद व 'हाकारा' जरूर सहकार्य करील. 'हाकारा' व 'आदिवासी भारत' यांच्यातील परस्पर सहकार्य आदिवासींची अस्मिता व आत्मविश्वास जागृत होण्यास निश्चितच सहाय्यभूत होईल असा विश्वास वाटतो.

आपल्या लोकांना हानीकारक आहे अशी स्थानिक नेतृत्वाची प्रामाणिक समजुत होऊन त्यातून संघर्ष उद्भवतो किंवा स्थानिक जनतेला अंधारात ठेवण्यातच नेतृत्वाचे हितसंबंध गुंतले असल्यामुळे बदल, मग तो कितीही चांगला असो स्थानिक नेतृत्वाला नको असतो. बहुधा असा अनुभव येतो की, पहिले कारण पुढे करून खरे कारण गुलदस्तात ठेवले जाते. मग अशा योग्य नेतृत्वाच्या अभावी स्थानिक जनतेपुढे दोनच पर्याय उरतात. एक तर परिस्थितीविरुद्ध बंड करून तरी उठायचे. नाही, तर नतमस्तक तरी व्हायचे.' –हे विवेचन आदिवासीविषयक राजकारणाचे वास्तव स्वरूप उलगडून दाखविणारे आहे.

आठवडी बाजार ही बस्तरची खास चीज, तर 'तेरपीतना' म्हणजे मुर्गा लढाई ही या बाजाराची खास चीज. या दोन्ही खास चिजांचे लेखकाने केलेले रंगतदार वर्णन ही देखील एक खास चीज आहे. आदिवासी भागातील सेवा सहकारी सोसायटयांचे व्यवस्थापन करताना सरधोपट नियम लावून चालणार नाही. 'थ्रू प्रॉपर चॅनल' आणि 'गिव्हिंग ड्यू कन्सिडरेशन' या वाक्याने बाजारात उतरले की दिवाळे वाजणारच! अशी मार्मिक टीका लेखकाने केली आहे.

आदिवासी व इतर मागास विभागात मोठे उद्योगधंदे सुरू करताना स्थानिक जनतेचा जास्तीतजास्त फायदा होण्याच्या दृष्टीने उपलब्ध मनुष्यशक्ती, तिच्या विकासाची अवस्था व विकास ग्रहण करण्याची क्षमता, स्थलांतरितांचे प्रमाण व त्यातून उद्भवणारे आर्थिक व सामाजिक तणाव आदी गोष्टींचा विचार करून दीर्घकालीन कार्यक्रम आखला पाहिजे ही सूचना फारच महत्त्वाची आहे.

अखेरच्या भागात महाराष्ट्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी आदिवासी उपाययोजनेसंबंधी माहिती देऊन प्रबळ राजकीय इच्छाशक्ती व कार्यक्षम कारभारयंत्रणा यांच्या बळावर आदिवासींच्या जीवनातली काळरात्र संपावी असा आशावाद लेखकाने व्यक्त केला आहे.

कमल शेडगे यांचे देखणे मुखपृष्ठ व नागेश हाटकर, पापा पाटील यांची सुरेख रेखाचित्रे शैलीदार लिखाणाचे सौंदर्य खुलवणारी आहेत. आदिवासी जीवन–संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या छायाचित्रांचा समावेश करण्यात आला असता तर वाचनातली रंगत निश्चितच आणखी वाढली असती.

— सुधीर जोग

**' मोहीम इंद्रावतीची**
**जगदीश गोडबोले**
**ग्रंथाली प्रकाशन, ऑगस्ट १९८३**
**पृष्ठे–९२, मूल्य १० रुपये**





# महाराष्ट्रातील आदिवासींवर दृष्टिक्षेप

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने प्रकाशित केलेल्या 'द ट्राइब्ज ऑफ महाराष्ट्र' या संपादित इंग्रजी पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील विविध आदिवासी जमातींच्या जीवन व संस्कृतीवर प्रकाश टाकणारी टिपणे एकत्रित करण्यात आली आहेत

महाराष्ट्रात ४७ आदिवासी जमातींचे वास्तव्य असून १९७१ च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या एकूण २९.५४ लाख तर १९८१ च्या जनगणनेनुसार ५७.७२ लाख एवढी आहे. राज्याच्या १३ जिल्ह्यांमध्ये आदिवासींची वस्ती असून प्रामुख्याने चंद्रपूर, ठाणे, नासिक, धुळे व यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. भिल्ल, महादेवकोळी, गोंड, वारली, कोकणा, कातकरी, कोरकू, कोलाम, गामित, ठाकूर, पारधी, अंध, मल्हारकोळी, परधान, धनका या महाराष्ट्रातील प्रमुख जमाती आहेत.


या पुस्तकामध्ये १७ प्रमुख व ३० इतर अनुसूचित जमातींवरील प्रामुख्याने वर्णनात्मक टिपणांचा समावेश आहे. प्रत्येक जमातीची १९७१ च्या जनगणनेनुसार एकूण व जिल्हावार लोकसंख्या नमूद करण्यात आली असली तरी त्या त्या जमातीचे राज्यातील व जिल्ह्यातील एकूण व आदिवासी लोकसंख्येशी शेकडा प्रमाण देण्यात आलेले नाही. आदिवासी जमातींची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक–आर्थिक परिस्थिती, वांशिक व शारीरिक वैशिष्ट्ये, पोषाखपद्धती, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक प्रथा व चालीरीती, जन्म, मृत्यू, संस्कार व पूर्वजपूजा, विवाहपद्धती यावर या टिपणांतून प्रकाश टाकण्यात आलेला आहे. प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे ही टिपणे अर्थातच परिपूर्ण नाहीत, तरीही आदिवासींच्या जीवन व संस्कृतीविषयीचे वाचकांचे कुतूहल पूर्ण करणारी आहेत. विविध छायाचित्रांमुळे पुस्तकाच्या आशयसौंदर्यात भर पडली आहे. श्री. कडू यांचे आदिवासी स्त्रीवरील मुखपृष्ठ देखणे व वैशिष्ट्यपूर्ण आहे. १९७१ च्या जनगणनेच्या आधारे आदिवासी जमातींसंबंधी विविध आकडेवारी देणारे तक्ते पुस्तकाच्या अखेरच्या भागात दिले आहेत.

आदिवासी कल्याण व विकासकार्याशी संबंधित शासकीय खात्यांचे अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते याचबरोबर मानवशास्त्र व समाजशास्त्राच्या अभ्यासकांनाही हे पुस्तक उपयुक्त ठरेल. आदिवासी भागात रचनात्मक व संघर्षात्मक कार्याद्वारे नवसमाजनिर्मितीसाठी प्रयत्नशील असणाऱ्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचण्यासाठी या पुस्तकाचे सुबोध मराठीत रूपांतर उपलब्ध होणे आवश्यक आहे.

मानवाचा परिपूर्ण अभ्यास करणारे शास्त्र असा मानवशास्त्राचा लौकिक आहे. आदिवासी समाजाचा सर्वांगीण अभ्यास हे सामाजिक मानवशास्त्राचे वैशिष्ट्य आहे. आदिवासी समाजाच्या अभ्यासासाठी शास्त्रीय पद्धती सामाजिक मानवशास्त्राने विकसित केलेली आहे. या दृष्टीने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि पुणे विद्यापीठाचा मानवशास्त्रविभाग व महाराष्ट्र मानवविज्ञानपरिषद यांनी सहकार्याने काम केल्यास महाराष्ट्रातील विविध आदिवासी जमातींवर शास्त्रीय व वस्तुनिष्ठ प्रकाश पडू शकेल. आदिवासी विकास–कार्यक्रमांच्या नियोजनातील अचूकता वाढवण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या सहकार्याची फार निकड आहे संबंधितांनी याचा जरूर विचार करावा.

—सुधीर जोग

**'द ट्राइब्ज ऑफ महाराष्ट्र'**
**संपादन : डॉ. गोविंद गारे व श्री. एम. बी. आफळे**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षणसंस्था**
**महाराष्ट्र राज्य – २८, क्वीन्स गार्डन**
**पुणे ४११००१. १९८२**
**पृष्ठे १०४. मूल्य रु. १७.५०**



# धरतीची लेकरं

रानकुसांच्या आसऱ्यानं
पोटासाठी भक्ष्य शोधणारी
आम्ही धरतीची लेकरं–
हाकच दिली नाही कधी आम्हाला
गावकुसाच्या आतील निष्ठूर सावल्यांनी
विझवित गेलो आपला आक्रोश
आपणच आपल्या शब्दांनी–
तेव्हा पावसाळी वाऱ्यांना
ठाऊकच नव्हता आमचा दुर्गम मुलूख–
आक्रस्ताळी वेदनांच्या कळांनी–
शब्दच तेव्हा कसे अबोल झाले होते
पण जळता जळता आयुष्याला मात्र
विद्रोहाचे एक क्षितिज गवसले होते–

–विनायक तुमराम

# हुंडा

चाल : ( स्वतंत्र )

उधळला सागर जगी, चढला हा माज ।
राधाबाई स्त्रीशक्ती, उठवा आवाज ।। ध्रु ।।
कणा–कणा जागविणे खेडी–शहरात ।
स्त्रीशक्ती एकता या, काळाचीच ज्योत ।।
युवा–युवतीवर आहे, भवितव्य आज ।। १ ।।
तांडा वाढलेला पाहून, 'आ' वासुनी शिकारी ।
हुंड्याच्या बाजारी जणू, बनले भिकारी ।।
भिकारड्या–शहाण्याला, द्यावा का दहेज ? ।। २ ।।
लाभताच कन्यारत्न, खंतावतो पिता ।
भावी तीच ठरते अंती, विश्वाची माता ।।
जाण ती कशी नाही, तुम्हा महाराज ।। ३ ।।
हुंड्यापायी छळाछळी, होते बेसुमार ।
बळी जाती बळी घेती, कैक सान–थोर ।।
फोफावणारी प्रथा ही, बंद करा आज ।।
माधुकरीने भरती वेडे, सरभरुनी मूठ ।
बनुनी लाचार करती, सासऱ्याची लूट ।।
अत्याचारा आला जगती, महापूर आज ।। ५ ।।

–बाबा खैरकर
बांद्रा, मुंबई



## संवाद

प्रति,
संपादक "हाकारा"
महाशय,

आपल्या जुलै / सप्टेंबर १९८३ च्या अंकातील 'धुळे जिल्ह्यातील जंगले' वस्तुस्थिती आणि आदिवासी' हा लेख वाचला. सदर लेख बऱ्याच अंशी चुकीच्या माहितीवर आधारलेला असून त्यामुळे वाचकांची मोठ्या प्रमाणावर गैरसमजूत होते. याबाबतचे माझे मत मी थोडक्यात आपले माहितीसाठी कळवीत आहे.

पूर्वी ॲग्रसिल्व्ही प्लॉट, फायर लाईन इत्यादींबाबत दुरुपयोग, भ्रष्टाचार, चुकीचे रेकॉर्ड वगैरेबाबत घडलेल्या तथाकथित घटनांसंबंधी लेखात जे काही म्हटले आहे त्याचा उहापोह सध्या करून फायदा होणार नसल्याने त्याबाबत तूर्त काहीही म्हणणे अप्रस्तुत आहे.

सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेबाबत मला काही वैयक्तिक माहिती असल्याने ह्याबाबत मी प्रामुख्याने मतप्रदर्शन करणार आहे.

१) वनजमिनीवरील अतिक्रमणे नियमन करण्याकरिता शासनाने घालून दिलेली कार्यपद्धती विचारात घेता दिरंगाई होणे अपरिहार्य ठरले. तथापि वनविभागाच्या लेखाप्रमाणे नियमनपात्र आदिवासींना त्यांच्या नियमनपात्र क्षेत्रावरील वहिवाटीबाबत त्रास होणार नाही याची काळजी घेतली गेली. तथापि, अशा नियमनपात्र अतिक्रमणाच्या आडोशाखाली अतिक्रमणे वाढविण्याचे केले गेलेले अवैध प्रयत्न हाणून पाडणे वनकर्मचाऱ्यांना क्रमप्राप्त झाले. त्याबाबत नियमानुसारच कारवाई केली गेली. नियमानुसार कारवाई न केलेली विविक्षित प्रकरणे याचिकेच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल केली नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मोघम असे अत्यंत भडक आरोप वनकर्मचाऱ्यांच्या विरुद्ध या याचिकेत केले गेलेले आहेत व त्याची समर्पक उत्तरे न्यायालयासमोर पुराव्यासहीत दाखल केलेली आहेत. तरीही ह्या सर्व तपशिलाचा विचार न करता अशा तऱ्हेचे मोघम आरोप शक्य त्या माध्यमाद्वारे प्रसिद्ध करून जनतेची दिशाभूल करणे व त्याद्वारे राजकीय भांडवल करणे हे बऱ्याचशा व्यक्ती करीत असतात. त्यासारखाच प्रयत्न प्रस्तुत लेखकाने केलेला आहे.

आदिवासींना न्याय द्यावयाचा म्हणून सुचविलेल्या तोडग्याबाबत येथे काही म्हणणे आवश्यक आहे.

अ) जमिनीचे कृषितज्ञाद्वारे सर्वेक्षण करून सदर जमीन १९७२–७८ च्या दरम्यान शेतीखाली आणली गेली किंवा नाही हे ठरविता येत नाही असे सर्वोच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या दुसऱ्या एका याचिकेच्या संदर्भात सादर केलेल्या दोन अहवालांवरून स्पष्ट दिसून येईल. ह्या अहवालातील विसंगती पाहता सदरचा प्रयत्न हा हास्यास्पद आहे हे दिसून येईल.

ब) आजूबाजूचे शेतकऱ्यांच्या व गावप्रमुखांच्या साक्षीवरून अतिक्रमणाचा काल ठरविल्यास बरेचसे धडधडीत खोटे दावे ( Claims ) सादर झाल्याने वस्तुनिष्ठ नियमन होत नाही हे चौकशीत स्पष्ट झालेले आहे.

क) वनविभागाचे सर्व लेख्यांवर खोटेपणाबाबत टीका करणे अत्यंत सोपे आहे. तथापि, याबाबतचा न्याय मिळविण्याचा सोपा मार्ग म्हणजे असा खोटेपणा उपरोक्त याचिकेच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे नजरेस आणून देणे; परंतु सदर लेखक असे का करीत नाहीत याचे कारण सहज लक्षात येऊ शकेल.

सर्वोच्च न्यायालयाने सदर याचिकेच्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या आदेशाची वनविभागाने काटेकोर-

पणे अंमलबजावणी केलेली आहे व वनसंरक्षणाचे कठोर कर्तव्य नियमानुसार पार पाडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. त्यात कुठलीही बेकायदेशीर घटना घडली असल्यास सदर लेखक अशा घटना ताबडतोब याचिकेच्या सदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या नजरेस आणू शकले असते; परंतु तसे झाले नाही यातच सर्व काही आले.

सदर बाबतीत शक्य असल्यास आपलेपैकी कोणा-चीही चर्चा करून जरूर ती माहिती पुरवण्याची तसेच जेथे काही कोठे चुकले असेल ते दुरुस्त करावयास माझी तयारी आहे. तथापि, अनेकदा व अनेक व्यक्तींना असे सांगूनही त्या दृष्टीने काहीच होत नाही; परंतु सवंग व चुकीचे भडक आरोप वनविभाग वनकर्मचाऱ्यां विरुद्ध प्रसिद्ध केले जातात ह्याचे वाईट वाटते.

आपला

**य. ग. जाधव**

मुख्य वनसंरक्षक (विशेष), म. रा. पुणे–१

पुणे येथे दि. १ आणि २ ऑक्टोबर रोजी प्रा. गं. बा. सरदारांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या शुभ पर्वा-वर महाराष्ट्रातील आदिवासी साहित्यिकांना एकत्र बोलावून जी जवळीक साधली यास्तव आपले आभार मानतो. आदिवासी साहित्यिकांच्या कोणत्याही सोयी सवलतीमध्ये आपण उणीव जाणून न देता त्यांचा आदर राखून उपरोक्त २ दिवसांचे सम्मेलन यशस्वी पार पाडलेत यास्तव मी आपले अभिनंदन करतो आणि भविष्यातील वाटचालीकरिता सुयश चिंतीतो.

मी आपल्या सहकाऱ्यांनी आणि विद्यार्थीवर्गांनी जे परिश्रम घेतले त्या सर्वांप्रती कृतज्ञता प्रकट करून सरदारांसारख्या समाजवादी चळवळीमधील एका अग्रगण्य महापुरुषाच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या सोहळचाची मजा लुटण्याची आम्हास जी संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो.

भविष्यात सर्व आदिवासी लेखकांप्रत आपण हीच आपुलकी जोपासाल अशी नम्र आशा बाळगतो.

**ऋषिमसराम**

नागपूर

आपल्या स्नेहशील व प्रेरणादायी सहवासातील दोन दिवस हे आमच्यासाठी समृद्ध क्षण म्हणून कायम आठवणीत रहातील. आदिवासी उत्थानासाठी आपले कार्य निश्चितच मैलाचा दगड ठरावे. आपला स्नेह सदैव सांभाळण्याचा आम्ही प्रयत्न करू.

आपला

**राजाभाऊ राजगडकर**

वणी

आपल्या परिषदेने घेतलेले कार्य हे एक फारच मोलाचे आहे शून्यातून ब्रह्मांड निर्माण करणे असेच म्हणावे लागते. आपल्या परिषदेच्या आयोजनामुळे माझ्यासारख्याच्या बुद्धीला थोडी चेतना व प्रेरणा मिळाल्याचाही आनंद मिळाला. परिषदेतील चर्चिले गेलेले विषय सुंदर होते. आदिवासींच्या प्रश्नांबाबत सामाजिक, राजकीय आणि आर्थिक, शैक्षणिक संदर्भात आज आपली संस्था हिरीरीने कार्य करते ही स्वाग-तार्ह बाब आहे.

आपल्या परिषदेच्या प्रयत्नात आज ना उद्या भवि-ष्यात आम्हा आदिवासींना न्याय मिळेल अशी आशा वाटते. ग. बा. सरदारांनी केलेले भाषण अतिशय महत्त्वपूर्ण वाटले.

**सुभाष आडे**

मु. कृष्णानपूर, पो. वरेड (पूर्व)

ता. वणी, जि. यवतमाळ

या नूतन वर्षादिनी आपणा सर्वांना लाखो आदिवासीं-कडून अभिनदन आणि अभिवादन. तळागाळातील पद-दलित आदिवासींच्या जीवनात आनंदाची, वैभवाची आणि प्रतिभेची गरुडभरारी कशी साकारता येईल, ही सारखी तळमळ बाळगणारे प्राध्यापकवृंद आपण असल्याने एका विशिष्ट आस्थेने आम्ही आपल्याकडे बघत आहोत.

जे का रंजले गांजले, । त्यांसी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।। चे प्रत्यय मला पुणे मुक्कामी आढळले.

आमची अस्मिता जागविणारे आपले मार्गदर्शन खचित मोलाचे वाटले. 'हाकारा' चे अभिनंदन.

**कृ. गो. मरसकोल्हे, गुरुजी**

नवरगाव, जि. पूर

| | | | |
|---|---|---|---|
| ‘ हाकारा ’ पहिला, जानेवारी-मार्च | १९८० | : | जबरन जोत जंगल जमीन |
| ‘ हाकारा ’ दुसरा, एप्रिल-जून | १९८० | : | आदिवासी व शिक्षण |
| ‘ हाकारा ’ तिसरा, जुलै- सप्टेंबर | १९८० | : | आदिवासी व वनसंवर्धन |
| ‘ हाकारा ’ चौथा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० | : | आदिवासी साहित्य व कला |
| ‘ हाकारा ’ पाचवा, जानेवारी-मार्च | १९८१ | : | दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| ‘ हाकारा ’ सहावा, एप्रिल-जून | १९८१ | : | आदिवासी व आरोग्य |
| ‘ हाकारा ’ सातवा, जुलै-सप्टेंबर | १९८१ | : | वनशेती व वनसंवर्धन |
| ‘ हाकारा ’ आठवा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१ | : | रोजगार हमी योजना |
| ‘ हाकारा ’ नववा, जानेवारी-मार्च | १९८२ | : | उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| ‘ हाकारा ’ दहावा, एप्रिल-जून | १९८२ | : | धरणे व विकास |
| ‘ हाकारा ’ अकरा-बारा, जुलै-डिसेंबर | १९८२ | : | जंगल व्यवस्थापन |
| ‘ हाकारा ’ तेरावा, जानेवारी-मार्च | १९८३ | : | आदिवासी व दारू |
| ‘ हाकारा ’ चौदावा, एप्रिल-जून | १९८३ | : | आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| ‘ हाकारा ’ पंध्ररावा जुलै-सप्टेंबर | १९८३ | : | प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |

## यांच्या सहकार्याबद्दल परिषद आभारी आहे


१. शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार.
२. भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केन्द्र.
३. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ.
४. आदिवासी कल्याण संचलनालय, महाराष्ट्र शासन.
५. वनविकास महामंडळ, महाराष्ट्र.
६. कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.


* * *

**‘ हाकारा ’ आगामी अंक :** १. आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य

२. मानवशास्त्र व आदिवासी समाजकार्य

३. आदिवासी स्त्री

४. आदिवासी साहित्य व कला

आगामी अंकासाठी लेखक व कार्यकर्त्यांनी आपले लिखाण वा अनुभव परिषदेच्या पत्त्यावर सत्वर पाठवावे.

Registered with the Registrar of Newspapers for India Under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व–**

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रुपये |
| विद्यार्थी ,, ,, | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामुल्य पाठविला जातो.

आपली सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अँथ्रापॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

**रा. के. मुटाटकर**
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
ई / ५, प्राध्यापक निवास,
पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७

* आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे ! *